दै. लोकसत्ता वर्धापन दिन विशेषांकासाठी दि. १.५.२००१ रोजी घुले यांनी दिलेली मुलाखत

## मंतरलेले दिवस

# नेत्यांच्या बौद्धिकांनी वैचारिक बैठक पक्की केली

## मारुतराव घुलेपाटील

---

**सर्वांच्या पाठिंब्यामुळेच काही करता आले !**

जीवनात अनेक प्रसंग व चढउतार पाहिले. पत्नीच्या अकाली निधनानंतर कौटुंबिक आधार व समाजाभिमुख मुले यामुळे राजकारण, समाजकारण करता आले. गेल्या पन्नास वर्षांतील सार्वजनिक प्रसंगांत गोरगरीब जनता, इष्ट मित्र, सर्व जातिधर्मांचे कार्यकर्ते यांनी दिलेला पाठिंबा व केलेले उपकार मी जन्मभर विसरणे शक्य नाही. ह्याच जाणीवेने कोठल्याही पदावर व जागेवर काम करण्यापेक्षा आपल्या कर्मभूमीत काम करण्याची आवड सुटली नाही. प्रत्यक्ष राजकारणात नसलो, तरीही परिसरातील समाजात असणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी व उपक्रमांत सहभागी होण्यास आनंद वाटतो.

बालपण आणि तारुण्यातील मंतरलेले दिवस आठवले, म्हणजे आजही मन भूतकाळात हरवून जाते. काळाची तुलना करता 'तेहि नो दिवसागताः' असेच म्हणावेसे वाटते.

मी १९४५-४६ मध्ये प्राथमिक शाळेत शिक्षण घेत असताना स्वातंत्र्याच्या चळवळीने देशाचे वातावरण भारले होते. पुढाऱ्यांना स्वातंत्र्याशिवाय दुसरा ध्यासच नव्हता. एकापेक्षा एक सरस व त्यागी नेते स्वातंत्र्याची चळवळ चालवीत होते. नगर जिल्ह्यात काँग्रेस आणि राष्ट्र सेवा

शेतकरी, शेतमजूर, कामगार यांना पत आणि प्रतिष्ठा मिळवून दिली. १९६२, १९६७,१९७२ या कालावधीत लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी काम करून शासन दरबारी लौकिक मिळविला. काँग्रेस पक्षाची संघटना बळकट करून, जिल्ह्याचे नेतेपद मिळविले. मुळा धरण आणि जायकवाडी धरणातील धरणग्रस्तांचे प्रश्न त्यांनी मार्गी लावले.

काम आणि कामच हा ध्यास असणाऱ्या घुलेपाटलांवर काळाने झडप घातली. अशा महामानवाची ताटातूट नियतीने ८ जुलै रोजी केली. मारुतराव घुलेपाटील सर्वांना सोडून गेले. आकाशवाणी, दूरदर्शनवरील बातमी ऐकून महाराष्ट्राला धक्का बसला. सर्व जिल्हा हळहळला... शेवगाव - नेवासा परिसर गहिवरला. त्यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाशझोत टाकणाऱ्या वृत्तपत्रांच्या लेखण्या सरसावल्या. त्यांच्याविषयी सर्वांच्या भावना शब्दरूपाने साकार झाल्या, त्या आम्ही संकलित केल्या. प्रत्येकाच्या मनामनात त्यांनी आदराचे स्थान निर्माण केले होते. त्यांचे चैतन्य स्मरण ग्रंथ रूपाने साकार करण्याचे आम्ही धाडस केले आहे. त्यांच्या गुणांची व कार्याची यशोगाथा जिल्ह्यात, परिसरात आणि घराघरात पोचावी अशी इच्छा दे.भ. पद्मभूषण बाळासाहेब भारदे यांनी व्यक्त केली व आम्हाला प्रेरणा मिळाली. त्यांनी या ग्रंथासाठी प्रस्तावना दिली, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

स्व. घुलेपाटील यांच्या कार्यास प्रसिद्धी देणारी वृत्तपत्रे व आमचे स्नेही जिल्हाराष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष श्री. भय्यासाहेब देशमुख, आकाशवाणी प्रतिनिधी अनिल पाटील यांनी प्रोत्साहन दिले. कारखाना अधिकारी यांनी सहकार्य केले. पृथ्वीराज प्रकाशनचे संचालक व आमचे स्नेही म. भा. चव्हाण यांनी प्रकाशनाची जबाबदारी घेतली. कव्हर पानाचे आर्टिस्ट प्रभाकर काटे यांनी वेळेवर कलाकृती तयार केली.. म. भा. चव्हाण व त्यांचे सहकारी यांनी परिश्रम घेतले व ग्रंथ तत्परतेने वेळेवर तयार केला. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

स्व. मारुतराव घुलेपाटील यांच्या विचारांची पाठराखण करणारे त्यांचे सुपुत्र आमदार नरेंद्र घुलेपाटील, चेअरमन चंद्रशेखर घुलेपाटील यांना जनता जनार्दनाने अधिक शक्ती द्यावी, हीच साहेबांना श्रद्धांजली ठरेल.

परिसरावर स्व. घुलेपाटील यांचे अनंत उपकार आहेत. त्यांचे ऋण न फेडण्याजोगे आहे. त्यांच्या उपकारातून काही अंशी उतराई व्हावे, त्यांच्या विषयीच्या भावना संकलित कराव्यात म्हणून हा ग्रंथनिर्मितीचा प्रपंच!

स्व. मारुतराव घुलेपाटील यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी ही ईश्वरचरणी प्रार्थना !

**भीमराव पाटील**

संपादक

नेवासा, दि. ५ सप्टें. २००२

❀ ❀ ❀

# प्रस्तावना

## पद्मभूषण बाळासाहेब भारदे

माझे निष्ठावंत सहकारी मित्र आमच्या शेवगाव नेवासा भागातील सर्वमान्य नेते आणि जिल्ह्यातील राष्ट्रीय आणि सहकारी चळवळीचे एक प्रमुख कर्णधार आणि वैयक्तिक सुस्वभाव आणि कार्यप्रभाव यांचा समन्वय असलेले एक उज्ज्वल व्यक्तिमत्त्व, मारुतरावजी घुलेपाटील यांच्या दुःखद निधनाने जिल्ह्यातील सार्वजनिक सेवाकार्याची हानी झालेली आहे; पण माझ्या सेवाकार्याचा मुख्य आधार नाहीसा झाला आहे. शेवगाव तालुका ही माझी कर्मभूमी व माझ्या सार्वजनिक जीवनाच्या प्रगतीची गंगोत्री आहे. या तालुक्यात गेली ५० वर्षे मारुतराव घुलेपाटील यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची व त्यांनी साकार केलेल्या अनेक सेवाप्रकल्पाची प्रगती मी आत्मीयतेने व कौतुकाने पाहत आलो आहे. काँग्रेसच्या निवडणुकीच्या निमित्ताने तालुक्यातील अनेक गावांशी व अनेक कार्यकर्त्यांशी माझा संपर्क व स्नेहसंबंध झाला. त्यात मारुतराव पाटील व त्यांचे गाव दहीगाव या दोन्हींचे ही वैशिष्ट्य मला जाणवले. मारुतराव पाटील त्या गावाचे आदर्श नेते होते, या जाणीवेबरोबरच त्यांचा दहीगाव हाही त्यांच्या नेतृत्वाखाली आदर्शाकडे वाटचाल करीत होता, याचा ठसाही माझ्या मनात उमटला. चारित्र्य, संघटनकौशल्य, जनहिताची तळमळ, अपप्रवृत्तींना वाव मिळू नये याची दक्षता आणि सामाजिक शिस्तीचा प्रयत्न या गोष्टींमुळे मारुतराव पाटील

यांचे नेतृत्व व गावकऱ्यांचे संघटन या दोन्हींमुळे दहीगाव परिसर हा राष्ट्रीय सेवाकार्याचा एक बालेकिल्ला या नात्यानेच सर्वजण त्याकडे पाहत होते.

आमच्या शेवगाव तालुक्यात आम्ही काँग्रेसचे कार्य करीत असताना कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या विरोधाला आम्हाला तोंड द्यावे लागले. श्री. चंद्रभान आठरे व भाई भागवत हे निष्ठावंत कार्यकर्ते आमच्या विरोधात होते. त्यांचे बरेच आप्त, सोयरे वजनदार असल्याने कम्युनिस्ट विचार मान्य नसताना ते आप्त प्रेमाने कम्युनिस्टांना निवडणुकीत मदत करीत असत. कधीकधी सोईसाठी ब्राह्मण-ब्राह्मणेतर असा मुद्दाही निघत असे. या परिस्थितीमध्ये ज्या कार्यकर्त्यांनी असा कुठलाही विचार न करता गांधी-नेहरूंच्या नेतृत्वाचे प्रमाण मानून राष्ट्रीय दृष्टीने खंबीरपणे काँग्रेसला साथ दिली, इतकेच नव्हे तर, आपल्या परिसरातील सर्व गावांची व गावकऱ्यांची संघशक्ति काँग्रेसच्या मागे उभी केली, त्यात मारुतराव पाटील यांचा गौरवाने उल्लेख करावा लागेल. या काळात राजकीय कार्याबरोबरच रचनात्मक कार्यालाही महत्त्व होते. सहकार, शिक्षण, पंचायतराज्य, व्यसनमुक्ती, जातीय ऐक्य, असे अनेक पैलू त्या कार्यक्रमात आहेत. मारुतराव पाटील यांनी अशा विविध क्षेत्रांत आपल्या नैतिक नेतृत्वाचा व समर्थ कर्तृत्वाचा प्रत्यय आणून दिलेला आहे.

श्री. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची आदर्श प्रगती ही त्यांच्या नेतृत्वाची नेत्रदीपक साक्ष आहे. गेली पंचवीस वर्षे कारखान्याच्या स्थापनेपासून त्यांच्या आजच्या गौरवास्पद प्रगतीपर्यंत सातत्याने व कार्यक्षमतेने उद्योग विकसाच्या सर्व प्रक्रिया समर्थपणे मारुतराव पाटील यांनी केवळ नगर जिल्ह्यातच नव्हे तर, महाराष्ट्रातील आदर्श सहकारी साखर कारखाना असा लौकिक कारखान्यास मिळवून दिला आहे. केवळ कारखान्याचे व शेतकरी सभासदांचे हित डोळ्यांपुढे ठेवून कुठल्याही अन्य वैयक्तिक हितसंबंधाचा वा मानपानाचा विचार न करता अत्यंत काटकसरीने, काटेकोरपणाने सहकारी कारखाना शेतकऱ्यांची व उद्योगाची समन्वित प्रगती कशी करू शकतो, याचा

बोधपाठ या कारखान्याने मारुतराव पाटलांच्या नेतृत्वाखाली सहकारी कार्यकर्त्यांना व शेतकऱ्यांना दिला आहे. मशिनरीची उभारणी असो वा अर्कशाळेची उभारणी असो, कमी खर्चात पण गुणवत्ताही कायम ठेवून त्यांनी असे प्रकल्प उभे केले. सध्या महाराष्ट्रातील अनेक सहकारी साखर कारखाने अडचणीत आले आहेत. या पार्श्वभूमीवर मारुतराव पाटील यांचे नेतृत्व ठळकपणे दिसून येते.

आपले नेते यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहकारमंत्री या नात्याने काम करण्याचे भाग्य मला लाभले.

त्या काळात जिल्हा सहकारी बँका प्रस्थापित झाल्या. अ. नगर जिल्ह्यासाठी आम्ही मोतीलालजी फिरोदिया त्यांच्या अध्यक्षतेखाली बँकेचे संचालक मंडळ नियुक्त केले. त्या मंडळात पद्मश्री विखे पाटील, डॉ. निसळ आणि मारुतराव पाटील प्रभृती कार्यकर्ते होते. आशिया खंडातील अव्वल दर्जाची बँक असा अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचा लौकिक झाला. त्या श्रेयात मारुतराव पाटील यांचे योगदान आहे. या बँकेच्या संचालक मंडळात गेली अनेक वर्षे चेअरमन या नात्याने वा संचालक या नात्याने आजतागायत मारुतराव पाटील यांचे योगदान आहे. परवाच्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीतही ते संचालक म्हणून निवडून आले होते. त्यांच्या अनपेक्षित निधनामुळे गेल्या दोन-तीन तपाचा दुवा निखळला आहे. सहकारी चळवळीची , बँकिंग क्षेत्राची आणि ग्रामीण विकास क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

सार्वजनिक सेवेच्या अनेक क्षेत्रांतून मारुतराव पाटलांनी आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटविला आहे. सौजन्य आणि सामर्थ्य यांचा मेळ घालून आदर्श कार्यकर्त्यांची भूमिका त्यांनी वठविली. १९६२ साली आम्ही शेवगाव भागाच्या आमदारकीसाठी त्यांची निवड केली. त्यावेळी त्यागानचे कामगार पाटील या नात्याने ते काम करीत होते. सरकारी कामगार पाटलांना निवडणुकीमध्ये भाग घेता येत नव्हता. त्यावेळी संबंधीत अधिकाऱ्याकडे

त्यांच्या पाटीलकीचा राजीनामा देऊन त्यांच्या आमदार पदाचा मार्ग मोकळा झाला. तेव्हापासून पंचायतराज, शिक्षण, सहकारी क्षेत्र, काँग्रेसकार्य अशा अनेक सार्वजनिक कार्यात त्यांनी तन्मयतेने व कार्यक्षमतेने सेवा कार्य करून ती सर्व क्षेत्रे उजळण्याचे कार्य त्यांनी केले. आर्जवी स्वभाव आणि कार्याचा प्रभाव या दोन्हीमुळे ते लोकांच्या आदरास पात्र झाले. त्यांच्या सेवाकार्याची ओळख लोकांना व्हावी आणि त्यांच्या अनुभवाची व कार्याची लोकांना माहिती व्हावी व त्यांच्या जीवनदर्शनातून कार्यकर्त्यांना स्फूर्ती मिळावी यासाठी त्यांच्या नेतृत्वाचे विविध पैलू लोकांसमोर यावेत यासाठी त्यांचे एक निष्ठावंत सहकारी व कार्यकर्ते भीमराव पाटील यांनी 'मनामनातील मारुतराव घुले पाटील' या ग्रंथाचे संपादन केले आहे.

मारुतरावांच्या जीवनदर्शनातून कार्यकर्त्यांना सेवा कार्याचा बोध व्हावा, व त्यामुळे समाजाच्या प्रगतीसाठी कार्यकर्त्यांनी ध्येयनिष्ठेने व समर्थपणे कार्य करावे यासाठी हा ग्रंथ जनताजनार्दनास सादर केला. त्यातून कार्यकर्त्यांना कार्याची प्रेरणा व दिशा मिळेल असा मला भरोसा आहे.

❀ ❀ ❀

## मा. आमदार श्री. मारुतराव घुलेपाटील यांच्या कर्तृत्वास विनम्र अभिवादन !

कामगारवर्गाकडून ता. १९-१-७६ रोजी झालेल्या सत्कार समारंभाचे

**मानपत्र**

ज्या भागाचे नेतृत्व पुरोगामी असते तो भाग नेहमीच प्रगतीशील राहतो. त्यादृष्टीने नेवासा-शेवगाव तालुका भाग्यशाली म्हणावा लागेल. कारण या भागाला सतत पुरोगामी नेतृत्व लाभले आहे. गेली दहा-बारा वर्षे सातत्याने नेवासा, शेवगाव परिसराचे नेते मा. आ. श्री. मारुतरावजी घुलेपाटील यांनी या भागाचा लौकिक वृद्धिंगत केला आहे व त्यांच्या नेतृत्वाखाली श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीने या परिसराचा विकास नि कायाकल्प करण्यासाठी कारखाना कटिबद्ध झालेला आहे. श्री ज्ञानेश्वर कारखाना हा या भागाच्या विकासाचे केंद्रस्थान ठरणार आहे.

**जिथे वाहते मुळा-प्रवरा ।**
**तिथेच आता विकास खरा ।।**

मा. आ. श्री. मारुतरावजी घुले हे फक्त नेतेच नाहीत तर विकासाचे शिल्पकार आहेत. नेवासा व शेवगाव हे तालुके तसे दुष्काळी नि म्हणून अविकसित पण प्रवरामाईच्या वरदहस्ताने नगर जिल्ह्याचा श्रीरामपूर, राहुरी भाग विकसित झाला. मुळा धरणामुळे आता नेवासा, शेवगाव तालुक्याच्या विकासाची दारे खुली झाली आहेत. आर्थिक अरिष्टावर मात करून नेवासा व शेवगाव तालुक्याचे विकासाचे केंद्रस्थान ठरू पाहणारा श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना हे तर आजपर्यंतचे कार्यात श्री. घुलेपाटील यांच्या शिरपेचात मानाचा तुरा शोभविणारे काम झाले आहे.

अवघ्या दोन वर्षात अविश्रांत परिश्रमातून या कारखान्याची उभारणी झाली. सिमेंट, स्टील व अर्थिक अडचणींवर मात करून आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर अत्यल्प काळात कारखान्याची उभारणी झाली व लायसेन्स मिळाल्यापासून अवघ्या दोन वर्षात कारखान्याचा चाचणी हंगाम यशस्वीरीत्या पार पडला. सन १९७५-७६ चा गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडीत आहात.

कारखान्याच्या सर्व कामामध्ये आपणास महाराष्ट्राचे लाडके नेते ना. यशवंतरावजी चव्हाण, देशाचे कृषि राज्यमंत्री ना. अण्णासाहेब शिंदे, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक, महाराष्ट्राचे कर्तबगार मुख्यमंत्री ना. शंकररावजी चव्हाण, ना. वसंतरावदादा पाटील, ना. यशवंतरावजी मोहिते, ना. बी. जे. खताळ पाटील, सहकार महर्षी पद्मश्री विखे पाटील, आ. आबासाहेब निंबाळकर, आ. शंकरराव काळे, श्री. भाऊसाहेब थोरात यांचे मोलाचे सहकार्य आपणास लाभले.

## आमचा मानाचा मुजरा

आपण १९६२ ते १९७२ पर्यंत शेवगाव, नेवासा मतदार संघाचे लोकप्रतिनिधी म्हणून विधानसभेत व नंतर विधान परिषदेत काम केले. लोकप्रतिनिधी या नात्याने आपण जी जनसेवा केली आहे, त्याला तोड नाही. जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने जिल्ह्यामध्ये पक्ष बलशाली करण्याचा केलेला प्रयत्न जिल्हा कधीही विसरणार नाही. धरणग्रस्तांचे पुनर्वसनाच्या कामी तर आपण आपली सर्व शक्ती नि बुद्धी खर्च करून मायेच्या ममतेने धरणग्रस्तांना सहाय्य केले आहे.

शेवगावसारख्या अविकसित व धरणग्रस्तांच्या मुलांना औद्योगिक प्रशिक्षण मिळावे म्हणून सरकार दरबारी प्रयत्न करून आपण शेवगाव येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू केली व एक जिनिंग प्रेसिंग प्रकल्प सुरू केला. शेवगाव तालुका सह. ख. वि. संघ, मार्केट कमिटी शेवगाव, नेवासा जिल्हा सह. बँक, जिल्हा परिषद, ज्ञानेश्वर महाविद्यालय, नवजीवन विद्यालय इत्यादी लोकाभिमुख संस्थांना आपले कुशल नेतृत्व

लाभले असून त्या संस्था वटवृक्षासारख्या फोफावल्या आहेत.

मुळेचे पाणी पूर्ण शेवगाव तालुक्यास मिळावे म्हणून आपण केलेले प्रयत्न शेवगाव तालुका कधीही विसरणार नाही.

पाण्याशिवाय कृषि-औद्योगिक विकास साधणे केवळ अशक्य ही आपली धारणा आहे व म्हणून साडेतीन कोटीची सडे - ताजनापूर उपसा जलसिंचन योजना आपण कार्यान्वित करता आहात. या योजनेमुळे शेवगाव तालुक्याची १५ हजार एकर जमीन भिजणार आहे.

अत्यंत मितभाषी असलेले घुलेपाटील ही व्यक्ती राहिली नसून एक संस्था बनली आहे. राजकीय कामाबरोबर सामाजिक कार्यात आपण व्यग्र नि मग्न असता. त्यामुळे खाजगी जीवन ही बाब आपल्या जीवनातून लुप्त झाली आहे. सार्वजनिक कार्य हा आपला स्थायीभाव आहे. सर्वसमावेशकता हा आपला मोलाचा गुण आहे. विरोधकातही आपण प्रिय आहात नि म्हणून 'अजातशत्रू' आहात.

आपणाकडून नजीकच्या काळात शेवगाव व नेवासा ह्या तालुक्यांचा कायाकल्प होवो ही श्री ज्ञानेश्वराचे चरणी प्रार्थना ! आपण धडाडीने करीत असलेल्या कार्यास परमेश्वर यश देवो ही शुभेच्छा !

आपले वर्णन एकाच वाक्यात करावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, मन शेतकऱ्याचे, बुद्धी विचारवंताची, श्रद्धा भाविकाची, गरिबाबद्दल कणव संताची, प्रसन्नता फुलाची, धीरगंभीरता सागराची असा आपला पिंड बनला आहे.

आपल्या सर्व कामामुळे आम्ही आपणास मानाचा मुजरा करून हे मानपत्र आमच्या कामगार संघटनेच्या वतीने आपणास प्रेमपूर्वक देत आहोत !

दि. १९.१.१९७६

नेवासे तालुका राष्ट्रीय साखर कामगार संघ
नेवासे, जि. अहमदनगर

# अंतरंग


मंतरलेले दिवस / मारुतराव घुलेपाटील यांची मुलाखत / १७

**आठवणीतील मारुतराव घुलेपाटील**

एक लोभस व्यक्तिमत्त्व / नरुभाऊ लिमये / २२

आवडता विद्यार्थी / ग.गो. ढुमणे गुरुजी / २८

सच्चा मित्र / आबासाहेब निंबाळकर / ३३

सहकारातील किमयागार हरपला ! / यशवंत गडाखपाटील / ३८

मनापासून साथ करणारा आणि जिवाभावाचा मित्र / दादापाटील शेळके / ४१

नियतीने सच्चा मित्र हिरावून घेतला / बाबासाहेब नरवडे / ४२

विचारांचा कल्पतरू / पांडुरंग अभंग / ४४

आता उरल्या आठवणी / देसाई देशमुख / ४९

मारुतराव पाटील : महामानव / सुधाकर शेरकर / ५२

पूजनीय व्यक्तिमत्व : स्व. मारुतराव घुलेपाटील / भय्यासाहेब देशमुख / ५४

कर्मयोगाचे उपासक स्व. मारुतराव घुलेपाटील / दिनकरराव टेकणे / ५८

कै. मारुतराव घुलेपाटील : एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व / आर. एम. जगधने / ६१

सामाजिक परिवर्तनाचे भान असणारा नेता / व्ही. टी. कसार / ६३

विकासाची दृष्टी आणि कृतीची जोड / एस्. एन्. थिटे / ६९

नवनिर्मितीचा शिल्पकार हरपला /

काकासाहेब शिंदे, अशोक सागडे, दत्ता वाकचौरे / ७०

कृषी संस्कृतीचे शिल्पकार : स्व. मारुतराव घुले / भास्कर कडूपाटील / ७४

सहकार पंढरीचा वारकरी / भवान महाजन / ७६

संस्था हित सांभाळणारे घुलेपाटील / शाम भलके / ८६

धरणग्रस्तांचे अश्रू पुसणारे नेतृत्व हरपले / कल्याणराव म्हस्के / ८८

मालक गेले ! / एस. आर. जोशी / ८९

'आईची माया' असलेले व्यक्तिमत्त्व / भीमराव पाटील / ९२

अखेरचा निरोप / ९३

**वृत्तदर्शन**

दीपस्तंभ / बाळासाहेब तनपुरे / ९७

द्रष्टा नेता हरपला / १००

कर्तबगार सहकार महर्षी / १०३

खंदा सहकार कार्यकर्ता / १०५

लोकनेत्याला श्रद्धांजली / १०७

**महाराष्ट्रातील नेत्यांची श्रद्धांजली**

मारुतरावांचा आदर्शवाद प्रत्येकाने जोपासला पाहिजे / शरद पवार / १११

मार्गदर्शन करणारा नेता हरपला / छगन भुजबळ / ११४

मारुतरावांच्या निधनामुळे सहकार चळवळीची मोठी हानी /

बाळासाहेब विखेपाटील / ११६

दलितांवर प्रेम करणारा नेता हरपला / रामदास आठवले / ११८

सच्चा मार्गदर्शक हरपला / गोविंदराव आदिक / ११९

**विविध संस्थांची, व्यक्तींची श्रद्धांजली**

दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक लि., अहमदनगर / १२१

श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि. / १२४

ज्ञानेश्वर कारखान्यातर्फे मारुतरावांना श्रद्धांजली / १२८

स्व. घुलेंच्या कार्याचा वसा पुढे चालवावा / भाऊसाहेब थोरात / १३०

राहुरी कारखान्याच्यावतीने मारुतरावांना श्रद्धांजली / १३३

सहकारातून समाजकारण करणारा शिक्षक हरपला / भानुदास मुरकुटे / १३४

आदरांजली / १३५

दै. लोकसत्ता वर्धापन दिन विशेषांकासाठी दि. १.५.२००१ रोजी घुले यांनी दिलेली मुलाखत

## मंतरलेले दिवस

# नेत्यांच्या बौद्धिकांनी वैचारिक बैठक पक्की केली

## मारुतराव घुलेपाटील

### सर्वांच्या पाठिंब्यामुळेच काही करता आले !

जीवनात अनेक प्रसंग व चढउतार पाहिले. पत्नीच्या अकाली निधनानंतर कौटुंबिक आधार व समाजाभिमुख मुले यामुळे राजकारण, समाजकारण करता आले. गेल्या पन्नास वर्षांतील सार्वजनिक प्रसंगांत गोरगरीब जनता, इष्ट मित्र, सर्व जातिधर्मांचे कार्यकर्ते यांनी दिलेला पाठिंबा व केलेले उपकार मी जन्मभर विसरणे शक्य नाही. ह्याच जाणीवेने कोठल्याही पदावर व जागेवर काम करण्यापेक्षा आपल्या कर्मभूमीत काम करण्याची आवड सुटली नाही. प्रत्यक्ष राजकारणात नसलो, तरीही परिसरातील समाजात असणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी व उपक्रमांत सहभागी होण्यास आनंद वाटतो.

बालपण आणि तारुण्यातील मंतरलेले दिवस आठवले, म्हणजे आजही मन भूतकाळात हरवून जाते. काळाची तुलना करता 'तेहि नो दिवसागताः' असेच म्हणावेसे वाटते.

मी १९४५-४६ मध्ये प्राथमिक शाळेत शिक्षण घेत असताना स्वातंत्र्याच्या चळवळीने देशाचे वातावरण भारले होते. पुढाऱ्यांना स्वातंत्र्याशिवाय दुसरा ध्यासच नव्हता. एकापेक्षा एक सरस व त्यागी नेते स्वातंत्र्याची चळवळ चालवीत होते. नगर जिल्ह्यात कॉंग्रेस आणि राष्ट्र सेवा

दलाचे कार्य अत्यंत उत्साहात चालू होते. मी सहावीत असताना राष्ट्रभक्त नेते अच्युतराव पटवर्धन, एस.एम.जोशी, रावसाहेब पटवर्धन आदींची भाषणे ऐकण्याची संधी मिळाली त्याचा मनावर परिणाम झाला. त्यानंतर साताऱ्याच्या अजिंक्यतारा किल्ल्यावर राष्ट्रसेवादलाच्या शिबिरात सात दिवस राहिल्यावर दलाचा स्वयंसेवक म्हणून काम सुरू केले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राष्ट्र सेवा दल ही स्वतंत्र संस्था झाली. त्यात काम करीत असताना राष्ट्र सेवा दलाचा श्रीरामपूर तालुका अध्यक्ष म्हणून काम सुरू केले. हे काम करताना त्यागी नेत्यांची बौद्धिके ऐकून मनाची वैचारिक बैठक तयार झाली. तिचा परिणाम आजवर जाणवतो. त्यातून वाचनाचा छंद लागला; तो आजही कायम आहे. खऱ्या अर्थाने, तो काळ मंतरलेला होता.

जीवनातील महत्त्वाचे परिवर्तन १९५० मध्ये घडले. शेवगाव तालुक्यातील दहीगाव या कर्मभूमीत वास्तव्य सुरू झाले. तब्बल १० वर्षे (१९५०-६०) गावगाड्यात रममाण झालो. तारुण्य होते, उत्साह होता, काम करण्याची जिद्द व उमेद होती. गावातील पाटीलकीचे वतन असणाऱ्या प्रमुख कुटुंबाचा कर्ता या नात्याने दहीगावच्या पंचक्रोशीतील लोकांच्या कामात, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी झालो.

महात्मा गांधी यांच्या ग्रामस्वच्छतेचे प्रयोग त्या काळात आम्ही गावात करीत होतो. दहीगावात पूर्वीचेच एक वसतिगृह होते, त्यात सुधारणा केली. या भागातील शिक्षणासाठी 'दहीगाव हायस्कूल'ची स्थापना केली. स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने दहीगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची स्थापना करून सावकारी पाशातून शेतकऱ्याला मुक्त करण्याचा प्रयत्न केला. हे सगळे दहीगावच्या वास्तव्यात घडले.

'सुपरवायझिंग युनियन'चा (तालुका देखरेख संघ) सभासद म्हणून १९५८ मध्ये तालुका पातळीवर काम करण्याची संधी मला मिळाली. याच काळात सहकाराची चळवळ जोम धरत होती. जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेची

स्थापना याच वेळी झाली. गांधीवादी नेते बाळासाहेब भारदे यांच्या सूचनेवरून जिल्हा बँकेच्या संस्थापक संचालकपदी माझी निवड झाली. (कै.) मोतीभाऊ फिरोदिया, (कै.) बाजीराव पाटील (खरवंडी कासार, तालुका पाथर्डी), अकोल्याचे आमरे पाटील, के. बी. रोहमारे, पुणतांब्याचे धनवटे पाटील ही मंडळी बँकेत होती.

शेवगावातील शेतकरी संघाच्या इमारतीच्या भूमिपूजनासाठी यशवंतराव चव्हाण १९६० मध्ये आले असता, प्रथमच त्यांची भेट झाली. विधानसभेची निवडणूक (१९६२) लढवणार का, अशी विचारणा काँग्रेस पक्षाकडून त्या वेळी झाली. परंतु कुटुंबात एकटाच कर्ता असल्याने 'आईला विचारल्याशिवाय संमती देता येणार नाही' म्हणून उमेदवारीस नकार दिला. पण यशवंतराव चव्हाणांनी आग्रह धरल्यावर जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आबासाहेब निंबाळकर यांनी आईची समजूत काढण्यासाठी शेवगाव तालुक्यातील ज्येष्ठ काँग्रेस नेते नानासाहेब भारदे यांना दहीगावला पाठवले. त्यानंतर मी ही निवडणूक लढवली. माझ्या विरोधात (कै.) एकनाथराव भागवत यांनी निवडणूक लढवली. मी या निवडणुकीत विजयी झालो. याच काळात जिल्हा काँग्रेसचा अध्यक्ष म्हणूनही मला काम पाहता आले. त्याच काळात पंचायत राज्याची निर्मिती होत होती.

जिल्हा परिषदांची स्थापना झाल्यावर सर्वश्री. बाळासाहेब विखे, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, के. बी. रोहमारे, भाऊसाहेब थोरात, माधवराव निऱ्हाळी, बाबूराव तनपुरे, विठ्ठलराव विखे, बी. जे. खताळ या मंडळींनी तेथे नेतृत्व केले व दिले. त्यावेळी लोकाभिमुख असे 'टीमवर्क' होते. आता ते पाहावयास मिळत नाही. मी आमदार असतानाच १९६५ मध्ये या भागात महत्त्वाची घटना घडली. जायकवाडी धरणाची निर्मिती ही ती घटना. पैठण, शेवगाव, गंगापूर, नेवासे या तालुक्यातील धरणग्रस्तांच्या चळवळींनी जोर धरला होता. दत्ता देशमुख, एकनाथराव भागवत, पां. य. फलके गुरुजी या चळवळींचे

नेतृत्व करीत होते. धरणाच्या जागेबद्दल संशय व्यक्त होत होता, तेव्हा त्या काळात श्रीमती मालतीबाई तुळपुळे, निवृत्त मुख्य अभियंता चाफेकर यांनी येवले ते जायकवाडी अशी गोदावरीच्या दोन्ही काठची पाहणी करून धरणाची सध्याची जागा योग्य असल्याचा निर्वाळा दिला. त्यानंतर महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली येथे शेतकरी परिषदेचे आयोजन करून धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या संदर्भातील मागण्या मांडल्या. त्याला सरकारची मंजुरीही मिळाली. त्यानंतर १९६७ मध्ये काँग्रेस पक्षातर्फे मी पुन्हा विधानसभेची निवडणूक लढवली व जिंकलीही. मुळा धरणाच्या पाटपाण्याचा प्रश्न, ताजनापूर उपसा जलसिंचन योजना, शेवगावच्या आय.टी.आय. साठी तर तत्कालिन मुख्यमंत्री यशवंतरावांनी खास मंजुरी दिली. रचनात्मक कामाची आवड असल्याने व या भागात कृषिऔद्योगिक उद्योगाची गरज असल्यामुळे याच काळात सर्वपक्षीय, समविचारी, रचनात्मक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. कारखान्याच्या निर्मितीतून शेतीबरोबरच रोजगार निर्मिती, शिक्षणाचाही प्रसार होत आहे, हे माझ्या जीवनातील कृतार्थ समाधान आहे. पूर्वी वरच्या पातळीवर जवाहरलाल नेहरू, डॉ. राममनोहर लोहिया इत्यादी नेत्यांमध्ये वैचारिक मतभेद होते. पण त्याला व्यक्तिद्वेषाची किनार नव्हती. गेल्या ५० वर्षांत लोकशाही आहे, पण समाजाच्या सर्व थरात ती गेली नाही. स्वाभिमानाचे महत्त्व, तो जपण्याची वृत्ती लोकांमध्ये रुजली नाही. केवळ 'राजकारणासाठी राजकारण' चालू झाल्याने समाजातील प्रश्न बाजूला राहून प्रतिष्ठा, मानपान सुरू झाले व सत्तेची स्थित्यंतरे पाहणे जनतेच्या नशिबी आले. पूर्वी परस्परांच्या विरोधात असले, तरी पुढाऱ्यांना एकमेकांबद्दल प्रेम वाटत असे. कम्युनिस्ट नेते एकनाथराव भागवत व मी राजकीयदृष्ट्या विरोधक होतो. पण भेट झाल्यावर मात्र परस्परांच्या सुख-दुःखांची चर्चा होत असे. विरोधक हा वैचारिक विरोधक असतो, ही कल्पनाच आज मागे पडली

आहे. वकीलराव लंघेही विरोधकच होते; पण विकासाच्या कामात आम्ही कायम बरोबर होतो. पूर्वी जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत अकोल्याचे आमरे पाटील विरुद्ध विठ्ठलराव विखे अशी लढत होती. त्यावेळी पक्षाचा पाठिंबा श्री. आमरे यांना होता. पण तो डावलून प्रक्रिया मतदारसंघातून मी विखे यांना मतदान केले. त्यामुळे नेत्यांची नाराजीही ओढावली होती. पण दिलेले मत कोणत्याही प्रलोभनाने नाही, तर विखे यांच्या सहकारातील कार्याला व विचाराला दिले होते.

शब्दांकन : विजय जोशी

❀ ❀ ❀

# एक लोभस व्यक्तिमत्त्व

**नरुभाऊ लिमये**

---

महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेत मी बारा वर्षे होतो. अनेक सभासद आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषणांनी, प्रश्नांनी किंवा आरडाओरड्यांनी लक्षात राहिले; पण त्या सर्वांपेक्षा एका निराळ्या अबोलपणाने, दुसऱ्या दारातून आत येऊन चौथ्या रांगेला बसणारे मारुतराव घुले एका निराळ्याच कारणाने लक्ष वेधून घेत असत. सभागृहात ते बोलत कमी पण जे बोलत ते अचूक आणि माहितीपूर्ण असे. त्यांच्या भाषणात आकडेवारी व ज्ञानाचे अवडंबर नसे, पण शेतकरी भू-पुत्राला जे रोज अनुभव येतात ते साध्या सरळ शब्दांत सांगणारे आमदार म्हणजे मारुतराव घुले !

त्यांच्याकडे वळून पाहिले की एक प्रसन्न स्मितहास्य पहावयास मिळते. रागावलेला, दुःखी असलेला माणूससुद्धा जरा सुखावतो. त्याला जरा मोकळेपणा वाटतो. नदीचे पात्र स्वच्छ पाण्याने खळखळ वहात असताना दोन ओंजळी पाणी पिऊन तृप्त व्हावे असा निर्मळपणा या आमदाराच्या चेहऱ्यावरच प्रतिबिंबित होतो आणि एकदम जवळीक निर्माण होते.

मी त्यांचा मित्र बनलो तो या निर्मळपणामुळे बनलो. राजकारणातसुद्धा काही माणसे अबोल असतात; पण ती आपल्या मनातले काहीतरी दडविण्यासाठी अबोल बनलेली असतात. मारुतराव तसे नाहीत. ''मला शेतकऱ्याला काय कळते, काम करत राहावं, अडीअडचणी मोकळ्या मनाने

मांडाव्यात, यश देणारा तो ज्ञानोबा आहेच'' या निर्मळ श्रद्धेने घुलेसाहेब वागताना दिसले की, माझ्या मनातला लेखक, पत्रकार जागा होतो आणि अशाच एका दुपारी मी त्यांच्या जीवनाचा मागोवा घेऊ लागलो. विचाराव्या त्या प्रश्नाचे सरळ उत्तर मिळू लागले आणि आढळले की या माणसाच्या बालपणात, शालेय जीवनात आणि घरात संस्कार झाले ते त्याच्या गावचे एक शिक्षक श्री. जांभेकर आणि महाराष्ट्राच्या त्या काळच्या नव्या पिढीला देशभक्तीचे शिक्षण देणारे पू. सानेगुरुजींचे वाङ्मय !

त्यांच्या घरात गावच्या अडीअडचणींची चर्चा चाले. छोटा मारुतराव ती ऐकत असे. दहिगाव पाटलांचा पंचक्रोशीच्या बाहेर दूरवर पोचलेला लौकिक. रोज माणसे जमत. थोरले पाटील त्यांना समजून घेत आणि समजावून सांगत. मारुतराव जनक घराणे चांगले; पण गरीब आणि दहीगावला आले ते सुखवस्तू कुटुंबात. त्यामुळे मनातल्या सुप्त आशांना नवे साधन मिळाले. १९४९ साली त्यांचे दत्तविधान झाले. समाजवाद, भांडवलशाही, गरिबांचे कल्याण, देशाचे स्वातंत्र्य असे शब्द कानावरून जात. बी रुजत असे; पण त्यांच्या नंतरचा स्वभाव घडविणारा वेळ, कोठे रुजला असा शोध घेतला, तर तेच म्हणाले- सभ्य आणि सुजाण नागरिक बनावे, या शिकवणीचे बी त्यांच्या मनोभूमीत रुजले, घरी-दारी त्या बिजाला योग्य खत-पाणी मिळाले. म्हणून आज एक विशिष्ट राजकीय मतप्रणाली व नेतृत्वावर निष्ठा ठेवणारे मारुतराव सर्वांचे झाले. मित्राइतके राजकीय विरोधक त्यांना मानतात. मतभेद असू शकतात आणि ते सहिष्णुतेने मान्य करणे म्हणजे सुजाणपणाची लोकशाही त्यांच्या अंगवळणी पडली आहे. दुसऱ्याचे प्रथम ऐकून घेऊन सत्य शोधून घ्यावे. हा स्वभावच बनला आहे आणि म्हणूनच प्रतिकूल परिस्थितीतही एक साखर कारखाना उभारत कमीत कमी काळात तो गळितापर्यंत आणण्याचे यश त्यांना लाभले. एका पक्षाचे मताचे असले तरी जणू मतमतांतरांतले लवाद बनत. सर्वांचे बोलून झाले निर्णय मारुतरावांनी द्यावा आणि इतरांनी ऐकावा, अशी

शक्ती त्यांनी आपल्या कर्तृत्वाने, सौजन्याने आणि निष्ठेने आपल्या शब्दाला मिळवून दिली आहे.

तरुण मारुतरावांना शाळेतील गुरुजी आणि समाजाचे गुरुजी 'साने गुरुजी' यांचे बोल आणि वाङ्मयाने वळण लावले तर १९५० सालच्या सुमारास नगर जिल्ह्याचे राजकीय नेतृत्व करणारे स्वामी सहजानंद भारतींनी त्यांना सार्वजनिक जीवनात गुंतवून टाकले. भारतात व महाराष्ट्रात तो काळच असा होता की समाजाला शिस्त अनुशासन लावण्याने काम राज्यसत्ता वा दंडा करीत नव्हते. सत्तेपासून शतयोजने दूर राहून सत्तेसह समाजाला मार्गदर्शन करणारे स्वामी, संन्याशी आणि समाजसेवकांचा तो काळ होता. पुढे एकदा पूज्य विनोबा म्हणाले की समाजाला शिस्त लावावी, अनुशासन द्यावे, पण ते 'सत्तेने' नव्हे तर समाजातल्या 'आचार्यांनी' द्यावे! आणीबाणीच्या संदर्भात विनोबा म्हणाले, समाजाला आचार्यांचे अनुशासन हवे!!

साहजिकच मारुतराव सत्ता, वैभव व अधिकाराच्या जागांपासून दूर राहून आपली मूळ सेवेची प्रेरणा फुलवू लागले. गावापासून, दहिगावच्या पाटील घराच्या ओसरीपासूनच त्यांनी सुरुवात केली. गावातला तंटाखटला कोर्टात जाता कामा नये. माझा गाव निर्णय देईल तो मान्य! ही वृत्ती त्यांनी रुजविली, जोपासली आणि वाढविली. असा कुणीतरी एक खरा लोकसेवक दहिगावला घडला जात आहे हे नगर जिल्हा आणि त्यावरच्या पातळीवरही बोलले जाऊ लागले. त्यांच्या कार्याची क्षितिजे वाढू लागली. लोकप्रियता त्यांच्यामागे धावू लागली. कुणा मोठ्या पुढाऱ्याच्या वशिल्याशिवाय खालच्या कामामुळेच तालुका, जिल्हा पातळीवरच्या सहकारक्षेत्रातल्या जागा त्यांना मिळू लागल्या. राजकीय मतप्रणालीत ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावान सेवक. चिटणीसपद त्यांना आग्रहाने देण्यात आले. पण ही सर्व नेतेपदाची बिरुदावली न चिकटता सेवकाची कमाई म्हणूनच त्यांना लाभलेले यश होते. साहजिकच त्या त्या पदाच्या अधिकाराचा वापर सेवेसाठी केला जाऊ लागला. मारुतराव घुले वय

वर्षे तिशीच्या आसपासचा हा तरुण म्हणजे एक शक्ती आहे. पूर्व क्षितिजावरचा प्रकाश आहे हे सर्वांना जाणवू लागले. फक्त खुद्द मारुतरावांना मात्र त्याची जाण नव्हती आणि म्हणूनच बासष्ठ सालच्या निवडणुकीत त्यांना विधान सभेला उभे राहण्याची विनंती, आग्रह किंवा त्यांच्या भाषेत 'नेत्याची आज्ञा' झाली तेव्हा ! मला, एका अनामिक तरुणाला यात कशाला घालता, हा त्यांचा पहिला रुसवा होता पण एका प्रस्थापित व्यक्तीच्या विरुद्ध त्या तरुणाला तालुक्याने बारा हजार मते जास्त देऊन यशस्वी केले. मारुतरावांना सहज विचारले की तुम्हालाच यशवंतरावांनी का निवडले? ते म्हणतात, ''मला माहीत नाही! पण साठ साली व त्यापूर्वी वर्ष दोन वर्षे मी साहेबांची भाषणे ऐकली आणि मी त्यांचा बनून गेलो. त्यांनी मला जणू कायमचे जिंकले.''

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातल्या माणसांना माहीत आहे की १९५२ ते १९७२ च्या काळात श्री. यशवंतराव चव्हाण यांनी देशात घडत असलेले राजकीय नेतृत्वाचे परिवर्तन अचूक ओळखले होते. जुनी पाने गळून पडत होती. वसंताची नवी पालवी फुटली होती. गावागावांतून त्यांनीही नवी पिढी शोधून उजेडात आणली. जे कृतज्ञ असतील ते आजही कबूल करतील की राजकारणात काम करीत असताना आपल्याला अंधारातून प्रकाशात खेचण्याचे काम साहेबांनी केले आहे. साऱ्या महाराष्ट्रात हे घडत होते. जिल्हा काँग्रेस, सहकारी संस्था, जिल्हा परिषदा अशा अनेक जागांवर नवतरुण दिसू लागले. विशेषतः ग्रामीण भागाचा आर्थिक कायापालट करणाऱ्या सहकारी क्षेत्रात आणि शेतीमालावरच्या प्रक्रिया कारखानदारीला सहकारी क्षेत्रात स्थिर करण्याचे मोलाचे काम साहेब यशवंतरावांनी केले आणि मारुतरावसारख्या अनेक तरुणांनी त्यांच्यावर सोपविलेले काम चोख बजावले. राजकीय दृष्टीने मोजमाप केले तर १९६७-७२ या कालखंडात काँग्रेस पक्षाला निवडणुकीची कसोटी लागत होती. अशा वेळी व सहज निवडून येण्याची शक्यता होती त्यावेळीही 'मला तिकीट नको' म्हणणारे जे तरुण चव्हाणसाहेबांनी वेचून

आपल्या मित्रमंडळींचा खजिना भरला होता, तोच त्यांना उपयोगी पडला. मारुतराव घुले हा त्यातला पहिल्या दहापाचातला मोहरा आहे.

राजकारणाच्या चढउतारात निष्ठा टिकत नाहीत असा अनुभव सर्वांना येतो. आजच्या जमान्याचा तर तो रूढ संकेत झालेला आहे. पण मारुतराव त्याला अपवाद आहेत. उगवत्या सूर्यनारायणाला अर्घ्य आणि पश्चिमेकडे कललेल्याला 'टाऽऽटा' म्हणणारी ती निष्ठा नाही. उलट, घरात, बाहेर, वैयक्तिक जीवनात कसल्याही अडचणी असल्या तरी 'आधी लगीन कोंडाण्याचे' ही मराठी शिकवण प्रत्यक्ष जीवनात उतरविणारे मारुतराव घुले हे एक अभिमानाचे लेणे आहे.

राजकारणात सत्तेचा वाटा किती आणि सेवेचा किती? समाजाचा विकास सत्तेमार्फत होतो का सेवेने होतो हा प्रश्न सहज उत्तर देण्याइतका सोपा राहिलेला नाही. कारण समाजाच्या हितासाठी सत्ता हवी म्हणणारे सत्ताधीश तो विकास आपल्या पक्षीय स्वार्थाच्या आड येऊ लागला की विकास थांबला तरी चालेल पण माझी सत्ताच प्रभावी ठरावी असे मानण्याचा काळ आहे. पण ही एक तात्कालिक अवस्था आहे. खरा विकास सेवाभावावरच होऊ शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे श्री. मारुतराव घुले यांचे कार्य, कार्यपद्धती आणि शेवगाव नेवासा तालुक्यातील ग्रामीण जनतेचा जिवंत विकास आहे.

आज नेवासा भागातला ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना हे त्याचे दृश्य रूप आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या कारखानदारांचा लाभ अनेकांना प्रत्यक्ष दिसू लागला तेव्हांच धरणग्रस्तांचे दुःख हलके झाले. साखरेची गोडी ती चिमूट जिभेवर टाकल्याखेरीज कळत नाही मग त्या गोडीचे वर्णन कुणी कितीही करो.

असे निष्ठावान सेवाभावी लोभस नेतृत्व कसे घडले असेल याचा विचार माझे मित्र मारुतरावजींकडे पाहताना पुन्हापुन्हा येतो आणि कल्पनेला पंख फुटले की वाटते ज्ञानेश्वर माउलीच्या चरणस्पर्शाने पुनित झालेल्या भागात हे

सहज शक्य आहे. त्यातच घराचा उंबरा ओलांडण्यापूर्वीच सेवाभावाचे दर्शन त्या छोट्या मुलाला घडले. घरात पाळण्यातल्या मुलावर पहिले संस्कार होतात ते त्याच्या मातेचे. पू. विनोबा म्हणतात मातृदेवते इतकी मोठी शक्ती दुसरी नाही.

मारुतरावांना त्रिमाता लाभल्या. जनक आई, दत्तक घरी दोन माता. सर्वांचे प्रेम त्यांना लाभले. सहज आठवण झाली, महाभारताची. बाळकृष्णाला जन्मदाती माता देवकी, नंदाघरची यशोदा ! मातृप्रेमाचे हे पाझर बाल मारुतीला पुष्ट न करतील तरच नवल. अशा वातावरणात घडलेले मारुतराव घुलेपाटील आज सर्वमान्य झाले. अजातशत्रू झाले. जणू त्या भागातल्या राजकीय सामाजिक जीवनाचे ते एक 'विश्वस्त' बनले आहेत. आत्ताशी त्यांनी पन्नाशी ओलांडली आहे. क्रिकेटच्या मैदानावर पहिल्या वादळी गोलंदाजीला यशस्वी तोंड देऊन जो अर्धशतक गाठतो तो 'सेट' झाला असे समजतात. त्याचे शतक पूर्ण होणारच आणि आजची परिस्थिती अशी आहे की मारुतरावांसारख्या सेवाभावी निर्वैर वृत्तीच्या लोकांनी शतक गाठलेच पाहिजे म्हणून मी म्हणतो मारुतरावजी 'जीवेत शरद: शतम्'

(मारुतराव घुलेंपाटील, सुवर्ण गुणदर्शन अंक २८.३.८१)

❀ ❀ ❀

# आवडता विद्यार्थी

## रा.गो. ढुमणे गुरुजी

(पढेगाव येथील स्व. घुलेपाटील यांचे वर्गशिक्षक यांच्या स्मरणातील)

**जिज्ञासू व्यक्तिमत्व**

१९२७ चा तो काळ. पढेगावच्या काही प्रमुख मंडळींच्या मागणीनेच माझी या गावी बदली करण्यात आली. या गावच्या शाळेचा हेडमास्तर म्हणून मी कामावर रुजू झालो. त्या काळी श्रीरामपुरची आतासारखी भरभराट नव्हती. पढेगाव राहुरी तालुक्यातच मोडायचे. सहकारी कारखान्यांच्या प्रगतीचा धूर ओकणारे सहकारी तत्त्वाचे प्रदर्शन हे त्याकाळी खेड्यातील अजाण जनतेच्या ध्यानीमनीही नव्हते. प्रत्येक कुटुंब काबाडकष्ट करायचे, तेव्हा कुठे सुखाने चूल पेटायची. आर्थिक अरिष्टाचे ओझे तेव्हा प्रत्येक कुटुंबचालकाच्या डोळ्यांत दिसायचे.

आजपर्यंत माझ्या शिक्षकी मार्गदर्शनातून जेवढी मुले गेली, त्यातली विविध क्षेत्रांत नावारूपास आली. त्यांत नजरेत भरणारा माझा आवडता विद्यार्थी म्हटला तर आजचे जिल्ह्यातील राजकारणातील अग्रणी 'मारुतराव घुले' तथा शालेय जीवनातला माझा 'विश्वनाथ' डोळ्यांसमोर उभा राहतो.

विश्वनाथचे बालपण मी खूपच जवळून पाहिलेले. तो तसा हट्टी होता, पण नुसता हट्टी नव्हता तर त्याही वयात त्याची जिज्ञासावृत्ती वाखाणण्याजोगी होती. कुठलीही नवी वस्तू पाहिली की तिच्या चौकशा तो करीत असे. आई-

वडील, वडील बंधु भाऊसाहेब सर्वांचा जीव त्याला उत्तरे देताना अगदी मेटाकुटीस यायचा. त्यामुळे संपूर्ण कुटुंबात त्याचे चुणचुणीत व्यक्तिमत्व घरात बागडू लागले म्हणजे सगळे खुषीत यायचे.

**शिस्तप्रिय विद्यार्थी**

रासायनिक क्रियांचे संस्कार झाले म्हणजे ज्याप्रमाणे पारदभस्म, कज्जलीकल्प यासारखी जीवनोपयोगी औषधे तयार होतात, तसेच बालपणीचे संस्कार भावी आयुष्याविषयी मानसिक बैठक बनविते. विश्वनाथ हा बालवर्ग ते व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत शिकला, तो काळ पारतंत्र्याचा! परंतु त्याच्या रोमरोमी स्वराज्याच्या आणाभाका कोरायला लावणारा असा तो स्वातंत्र्यलढ्याचा काळ होता. आम्ही शिक्षक त्या काळी खेडोपाडी महात्माजींच्या विचाराची शिदोरी वाटत होतो. विद्यार्थ्यांना देशप्रेमाच्या जाणिवानेणिवातून नेण्यासाठी मी त्या सुमारास स्काऊट पथक उभारले होते. त्यातून मुलांना सत्य, निष्ठा, ऐक्य, राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्य, बंधुता या गोष्टी शिकविता यायच्या. विश्वनाथ या पथकामध्ये विशेष रस घ्यायचा. शिस्तप्रियता, मिळून मिसळून वागण्याची वृत्ती हे त्याचे गुण पाहून मी त्याला पथकनायक केले. आम्ही सांगितलेली बौद्धिके तो तयारी करून पथकासमोर क्रीडांगणात द्यायचा तेव्हा हा मुलगा नेतृत्वाच्या रांगेत जाईल, असे वाटायचे. त्याच्याबरोबर ८-१० मुलांचा तांडा नेहमीच दिसायचा. शेवटी मुले ही मुलेच असतात; त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची भरारी त्या वयास प्रौढांसारखी चाकोरीबद्ध असणेच अशक्य.कधी विचारापेक्षा भावनिक प्रवाहाचा तुंबा मनात साठला की त्याचा विस्फोट होतो. अशा वेळी त्यांच्या मनातील विचार आणि अवतीभोवतीच्या परिस्थितीचा परिपाक म्हणून त्यांच्या अंतःकरणात उसळू पाहणारा भावनाप्रवाह या दोन्ही गोष्टीत समतोल राखणे महत्त्वाचे असते.

### गांधीवादाकडे परिवर्तन

विश्वनाथ आरंभी जहाल मताचा असायचा. आम्ही विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना गांधीजींच्या विचाराचा परिचय करून देत असू. त्याचे थोरले बंधू आनंदराव पाटील माझे परममित्र होते. विश्वनाथ त्यांच्या जवळ बोलताना क्रांतिकारकांविषयी प्रेम दाखवायचा. ''सत्याग्रहाच्या चळवळीला गोरे लोक मुंग्यांसारखे चिरडून टाकतील, आपल्या देशातील सगळ्या लोकांनी मिळून त्यांच्यावर हल्ला करायला पाहिजे.'' हे त्याचे सर्व बोलणे आनंदराव पाटील ऊर्फ भाऊसाहेब आमच्या बैठकीत हसत हसत सांगायचे.

ज्यावेळी १९४२ चा गांधीजींचा लढा सबंध हिंदुस्थानभर वाऱ्यासारखा पसरला, एकूण हिंदुस्थानचा समाज जेव्हा गांधीजींच्या चळवळीत ओढला गेला आणि गोऱ्यांनीसुद्धा गांधीजींचा धसका घेतला, त्यावेळी विश्वनाथ गांधीजींत समरस झाला. गांधीजींच्या सत्य-अहिंसा-प्रेम या त्रिसूत्रीवर त्याची श्रद्धा जडली. पढेगावच्या तरुणांमध्ये व कुमारांमध्ये गांधीजींची विचारशक्ती प्रस्फुरित झाली. कुमारांचे नेतृत्व विश्वनाथकडेच होते. आपला विचार दुसऱ्यांना पटवून देण्याची त्याची शैली खासच होती.

### लयबद्ध वक्तृत्व

शाळेत दरवर्षी गणेशोत्सव, शिवजयंती, बालदिन व इतर छोटेमोठे कार्यक्रम सातत्याने आम्ही घडवून आणीत असू. अशा प्रसंगी मुलांत वक्तृत्व वाढावे, स्वतःचे विचार समाजाला पटवून देण्याची कला त्यांना उत्कृष्ट पातळीत आत्मसात व्हावी म्हणून आम्ही 'भाषण स्पर्धा' ठेवीत असू. विश्वनाथ त्याच्या वर्गात सर्वांत लहान विद्यार्थी, पण या स्पर्धेत तो नेहमीच पहिला असायचा. भाषणात स्वतःचा विचार मांडताना त्याच्यात कधीच आक्रस्ताळेपणा नसायचा. एका संथ लयीत त्याचे भाषण सुरू होई. प्रत्येक मुद्याचे सविस्तर खंडण-मंडण करून तो श्रोत्यांना आकर्षित करीत असे.

### खो खो-कबड्डीची आवड

पुढे श्रीरामपूर येथील मॉडर्न हायस्कूलमध्ये तो गेला. खूपच लवकर तो तिथेही पहिल्या क्रमांकाचीच बक्षिसे घेऊ लागला. तेव्हा तेथील रानडे नावाचे शिक्षक मला एकदा भेटले. त्यांनी सांगितले की, ''तुमचा विद्यार्थी नक्कीच या भागाचा चांगला नेता होईल.'' अशा प्रकारे त्या काळीच या नेतृत्वाची चाहूल आजूबाजूच्या लोकांना लागली होती. खेळातसुद्धा तो नियमित असायचा. आजच्यासारखे विदेशी खेळ त्यावेळी शहरातूनसुद्धा आढळत नव्हते. कबड्डी, खो-खो, चिल्यापाट्या, कुस्त्या हे ह्या काळचे प्रमुख खेळ. कुस्त्यांच्या फडात विश्वनाथची सडसडीत देहयष्टी असता चपलपणावर तो रेवड्यांपासून ते काही रुपयांपर्यंतची बक्षिसे घ्यायचा. पण हा त्याचा आवडीचा खेळ नव्हता. त्याचा सर्वात आवडता खेळ खो खो, त्याखालोखाल कबड्डी. शाळेच्या खोखो संघाचा तो नेहमीच कर्णधार असायचा. अनेकदा नाबाद राहिलेला तो मला आठवतो. त्याच्यामुळेच इतर मुलेदेखील खेळात रस घ्यायची.

### हायस्कूलमध्ये प्रभुत्व

मॉडर्न हायस्कूलमध्ये जेव्हा पढेगावचे दहा-अकरा विद्यार्थी गेले, तेव्हापासून तर ते शिक्षण पूर्ण होईपर्यंत सगळेच हायस्कूलच्या टीममध्ये गाजले. अगदी जिल्हा पातळीपर्यंत तेव्हा मॉडर्न हायस्कूलची टीम' न म्हणता पढेगाव संघाकडून काही धडे घ्या लोकांनो! म्हणायचे. इतर विद्यार्थी शरमायचे. पण पढेगावच्या विद्यार्थ्यांचे प्रभुत्व कायमच राहिले. हायस्कूलमध्ये मल्लखांब खेळायची सोय होती. त्याच्याबरोबरचे विद्यार्थी सांगतात की, ''विश्वनाथ पहाटे ५ ला उठून मल्लखांबावर व्यायाम करी. लंगोटवरच पाटावर जाई. पळण्याचा व्यायाम करी व तसाच पाटाच्या गार पाण्यात बुडी मारून अंघोळ आटोपून पिरियडच्या अभ्यासाला लागे.'' त्याच्या दिनचर्येचा हा नियमितपणा कायम होता.

विश्वनाथ व पढेगावातील आणखी दहा मुले यांनी मॉडर्न हायस्कूलमध्ये ॲडमिशन घेतले. त्यांचा हायस्कूलमधील पहिला दिवस मीही अजून विसरलो नाही. आज शाळेत खूपच ठेंगणी मुले-मुली आढळतात. त्याकाळी विद्यार्थी बहुतांशी उंचेले व सुदृढ असायचे. बऱ्याच उशिरा म्हणजे सहाव्या सातव्या वर्षी शिक्षणाला सुरुवात करीत. विद्यार्थ्यांचा पोषाख म्हणजे पांढरा सदरा (लांब बाह्यांचा) आणि धोतर ! जेव्हा ही मुले मॉडर्न हायस्कूलमध्ये गेली, तेव्हा पहिल्या तासालाच श्री. रानडेसरांनी ''मुलांनो, आज आपल्या वर्गात जनावरांची जमात आली पहा!'' अशी टर उडवली. श्री. रानडेसर तसे उपरोधात्मक बोलले नव्हते, पण त्यांचा असे विनोद करण्याचा स्वभावच ! सायंकाळी सर्व मुले आपापल्या वडिलांना म्हणू लागली. 'आज सरांनी आमची खूपच चेष्टा केली. वर्गातील मुले खीऽखी करत होती.' त्याकाळी माझे कापडाचे छोटेसे दुकान होते. लगेच सर्व मुलांना पायजम्यासाठी कापड कापून दिले. दोन दिवसांत सगळ्यांच्या विजारी तयार. पुढे जेव्हा अभ्यास, खेळ, वादविवाद ही सर्व क्षेत्रे पढेगावच्या मुलांनी काबीज केली, तेव्हा धोतरांना हसणारी मोठ्या घरची गुटगुटीत बाळे कान कापल्यागत वागू लागली. अभ्यासाच्या बाबतीत सर्व विद्यार्थ्यांत विश्वनाथ हुषार होता. त्याचा सर्वांत आवडता विषय गणित.

(मारुतराव घुलेपाटील, सुवर्ण महोत्सव गुणदर्शन अंकावरून २५.३.८१)

# सच्चा मित्र

## आबासाहेब निंबाळकर

### महाराष्ट्रातील केरळ

महाराष्ट्र काँग्रेस पक्ष १९५७ साली संक्रमण काळातून जात होता. अशीच एकदा त्यावेळचे मुख्यमंत्री श्री.यशवंतरावजी चव्हाण यांच्या उपस्थितीत टिळक भवन, मुंबई येथे मीटिंग घेण्यात आली. त्यासमयी मा.चव्हाणसाहेब म्हणाले, ''आबासाहेब, तुम्ही जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचे काम नेटाने सुरू करा. तुमचा नगर जिल्हा म्हणजे केरळ आहे. तुम्हाला माझी मदत राहील; शक्ती राहील. पण तरुण कार्यकर्ते तयार करा आणि पक्षाची संघटना जिल्ह्यात बांधा.''

साहेबांचे विचार मुंबईतून घेऊन मी निघालो. जिल्ह्यात काँग्रेस पक्षाच्या बांधणीस सुरुवात केली. त्यावेळी श्री. मारुतराव घुले या तरुण तडफदार युवकाकडे माझे लक्ष वेधले गेले. मी त्यांची परिसरातील समाजसेवेची, लोकात मिसळून काम करण्याची ख्याती ऐकून होतो.

### नियतीने राजकारणात

शेवगावच्या शेतकरी संघाच्या इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमास मा. श्री. यशवंतरावजी यांना मी आणले. शेतकरी संघाचे अध्यक्ष श्री. मारुतराव पाटील होते त्यांची अन् साहेबांची मी ओळख करून दिली आणि सांगितले

''आमच्या काँग्रेस पक्षाचे १९६२ चे उमेदवार श्री. मारुतराव पाटील.'' साहेबांनी पाहिले व म्हणाले, आबासाहेब तुमचे निरीक्षण योग्य आहे. कार्यक्रम आटोपल्यावर करंजीच्या घाटात मला त्यांनी सांगितले, ''आबासाहेब तुमचा उमेदवार नक्की झाला. तयारीला लागा.''

मी श्री. मारुतरावजींना सांगितले ''१९६२ च्या विधान सभेसाठी तुम्ही तयारीला लागा.'' त्यावर ते म्हणाले, ''मला माझ्या गावी राहू द्या. सेवा करू द्या. मला राजकारणात पाडू नका.'' परंतु राजकीय नियतीला बदल हवा होता. शेवटी श्री. मारुतराव तयार झाले आणि ते १९६२ साली विधान सभेवर कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवारास पाडून ते निवडून आले.

बहुजन समाजातील तरुण कार्यकर्ता, स्वच्छ पाटी, निरागस व सौजन्यशील प्रवृत्ती आणि लोकांत मिसळून काम करण्याची हातोटी यामुळे काँग्रेस पक्षास त्यांचा मोठा आधार मिळाला.

काँग्रेस पक्षाची फळी उभारणे, सांधे जोडण्याचे मी काम करीत होतो. याच काळात श्री. बाबुरावजी तनपुरे, श्री. बी.जे. खताळ, श्री. शंकरराव कोल्हे, श्री. शंकरराव काळे, यांना श्री. मारुतरावजी समवेत काँग्रेस पक्षात आणले आणि काँग्रेसपक्षाचे नगर जिल्ह्याचे अध्यक्षपदाची धुरा आम्ही त्यांच्यावर टाकली.

**शेतकरी मनाचे नेतृत्त्व**

श्री. मारुतरावजी हे खऱ्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी मनाचे आहेत. जिल्हा सहकारी बँकेवर प्रोसेसिंग सोसायटीमार्फत एक संचालक निवडून द्यावयाचा होता. त्यावेळी कै. डॉ. पद्मश्री विखे पाटील आणि त्यांचे विरोधात अकोले तालुक्यातील कै. आमरे पाटील उभे होते. जिल्हा सह. बँक आमचे ताब्यात तशी नव्हती. कै. आमरे पाटील यांना मत देणेबाबत त्यांच्यावर दडपण आले. अवघ्या एका मतावर आल्याने श्री. मारुतराव ज्यांना मत

देतील त्यांची निवड नक्की होती. शेतकऱ्याने शेतकऱ्याला मत दिले आणि कै. डॉ. पद्मश्री विखे पाटील निवडून आले. तेव्हापासून या शेती मनाच्या नेतृत्त्वास मी पाहत आहे.

मी आणि श्री. मारुतराव आम्ही दोघे १९६२ सालापासून विधानसभेत काम पाहू लागलो. जिल्हा काँग्रेसचे पद सांभाळताना त्यांनी जिल्ह्यात कार्यकर्त्यांची साखळी निर्माण केली. असेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे शिबीर आम्ही राहुरी येथे १९६५ साली घेतले. त्या शिबिराचे नियोजन आणि संयोजन त्यांनी कुशलतेने केले. याची नोंद प्रांतिकच्या इतिहासात आहे.

## धरण प्रकरणी कसोटी

शेवगाव आणि नेवासे तालुक्यातील सुपीक जमीन जायकवाडी धरणाखाली समाविष्ट झाली. त्या समयी त्यांची कसोटी शासनाने आणि जनतेने पाहिली. शासनाकडून धरण ग्रस्तांसाठी त्यांनी कायदा करून घेतला. पर्यायी जमिनी दिल्या. हे काम करीत असताना त्यांनी विरोधकांना हळूवार जपले व स्वपक्षाचे शासनाकडून प्रश्न सोडवून घेतले. त्यामुळे विरोधकही त्यांना मानतात. त्यांनी कधीही गाजावाजा केला नसेल आणि आपले प्रश्न राजमार्गाने सोडवून घेण्याची त्यांची हातोटी कुणास येणार नाही हे निर्विवाद. याचा परिणाम असा की १९६७ च्या विधान सभेच्या निवडणुकीत धरणग्रस्त भागात अधिक मतांनी ते निवडून आले.

## प्रपंचाआधी पक्ष पाहिला

महाराष्ट्राचे नेते श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या समाजवादी समाजरचनेच्या विचारांशी त्यांनी वाहून घेतले असून जिल्हाभर त्यांनी काँग्रेस पक्षाचा प्रसार आणि प्रचार केला. आपल्या प्रपंचाची त्यांनी कधी तमा केली नाही. त्यांच्या पत्नी आजारी असताना त्यांनी पक्ष संघटनेपुढे कधी फिकीर केली नाही. मी मंत्री पदावर जरी होतो तरी मला श्री. मारुतराव मित्रासारखे-

भावासारखे वाटायचे. अधूनमधून त्यांच्या मंडळींची मी विचारपूस करायचो.

माझा जिल्ह्यात असाच दौरा होता आणि समजले की श्री. मारुतराव आयुर्वेद दवाखान्यात आहेत. धावत गेलो- आणि मारुतरावांना मिठी मारली. अश्रू आवरेना- भावना राहवेना- म्हणालो, ''मारुतराव तुम्ही हे आघात कसे सहन कराल !'' त्यावर त्यांनी सांगितले ''आबासाहेब दैवयोगापुढे काही नाही''. अशा या राजकीय आणि 'आहे तसेची राहावे ' या विचारसरणीच्या माणसाचे मी मन पाहिले.

पोरका संसार झालेले श्री. मारुतराव आपला राजकीय संसार तसाच चालवू लागले. पक्ष संघटनेचा त्यांना सतत ध्यास असायचा. आमच्याबरोबर ते नेहमी असायचे. मग कार्यकर्त्यांची बैठक असो, मुंबईतील डेप्युटेशन असो, अगर एखाद्या ठिकाणी शिबीर असो. मी त्यांच्या नगरच्या यशवंत हौसिंग कॉलनीमध्येच शेजारी राहावयास आहे. सकाळी फोन करायचो आणि सांगायचो, ''मारुतराव, आज आपणास बाहेर जायचे आहे.'' तिकडून उत्तर यायचे, ''मी तयार आहे.''

आम्ही बाहेरगावच्या दौऱ्यावर निघालो म्हणजे ते आपल्या मुलांना दहिगावी गाडीत सोडून यावयास सांगत. गाडीत बसल्यावर मुले त्यांना म्हणत ''भाऊसाहेब, लवकर या''. कोणी रडायचे, कुणी हिरमुसले व्हावयाचे पण सर्वांची समजूत ते मायेच्या ममतेने काढायचे हे मी जवळून कित्येक वेळा पाहिले आहे.

### जिल्ह्याबद्दल दूरदृष्टी

१९७२ सालचे विधानसभेचे तिकीट काँग्रेस पक्षाने त्यांना देऊ केले. परंतु तरुणांना आज वाव द्यावयास पाहिजे, म्हणून तिकीट आपल्याऐवजी या भागातील जिल्हा युवक नेता श्री.यशवंतराव गडाख यांना त्यांनी देण्याचा आग्रह धरला. या तरुणास १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत यश आले

नाही म्हणून त्यांनी पक्षकार्यकर्ता खचून जाऊ नये, त्यास उमेद असावी म्हणून जिल्हा काँग्रेसच्या मिटिंगमध्ये दोन तरुणांना श्री. रामनाथ वाघ यांना जिल्हा परिषद अध्यक्ष, श्री. यशवंत गडाख जिल्हा परिषद उपाध्यक्ष करण्याची सूचना त्यांनी मांडली. आम्ही सर्वांनी ती मान्य केली.

जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष असताना त्यांनी जणू काही अध्यक्षपदाची कसोटीच घेतली. १९७२ च्या दुष्काळात त्यांनी जिल्हाभर दुष्काळी कामे राबविली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे जिल्ह्यात सर्वत्र पाझर तलाव त्यांनी शासनाकडून करून घेतले. सडकांची कामे तसेच राहुरी कृषी विद्यापीठ नगर जिल्ह्यास असावे यासाठी त्यांचा पक्षश्रेष्ठी म्हणून सिंहाचा वाटा आहे. जिल्ह्यातील ज्ञानेश्वर स.सा.का.बरोबर वृद्धेश्वर, जगदंबा, मुळा, सह. साखर कारखान्यासाठी त्यांनी आपले श्रम ओतले आहेत.

**बरोबरीची बेरीज**

त्यांनी राजकारण बेरजेचे केले असेल पण तेथे नेहमी बरोबरी पाहिली असेल. ते सर्वांचे ऐकून घेतात पण त्यांच्या मनाचा ठाव मात्र ते लागू देत नाहीत. पण कल्याणकारी विचारच ते उमटवितात. त्यामुळे विरोधकांनाही ते आपलेसे वाटतात.

ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना अविरत श्रमाने त्यांनी उभारून शेवगाव नेवासे भागास रोजगार मिळवून दिला. त्या भागातील शेती व्यवसायाला त्यांनी नवीन वळण दिले. शेवगाव-नेवासे भागातील जनतेला श्री. मारुतराव घुले हे वरदान मिळाले आहे. अशा या समाजसेवक भूपुत्रास परमेश्वर दीर्घ आरोग्य आणि आयुष्य देवो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

(मारुतराव घुलेपाटील सुवर्ण महोत्सव गुणदर्शन अंक २६.३.८१)

# सहकारातील किमयागार हरपला !

**यशवंत गडाखपाटील**

सोमवार दि. ८ जुलै २००२ चा दिवस. सकाळचे साधारणत: अकरा वाजले होते. हा दिवस इतर दिवसांच्या तुलनेने वेगळा असेल, किंवा एखादी धक्कादायक बातमी ऐकावी लागेल, अशी मनात तीळमात्र शंका नव्हती. नेवासा येथील जिल्हा बँकेच्या कार्यालयात मी बसलो होतो. समोर भेटायला आलेले असंख्य कार्यकर्ते होते. त्यांचेशी बोलत त्यांनी आणलेल्या प्रकरणाचे कागदपत्र बघत होतो. जवळच बँकेचे अधिकारी उपस्थित होते.

तेवढ्यात मुळा कारखान्यावरुन आलेल्या फोनवरून बातमी समजली, मारुतरावजी घुलेपाटील गेले! क्षणभर कानावर विश्वासच बसेना. घुलेपाटील असं अचानक जाणं कसं शक्य आहे? समजलेल्या घटनेने मन अस्वस्थ झालं. अशा अवस्थेत दहिगावला पोहोचलो. अचानक घडलेल्या घटनांमुळे एक विलक्षण व्याकुळता आणि उदासीनता अंत:करणात दाटून आली. अनेक वर्षांतील घटनाक्रमांनी मनात एकच गर्दी केली. पण जड अंत:करणाने वास्तवाला सामोरे जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

सुमारे ३५ वर्षांपूर्वी झालेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत सोनई गटातून अपक्ष म्हणून विजयी झाल्यानंतर त्यांच्याशी माझी राजकारणाच्या माध्यमातून पहिली जवळीक झाली. माझ्या राजकीय कारकिर्दीचा तसा तो प्रारंभ होता. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम

करण्यासाठी म्हणून मी काँग्रेस पक्षात यावं असा त्यांचा आणि जिल्ह्यातील इतर काँग्रेस कार्यकर्त्यांचा मला अतिशय आग्रह होता. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा माझ्यावर प्रभाव पडला. त्यांच्या वागण्या-बोलण्यातील आपुलकीने, स्नेहाने माझ्या मनात त्यांच्याबद्दल आपुलकीची आणि जवळीकतेची भावना निर्माण झाली आणि त्यातून मी काँग्रेस पक्षाचं काम करण्याचा निर्णय माझ्या सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन घेतला.

त्यानंतर सर्वानुमते झालेल्या निर्णयातून नेवासा तालुका पंचायत समितीचा सभापती म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली. पुढे पक्षाच्या माध्यमातून काम करीत असताना विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने मी त्यांच्या सहवासात आलो. परस्परांच्या स्वभावाची ओळख पटल्यानंतर आमच्यातील संबंध वृद्धिंगत होत गेले.

ग्रामीण भागाच्या विकासाचा दृष्टिकोन ठेवून स्व.यशवंतरावजी चव्हाण साहेबांनी महाराष्ट्रात जी कार्यकर्त्यांची फळी निर्माण केली, त्यात अहमदनगर जिल्ह्यातील मारुतराव घुलेपाटील, अण्णासाहेब शिंदे, आबासाहेब निंबाळकर, भाऊसाहेब थोरात यांचा प्रामुख्याने समावेश होता. चव्हाण साहेबांचा प्रत्यक्ष सहवास आणि मार्गदर्शन मारुतरावजी घुले यांना लाभले, त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वात सुसंस्कृतपणा आला. सामाजिक प्रश्नांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन विधायक होता. सामाजिक विकासाची तळमळ त्यांच्या मनात होती. त्यांच्याशी होणाऱ्या चर्चेतून जाणवलं

आपल्या सामाजिक जीवनात मारुतरावजी घुले पाटलांनी सर्वसामान्य लोकांना नजरेसमोर ठेवून अनेक योजना मार्गी लावल्या. जायकवाडी प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी संघर्ष केला आणि त्यांचे प्रश्न मार्गी लावले. बॅक वॉटरचे पाणी प्रकल्पग्रस्तांना आणि इतर शेतकऱ्यांना वापरता यावे म्हणून उपसा जलसिंचन योजनेसाठी जिल्हा बँकेच्या माध्यमातून सुविधा निर्माण केल्या. ऊस उत्पादकांना योग्य

मोबदला मिळावा म्हणून ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची उभारणी केली. त्या अनुषंगाने शैक्षणिक संस्था, कृषी विज्ञान फार्मसारखे प्रकल्प त्यांनी उभे केले. जिल्हा बँकेच्या विकासात त्यांचे मोलाचे योगदान होते.

आमचे संबंधात वैयक्तिक आणि कौटुंबिक जिव्हाळा होता. राजकारणाच्याही पलिकडे असलेलं आपुलकीचं नातं आम्ही आपापल्या परीने जपलं. नुकतीच जिल्हा सहकारी बँकेच्या चेअरमनपदी निवड झाल्यानंतर त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी मी त्यांच्या नगर येथील निवासस्थानी गेलो होतो. त्यावेळी तासभराहून अधिक काळ आम्ही मनमोकळेपणानं गप्पा मारल्या. त्यावेळी आमची तीच भेट शेवटची ठरेल असं ध्यानीमनीही नव्हतं. घुले पाटलांचं अचानक जाणं ही घटना मनाला अस्वस्थ करणारी आहे. त्यांच्या अशा अचानक जाण्याने सहकारी चळवळीची हानी झालेली आहे.

परमेश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो, हीच विनम्र प्रार्थना!

(सौजन्य. दै.सार्वमत १७.७.२००२)

❀❀❀

# मनापासून साथ करणारा आणि जिवाभावाचा मित्र

**दादा पाटील शेळके**

अत्यंत जिवाभावाचा मित्र गेल्याचे दुःख मनाला बोचत आहे. खासदारकीच्या प्रत्येक निवडणुकीत मनापासून साथ देणारे पाटील अत्यंत दिलदार होते. नगर तालुका सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत त्यांचा अत्यंत मोलाचा वाटा होता. नगर तालुक्यात सहकारी साखर कारखाना व्हावा, अशी त्यांची इच्छा होती. कारखाना उभारणीत घुले पाटलांचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले, कारखान्याची उभारणी चालू असताना घुले पाटलांनी किमान चार-पाच वेळा कारखान्याच्या साईटवर भेट दिली. कारखान्याचा बॉयलर कार्यक्रम याशिवाय एकलाखाव्या साखर पोत्याची पूजा त्यांच्या हस्ते केली होती. कारखान्याच्या कार्यक्षमतेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले होते. जिल्हा बँकेची आर्थिक मदत त्यांच्या हस्ते केली होती. कारखान्याच्या कार्यक्षमतेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले होते. जिल्हा बँकेची आर्थिक मदत व्हावी, यासाठी त्यांनी स्वतःच पुढाकार घेतला होता. सहकारी साखर कारखानदारीत नगर कारखान्याचे नाव पुढे येण्यात त्यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्यात मनाचा मोठेपणा होता, मला माझ्या व्यक्तिगत राजकारणात आणि जीवनात त्यांची अत्यंत मोलाची साथ मिळाली. समाजकारणात घुलेपाटलांनी केलेले काम उत्तुंग असून, या कामाची नोंद इतिहासाला घ्यावी लागणार आहे. मला सांभाळून घेणारा सच्चा मित्र निघून गेल्याचे शल्य मनाला टोचत आहे.

# नियतीने सच्चा मित्र हिरावून घेतला

## बाबासाहेब नरवडे

"कै. मारुतराव घुलेपाटील सामान्य माणसाचे हित जपणारे नेते होते. गेली ४६ वर्षे आम्ही जिवाभावाची मैत्री जपली. सामान्यांच्या प्रश्नांसाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. साहेबांच्या निधनाने मी एका सच्च्या मित्राला मुकलो आहे," असे ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन ना. ग. तथा बाबासाहेब नरवडे पाटील भावनाविवश होऊन सांगत होते.

मारुतराव घुले पाटलांची माझी पहिली भेट झाली ती १९५६ साली, नगरच्या दगडी दवाखान्यात. ते आजारी होते. रामभाऊ अकोलकरांनी माझी साहेबांशी ओळख करून दिली. त्यावेळी मी कम्युनिस्ट पक्षाचा, कार्यकर्ता होतो. दुसऱ्यांदा भेट झाली ती नाथांच्या पैठणला. येथूनच खऱ्या अर्थाने आमच्या मैत्रीला सुरुवात झाली. घुलेपाटील माझ्या भेटीला वारंवार खिर्डीला येत.

सामान्य माणसांचे भले व्हावे, अशी त्यांची तळमळ असायची. त्यासाठी त्यांची धडपड सुरू असे. त्यांच्या कार्यपद्धतीकडे आपण आकर्षिले गेलो. कम्युनिस्ट पार्टीला रामराम ठोकून १९६० मध्ये मी काँग्रेस पक्षात दाखल झालो.

तालुक्यात पक्षसंघटना वाढली पाहिजे म्हणून त्यांनी निष्ठेने काम केले. घुलेपाटलांनी माझ्यावर शेवगाव तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाची

धुरा सोपविली. सलग १३ वर्षे आपण ही धुरा सांभाळली.

ग्रामीण महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, यांच्या प्रगल्भ विचारांचा त्यांच्यावर पगडा होता, त्या प्रेरणेतूनच उजाड माळरानावर ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची यशस्वी उभारणी झाली. संस्थापक, संचालक म्हणून त्यांनी आपल्याला संधी दिली. एवढ्यावरच साहेब थांबले नाहीत तर मला ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन पदाची सलग बारा वर्षे संधी दिली. इतर संस्थांवरही पदाधिकारी म्हणून ते मला संधी देत होते मात्र त्यांच्या मोठेपणाच्या मनाची कदर करून संधी नाकारली.

४६ वर्षांत त्यांनी आपल्यावर जिवापाड प्रेम केले. सामान्य माणसांच्या हिताचे निर्णय घेताना प्रत्येकवेळी चर्चा केली. सामान्य माणसाला सामावून घेण्याचा, त्यांच्यातील गुण मनाला उभारी देणारा होता. त्यातून अनेक कार्यकर्ते घडले. परिणामी शेवगाव-नेवासा तालुक्यात कार्यकर्त्यांचे जाळे विणले गेले या साऱ्या सामाजिक संसारात घुलेपाटलांची प्रेरणा होती.

कै. घुले पाटलांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत असतानाच नरवडे दादांचा दूरध्वनी खणखणला. दादांनी रिसिव्हर उचलला. दूरध्वनीवर संभाषण करीत होते दादांचे ज्येष्ठ चिरंजीव आणि ना. बाळासाहेब विखे पाटील यांचे जावई माधवराव नरवडे. माधवराव सध्या आजारी असल्याने पुण्याच्या एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. कै. घुलेपाटलांच्या निधनानंतर आपल्या वडिलांच्या तब्येतीची विचारपूस करतानाच नरवडे पिता-पुत्रांचे संभाषण घुलेपाटलांच्या निधनाच्या वृत्तावर आले. वाईट घडले. मनाला हुरहुर वाटते, असे दादा बोलत होते.

शब्दांकन : शिवाजी गायकवाड

(सौजन्य : दै. गावकरी १७.७.२००२)

❀ ❀ ❀

# विचारांचा कल्पतरू

**पांडुरंग अभंग**

### गांधीजींच्या विचारांचा प्रभाव

१९६२ साल होते आणि विधान सभेच्या निवडणुकीचे वातावरण दुमदुमून गेले होते. शेवगाव आणि नेवासे मतदार संघात काँग्रेस पक्षातर्फे दहिगावचे पाटील उभे राहिले होते. परिसरातील सर्व लोक म्हणायचे, आपल्याला उमेदवार चांगला मिळाला आहे, ज्या माणसाने गाव सुधारले, परिसर सुधारला तो माणूस नक्कीच आपल्या भागाला पुढे नेईल. घराची शोभा अंगण सांगते, तसेच राजकीय पुढाऱ्यांची कर्तबगारी गावातील कामावर असते. परिसरातील लोकप्रियतेवर असते. तर त्या नेत्याच्या कार्याला शोभा असते, असे या भागातील स्वयंभू विचाराचे लोककल्याणासाठी झटणारे नेते १९६२ च्या विधान सभेसाठी प्रचाराकरिता कुकाणे येथे आले. या सभेत सर्व थरातील लोक होते. जनसमुदाय बसला होता आणि स्टेजवरून आवाज एकू येत होता. या देशात रक्तहीन क्रांती घडवून आणणारा एक पंचा आणि काठीच्या आधारे आपले जीवन कंठणाऱ्या महात्म्याने अहिंसेच्या माध्यमाने काँग्रेस पक्षाच्या रूपाने आपणास स्वातंत्र्य मिळवून दिले. समाजातील दीनदुबळ्या गरीब आणि मागासवर्गीय बांधवांसाठी काँग्रेस पक्षाने आपले मार्ग आखले आहेत. त्या ध्येयधोरणाने आपण जात आहोत. काँग्रेस पक्षच आपली प्रगती करून देईल.''

लोकसर्व मंत्रमुग्ध झाले होते. गांधीजींचे विचार सांगणारा, समाजवादाचे विचार ऐकविणारा कोण तरुण आहे, याची मला उत्सुकता होती आणि समजले की, हेच ते तरुण दहिगावचे श्री. मारुतराव घुलेपाटील होते.

## सर्वांचा विचार, सहकार्याने निर्णय

शेवगाव आणि नेवासे भाग म्हणजे कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला या बालेकिल्ल्यावर त्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या विजयाची पताका लावली आणि श्री. घुलेपाटील १९६२ साली विधान सभेवर सर्वात तरुण आमदार म्हणून निवडून आले. कार्य करण्याची धमक, बहुजन समाज व अल्पसंख्याक समाज यांना हवेसे वाटणारे आणि कामाचा दांडगा उरक असणारे श्री. मारुतीरावजी यांना कॉंग्रेस पक्षाचे श्रेष्ठींनी जिल्हा कॉंग्रेस अध्यक्षाची धुरा दिली आणि जिल्हाभर त्यांनी पक्षाची साखळी गुंफली. कार्यकर्त्यांचे जाळे तयार केले. कुणा मंत्र्याचा कार्यक्रम असो. कुणा संस्थेचे इलेक्शनचे निर्णय असोत्. कार्यकर्त्यांची मिटिंग असो तेथे श्री. घुलेपाटील यांनी सांगायचे तोच निर्णय कायम राहयचा. असा निर्णय देताना सर्व कार्यकर्त्यांची विचारपूस करणे; त्यांच्या मतांना प्रतिसाद देणे आणि योग्य असेल तेच त्यांच्या गळी उतरविणे ही कमालीची कसरत असते; अशा कसरतीत ते मुरलेले आहेत. असा प्रसंग आला तर बैठकीत म्हणतात. 'मला असे वाटते आबासाहेब आणि हे पद्मश्रींनाही आवडेल, काय शंकरराव मी बोलतो ते बरोबर आहे ? नाही का बाबुरावजी !' बोलत असतानाच; सांगत असतानाच ते सर्व सहकाऱ्यांना आपल्या विचाराशी सामावून घेतात आणि त्या बैठकीतला निर्णय देतात. त्यांच्या अशा वागणुकीमुळे जिल्ह्यातील कोणताही पुढारी असो, ते म्हणायचे मी मारुतरावांना विचारतो, त्यांचे कानी घालतो. इतका आदरभाव त्यांनी मिळविला आहे. सामाजिक काम करीत असताना काही निर्णयामुळे माणसे दुखावली जातात पण श्री.घुलेपाटील यांनी कुणासही कधी दुखविलेले नाही.

**धरण समस्येत कठीण परीक्षा**

जिल्हा बांधणीचे कामाबरोबरच धरणग्रस्तांचे नवजीवन वसविण्याचे काम त्यांना करावे लागले. काँग्रेस पक्षाचे शासन आहे आणि त्या शासनावर कसे बोलावे असे स्वाभाविक होते. परंतु त्यांनी शासनाकडून सर्व प्रश्न, शासनाने गळी उतरवून सोडवून घेतले आहेत. धरणग्रस्तांच्या त्यागाची जाणीव त्यांनी शासनास करून दिली. हक्काचे साधन म्हणून या भागासाठी ज्ञानेश्वर कारखान्याची मंजुरी मिळविण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री अण्णासाहेब शिंदे यांचे सहकार्य मिळाले.

कारखानदारीची काहीही माहिती नसणारे आमचे साहेब एक यशस्वी कारखानदार झाले. कारण प्रत्येक विषयाची जाणीवपूर्वक माहिती घेणे, अचूक निर्णय देणे, समयसुचकता आणि प्रसंगावधान; तसेच काम करून घेण्याची हातोटी आणि दूरदर्शी व्यवहारीपणा, कुशल संघटना आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व या गुणांचा संगम त्यांच्यात आहे.

आज ज्ञानेश्वर सा. कारखाना जिल्ह्यात प्रथम क्रमाकांने चालू आहे. त्या पाठीमागे साहेबांचे प्रकाशमय नेतृत्व आहे. त्याच प्रकाश झोतात आम्ही कार्यकर्ते मार्गक्रमण करीत आहोत, असे बोलले तर वावगे होणार नाही.

मा. खा. यशवंतरावजी चव्हाण म्हणत "मला सत्तेचा मोह नाही. पण कार्यकर्त्याचा मोह मात्र जरूर आहे. तसेच मारुतरावांचे आहे. त्यांनी सत्तेसाठी कधीच आटा पिटा केलेला नाही. परंतु कार्यकर्ते जोडण्यासाठी, कार्यकर्ते मिळविणेसाठी ते नेहमी बेरजेचे कारण करतील. त्यांनी जमविलेल्या बेरजेच्या आकड्याला ते मनाच्या सद्‌भावनेच्या आकड्याने गणतात त्यावेळी संख्या अधिकच होते. म्हणून साहेब म्हणजे चढत्या गणिताचे गुणकयंत्र होय."

**आघात सोसाणारा देवमाणूस**

मानवी आघात सहन करणारा माणूस असतो तर दैवी आघात सहन

करणारा देव माणूस असतो. दैवाने असाच त्यांच्यावर आघात केला आणि त्यांच्या पत्नीचे निधन झाले. पण हे सारे सहन करण्याची ताकद साहेबांमध्ये आहे. केवळ दैवी शक्ती त्यांच्याजवळ असावी असे वाटते. सांसारीक जीवनात मुलाबाळांची देखभाल तेच करतात. हे करीत असताना त्यांचे मन गहिवरून येत असेल, याची जाणीव कुणालाच येत नसेल. कारण हसत हसत सर्व प्रसंग सांभाळून घेणे हा त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव; जणू काहीच घडले नाही असेच आज कुणालाही वाटते.

त्यांची प्रकृती त्यांना साथ देत नाही. अशा वेळी ते मनाने विश्रांती घेतात. कुठेतरी, कोणत्यातरी दवाखान्यात अज्ञात स्थळी जाऊन थांबतात. केव्हातरी कळते साहेब आजारी होते. दवाखान्यात होते, आपल्या दुःखाचा वाटा ते कुणासच देत नाहीत. दुःख पचविण्याची ताकद त्यांच्यात सामावलेली आहे.

**विचाराचा कल्पतरू**

**जीवन त्यांना कळले हो।**

**मी पण ज्यांचे पक्क फळापरी सहजपणाने गळले हो।।**

अशी काव्यपंक्ती कुठेतरी वाचण्यात येते. पण मला प्रत्यक्षात साहेबांचे बाबतीत अनुभव आला. त्यांना जीवन कळले होते. मी पण त्यांचे जवळ अजिबात नाही. उलट अनेकांना त्यांनी मोठे करून स्वतःस दूर ठेवले आहे. माझ्यासारख्या शेतकरी कुटुंबातील सामान्य कार्यकर्त्याला विधानसभेची उमेदवारी देऊन व माझ्यापाठीमागे पूर्ण ताकदीनिशी उभे राहून मारुतरावजींनी मला विधानसभेत पाठविले. हा क्षण माझ्या जीवनात जसा भाग्याचा आहे. तसा महाराष्ट्राने आदर्श घ्यावा असा आहे.

महाराष्ट्राचे भाग्यविधाते श्री. यशवंतराव चव्हाण यांनी सतत उमलत्या नेतृत्त्वास वाव निर्माण करून दिला आहे. ग्रामीण भागातील तरुण, सुशिक्षित आज महाराष्ट्रात दिसतात. तसेच शेवगाव नेवासे-परिसरात साहेबांनी उमलत्या

नेतृत्त्वास वेळीच चालना दिली आहे. ते कल्पतरूसारखे दिसतात. समाजासाठी जीवन जगणारे श्री. मारुतरावजी ही व्यक्ती नसून विचार आहे. सामाजिक बांधिलकीची एक संस्था आहे. महाराष्ट्राची निष्ठा आहे. यशवंतरावांची भक्ती आहे, श्री. घुलेपाटील यांना परमेश्वर दीर्घ आयुष्य देवो, त्यांच्या कर्तृत्त्वास माझे विनम्र अभिवादन !

(दीपस्तंभ गौरव अंक १५.९.२०००)

# आता उरल्या आठवणी

## देसाई देशमुख

मारुतराव घुले यांच्याबरोबर काम करण्याचे भाग्य मला लाभले. त्यांच्या निधनानंतर आठवणींचा पटच डोळ्यासमोर उभा राहिला. श्री. घुले आमदार असताना एकदा त्यांच्याबरोबर मतदारसंघात कार्यक्रमासाठी जात होतो. प्रवासात अनेक प्रकारच्या गप्पा चालू होत्या. मी नुकतेच शिक्षण पूर्ण करून घरी आलो होतो. शिकारीचा नाद होता. अधूनमधून शिकारीला जात असे. हरणांचा कळप गाडीसमोरून मोठ्या वेगात निघून गेलेला आम्ही पाहिला. माझी शिकारीची उर्मी जागी झाली. मारुतरावांना मी सहज म्हणालो, ''माझ्याजवळ रायफल असती, तर आज शिकार केली असती.'' त्यावर ते म्हणाले, ''या प्राण्यांना पाहून जो आनंद मिळतो, तो त्यांना मारून कसा मिळेल?'' वन्यप्राण्यांच्या प्रेमापोटीच की काय, त्यांच्या शेतात हरीण असे.

सन १९७७ च्या पावसाळ्यात घुले यांच्या समवेत मोटारीने नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातून येत होतो. सोबत वा.रा. पवार गुरुजी होते. येताना एका ओढ्याला खूप पाणी आले होते. आम्हाला येण्याची घाई असल्याने चालकाला त्यांनी गाडी पाण्यातून घेण्यास सांगितले. पण गाडी मध्येच बंद पडली. पवार गुरुजी घाबरले आणि त्यांनी पटकन दार उघडून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. दार उघडताच ओढ्याचे पाणी गाडीत शिरले व पाण्याच्या दबावामुळे गाडी पलटी होऊ लागली. मारुतरावांनी प्रसंगावधान

राखून ताबडतोब दुसऱ्या बाजूचे दार उघडले. त्यामुळे पाणी दुसऱ्या बाजूने निघून गेले आणि गाडी पलटी होण्याची थांबली. दुर्घटना टळली. मारुतराव म्हणाले, कृती करण्यापूर्वी परिणामाची जाणीव आपण ठेवली पाहिजे, नाहीतर जीवनात नेहमी धोका संभवतो.''

मारुतरावांची स्मरणशक्ती अतिशय तल्लख होती. सन १९७४ मध्ये आम्ही कराडला जात होतो. दूरचा प्रवास असल्याने कंटाळा येऊ नये म्हणून मारुतराव आणि पवार गुरुजींनी कवितेच्या भेंड्या सुरू केल्या. पवार गुरुजी हाडाचे शिक्षक असल्याने आणि त्यांचे आयुष्य शिक्षकी पेशात गेल्यामुळे त्यांच्याकडे कवितांचा संग्रह भरपूर होता. परंतु आश्चर्याची बाब की, मारुतरावांनी त्यांच्या बालवयापासून पाठ्यपुस्तकात असलेल्या सर्व कविता जशाच्या तशा म्हणून दाखविल्या. पवार गुरुजींना त्यांनी हरविले!

जीवनातील आनंद व दुःखाचे प्रसंग तटस्थपणे झेलण्याचे सामर्थ्य मारुतरावांकडे होते. सन १९९० च्या विधानसभा निवडणुकीमध्ये अपयश आल्यानंतर आम्हा सर्व कार्यकर्त्यांना अतिशय वाईट वाटले. पण त्यांच्यापुढे जाण्याचे धाडस होईना. त्यांच्याकडे जाऊन काय बोलावे, हे कुणासही सुचत नव्हते. आम्ही दोन-तीन कार्यकर्ते त्यांच्यापुढे जाऊन सुन्नपणे बसलो, मारुतरावांनी बोलण्यास सुरुवात केली. जणू काही घडले नाही, अशा पद्धतीने ते गप्पा मारू लागले. 'अशा किरकोळ गोष्टींना महत्व द्यायचे नसते.' असे सांगून त्यांनी नेहमीची चर्चा सुरू केली. यशाचा उन्माद त्यांना कधी चढला नाही की अपयशाने कधी ते खचून गेले नाही नाहीत. त्यांच्या या वृत्तीमुळे कार्यकर्त्यांना शक्ती मिळत असे. त्यांच्या मृदू भाषणाने, मुत्सद्दी वागण्यामुळे त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाच्या मनात आपुलकी निर्माण होत असे. क्वचितच कठोर शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडत.

लोकांना काही अडचण आहे, हे त्यांना समजले की, ते धावून जात असत. हा त्यांचा स्थायी स्वभावच होता. नेवासे बार असोसिएशनच्या लोकांना

अपघात झाल्याचे समजताच त्यांनी अतिशय वेगाने मदत पाठविली. जखमी वकिलांची स्वतः भेटून विचारपूस केली. राजकारणाच्या धावपळीच्या आयुष्यात वाचनाचा व्यासंग त्यांनी जोपासला. सदानंद मोरे यांनी तुकाराम महाराजांवर लिहिलेला ग्रंथ त्यांनी वाचला होता. त्याबाबतची चर्चा ते माझ्याशी नेहमी करीत असत. साने गुरुजींचे साहित्य त्यांनी वाचून काढले होते. त्यांना वारकरी संप्रदायाबद्दल विशेष आस्था होती. हरिकिर्तन, प्रवचन ऐकण्यासाठी ते मुद्दाम वेळ देत. तसे कार्यक्रमही ते घडवून आणत असत. अध्यात्माकडे त्यांचा विशेष ओढा होता. कीर्तनाच्या ध्वनीफिती ते नेहमी ऐकत.

मारुतसव हे ज्ञानेश्वर सहकारी कारखान्याचे संस्थापक अध्यक्षच नव्हे, तर कुटुंबप्रमुख होते. त्यांच्या जाण्याने सर्वांना आपल्या कुटुंबातील वडिलधारा माणूस गेल्याचे दुःख झाले आहे. त्यांच्यासारखा अनुभवी नेता, गोरगरिबांचा आधारवड आता राहिला नाही, ही खंत कायम सहणार आहे.

शब्दांकन: अनिल गर्जे (दै. लोकसत्ता १७.७.२००२)

❀❀❀

Jijamata Science & Arts College * D.Nagar *
Library
21397

# मारुतराव पाटील : महामानव

## सुधाकर शेरकर

पाच-सहा महिन्यांपूर्वीची ही गोष्ट, त्या दिवशी संचालक मंडळामध्ये मालकांनी हा विषय मांडला. शेतकऱ्यांकडे असलेल्या थकबाकीच्या २५% रक्कम बँकेने भरावयाचे ठरले. लगेच वीज मंडळाचे सुपरिटेंडिंग इंजिनियर व एक्झिक्युटिव्ह इंजिनियर यांच्याशी फोनवरून बोलणे झाले. त्यांना ही योजना पटली. परंतु ते म्हणाले आमच्या चेअरमन साहेबांशी बोललात तर बरे होईल. बँकेचे चेअरमन साहेब आमदार श्री. यशवंतराव गडाख यांनी व मालकांनी लगेच वीज मंडळाचे चेअरमन यांच्याशी फोनवरून चर्चा केली. त्यांनाही ही योजना पटली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडे रु २०५/- कोटींची वीजबिलांची थकबाकी होती. त्यापैकी २५% म्हणजे रु.५०/- कोटी बँकेने कर्जरूपाने अर्थसाह्य द्यावयाचे ठरले. लगेच सर्व शाखांना परिपत्रक पाठविण्यात आले व त्याच दिवशी सायंकाळी डी.पी.सुरू करण्यात आल्या व शेतकऱ्यांचं वीज कनेक्शन सुरू होऊन पिकांना पाणी मिळाले.

अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या प्रश्नांची/गरजेची/नेणीवांची/जाणीवांची जाण असणारे हे सुजाण नेतृत्व होते.

ज्ञानेश्वर कारखान्याच्या उद्घाटनप्रसंगी आधुनिक भारताच्या कृषी औद्योगिक क्रांतीचे जनक मा.श्री.यशवंतरावजी चव्हाण म्हणाले होते, ''मारुतरावांना मी आजवर आमदार म्हणून पाहिले होते. परंतु मारुतराव आज

साखर कारखानदार झाले आणि माझ्या डोळ्याचे पारणे फिटले.

**उदंड पाहिले, उदंड ऐकिले, उदंड वर्णिले क्षेत्र महिमे।**

**तुम्हा अनाथा कारणे। पंढरी निर्माण केली देवे।**

असे हे मालक. गेल्या चाळीस बेचाळीस वर्षांतील त्यांच्या सहवासातील अनेक आठवणी हृदयात दाटून आहेत. मालक बँकेचे चेअरमन असतानाची गोष्ट. बँकेतील कामगार युनियनबरोबर पगारवाढीची चर्चा झाली. पगारवाढ मंजूरही झाली. परंतु दरम्यानच्या काळात मालक आजारी झाले व त्यांना पुण्याला के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले होते. चेअरमन म्हणून त्यांची करारपत्रावर सही असल्याशिवाय वाढीव पगार देता येत नव्हते. २/३ अधिकारी पुण्याला मालकांना भेटावयाला म्हणून गेले. तेथे विषय निघाला आणि मालकांनी हॉस्पीटलच्या बेडवर असताना करारपत्रावर सही केली. सेवकांचे प्रश्न जिव्हाळ्याने सोडविण्याची त्यांची मनोवृत्ती होती.

मालकांच्या अचानक जाण्यामुळे महाराष्ट्रातील एक सुजाण/सुसंस्कृत व गोरगरीब शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून त्यांची सोडवणूक करणारा नेता हरपला आहे. घरातीलच एखादी व्यक्ती जावी, असे दुःख प्रत्येकाच्या मनात आहे. युगांचे नाते जसे, सुटावे एकाक्षणी तसे होते तुमचे एकाएकी जाणे.

मालक तुम्ही महामानव होतात. आज जरी शरीररूपी तुम्ही आमच्यात नसलात तरी तुमचे अस्तित्व सर्वत्र जाणवत आहे. आपल्याच पुण्याईच्याबळे, आम्ही वाटचाल करणार आहोत.

या महामानवास श्रद्धांजली...

(दै. लोकमत १७.७.२००२)

❀ ❀ ❀

# पूजनीय व्यक्तिमत्व : स्व. मारुतराव घुलेपाटील

भय्यासाहेब देशमुख

नवमहाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला दिशा दिली. कार्यकर्त्यांना ते सांगत, आता आपणास देश घडवायचा आहे. त्यासाठी देशात एकता निर्माण झाली पाहिजे. देश विकासाची लंबी सफर सुरू झाली आहे. आपण सर्वांनी या लोकशाही समाजवादी दिंडीत सामील झाले पाहिजे. या विचाराचे पडसाद अहमदनगर जिल्ह्यातही उमटले. अहमदनगर जिल्ह्यात कै. आबासाहेब निंबाळकर, कै. पद्मश्री विखे पाटील, कै. अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात, शंकरराव काळे व कै. मारुतराव घुलेपाटील आदी नेत्यांनी साहेबांच्या लोकशाही, समाजवादी व कृषी औद्योगिक विचारांची पताका खांद्यावर घेऊन सामान्यांपर्यंत जिल्हा व परिसराच्या विकासाकरिता वैचारिक बैठकीचा, सामुहिक नेतृत्वाचा पाठपुरावा करीत राहून समाजकार्याला वाहून घेतले. कै. मारुतराव घुलेपाटील असे होते, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

माणसे मोठी होतात. त्यांच्या कर्तुत्व गुणाने आणि त्यांच्या कार्यक्षमतेने त्यांना भाग्यविधाता हा तिलक लागतो. समाजकारण, राजकारण आणि सहकार यातून समाजसेवेचा ध्यास धरणारे, वर्तमानाचा पाया भूतकाळ तर भविष्याचा पाया वर्तमान आहे याचे भान त्यांनी सातत्याने राखले. समाजाचे ऋण फेडण्याची जाण ठेवून कार्यकरत राहिल्यास आत्मिक समाधान लाभते,

अशी समाधशनीवृत्ती जोपासणारे स्व. मारुतराव घुलेपाटील यांच्या समाजसेवेचा श्रीगणेशा गावपातळीवरून झाला. दहीगावी सहकार सोसायटीची स्थापना, जनताशिक्षण संस्थेची स्थापना व ग्रामपंचायतीतील सर्वाभिमुख कारभार. गावातील समजोता व समन्वय साधून शिक्षण, सहकार व पंचायत राजविचार त्यांनी गावपातळीवर रुजविले. गेल्या २० वर्षांपासून ग्रामपंचायतीत मागसवर्गीय महिलांसाठी सरपंच पद देऊन महिलांचा त्यांनी सन्मान केला होता. आज महिला धोरणांचा उदोउदो होत आहे परंतु स्व. घुलेपाटील यांनी यापूर्वीच महिला धोरणांचा विचार रुजविला होता. स्व. घुलेपाटलांना दूरदृष्टी होती.

शेवगाव तालुका मार्केट कमिटी, खरेदी-विक्री संघ, शेतकी संघ, या संस्थावर व जिल्हा सहकारी बँकेवर संचालक पदी काम करून त्यांनी आपल्या कार्याची मुद्रा कोरली होती. जनसेवा हा कार्याचा मूळ गाभा असणारे, ग्रामीण नेतृत्व करणारे स्व. घुलेपाटील यांच्या कार्याची सीमा जिल्हापातळीवर गेली होती. जिल्हाचे नेते आबासाहेब निंबाळकर, बाळासाहेब भारदे यांनी काँग्रेस पक्षाच्या कार्यासाठी त्यांनी प्रेरित केले होते. याच काळात महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्व काँग्रेस पक्षाला मिळाले, त्यांनी महाराष्ट्रभर दौरा केला. कार्यकर्त्यांची बांधणी केली. नगर जिल्ह्यातही त्याचप्रमाणे घडले होते. स्व. मारुतराव घुलेपाटील हे १९६२ साली शेवगाव-नेवासा विधानसभेवर आमदार म्हणून निवडून गेले. पुढे ७२ ते ७८ पर्यंत विधानसभा व विधान परिषदेवर आमदार म्हणून त्यांनी काम पाहिले. जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून काम पाहून त्यांनी पक्षाची बांधणी केली. राहुरी येथे महाराष्ट्र काँग्रेसचे शिबीर यशस्वीपणे आयोजित केले. राहुरी कृषी विद्यापीठाची मागणी करण्याकामी पुढाकार घेतला, तर मुळा धरण व जायकवाडी धरणाच्या धरणग्रस्तांकरिता कायदा करावा, अशी मागणी केली होती. धरणग्रस्तांसाठी कायदा करण्यास भाग पाडणारे स्व. घुलेपाटील हे महाराष्ट्रातील पहिले आमदार होते.

केवल विचार करून न थांबता विचाराला कृतीचे जोड देऊन शेवगाव-नेवासा तालुक्यातील धरणग्रस्तांना रोजगार मिळावा, विस्थापितांचे जीवनात स्थिरता यावी याकरिता ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना करून कारखाना उभा केला. यशस्वी कारखाना म्हणून ज्ञानेश्वर कारखान्याने लौकिक मिळविला. ऊस उत्पादक सभासद असो, अगर बिगर सभासद असो, त्यांना सारखा भाव देण्याचा पायंडा स्व. घुलेपाटील यांनी घालून दिला होता. जायकवाडी जलाशयातील लिफ्ट योजना राबवून गोदावरी काठावर हिरवा पट्टा निर्माण केला. सर्वसामान्य माणसाच्या जीवनात पत आणि अर्थ निर्माण करून समृद्धीचा पाझर निर्माण केला. आर्थिक सक्षमता, उत्तम नियोजन, अचूक निर्णय यांमुळे कारखान्याची प्रगती होऊन राष्ट्रीय पातळीवर कारखान्यास ४ पारितोषिके मिळाली. कारखाना संचालक मंडळ हेच शिक्षण संस्थेचे संचालक मंडळ असणाऱ्या ज्ञानेश्वर कारखान्याचा लौकिक म्हणजे स्व. मारुतराव घुलेपाटील यांच्या कर्तृत्वगुणाचा बावनकशी पुरावा , असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे ४ वेळा समर्थपणे चेअरमनपद सांभाळून बँकेचा लौकिक त्यांनी वाढविला होता. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीमुळे ग्रामीण भागाचा कायापालट झाला आहे. परिसरातील सामान्य माणसाच्या जीवनात आर्थिक आणि शैक्षणिक परिघात मारुतराव घुले शिक्षण संस्थेने शैक्षणिक प्रगती साकार केली आहे. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष स्व. मारुतराव घुले यांच्या जाणत्या विचाराने, शिक्षकाचे सेवाभावी वृत्तीने आणि शिक्षणसंस्थेच्या व्यवस्थापनाच्या मार्गदर्शनाने विद्यालय यशाचे धवल शिखर गाठण्याकडे वाटचाल करीत आहे.

स्व. मारुतराव घुलेपाटील यांनी ग्रामीण विद्यार्थी, विशेषत: गरीब विद्यार्थी केंद्रबिंदू मानून प्रत्येकाने योगदान द्यावे, असा मंत्र सर्वांना दिला होता. आज विद्यालय रौप्य महोत्सवाकडे वाटचाल करीत आहे.

स्वत:च्या प्रकृतीची काळजी घेऊन समाजाच्या प्रकृतीची जपणूक

करणारे स्व. घुलेपाटील सतत शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रयत्नशील राहिले. पाठीवर हात फिरवून गत आठवणींना उजाळा देत वर्तमानातील समाचार घेण्याचा कै. यशवंतराव चव्हाण यांचा गुण तसेच माजघरातील बैठकीत कार्यकर्त्यांना सल्ला देण्याचा कै. वसंतदादा पाटील यांच्या गुणांचा समन्वय म्हणजे स्व. मारुतराव घुले होते. शेतकरी व कामगार जीवनाशी एकरूप झालेले स्व. घुलेपाटील यांचे मन शेतकऱ्यांचे, बुद्धी विचारांची, श्रद्धा भाविकांची, प्रसन्नता फुलांची, धीरगंभीरता सागराची, विचार वडिलकीचा आणि मार्गदर्शन दीपस्तंभासारखे असणारे, सर्वांच्या मनात घर करून बसलेले स्व. मारुतराव घुलेपाटील हे होते.

त्यांचे सुपुत्र आमदार नरेंद्र घुलेपाटील व चंद्रशेखर घुलेपाटील यांच्यावर काळाने अकस्मात आघात केला. त्यांच्या ह्या दु:खाला तोंड देण्याची ताकद परमेश्वर त्यांना देवो.

आमचे आधारस्तंभ, मार्गदर्शक, हितचिंतक व सार्वजनिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील पूजनीय असे व्यक्तिमत्त्व असणारे स्व. मारुतराव घुलेपाटील आज आपणात नाहीत. त्यांनी दिलेला वारसा आणि वसा शाबूत ठेवणे ही त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

(दै. गावकरी १७.७.२००२)

## कर्मयोगाचे उपासक स्व. मारुतराव घुले पाटील

दिनकरराव टेकणे

लोकनेते स्व. मारुतरावजी घुलेपाटील यांच्या दुखःद निधनाची बातमी समजल्यानंतर प्रथम या गोष्टीवर विश्वास बसला नाही. परंतु नियतीलाच हे मान्य असल्यामुळे हे सत्य आहे असे समजले आणि मन सुन्न झाले. डोळ्यापुढे अंधार झाला आणि काहीच सुचेनासे झाले.

स्व. मालकांशी (स्व. घुलेपाटील यांना आदराने मालक म्हटले जात असे) माझा परिचय मुख्याध्यापक नेमणूक मुलाखतीमध्ये झाला. मुलाखत झाल्यानंतर मालकांनी मला बोलावून घेतले व आपली निवड झाली आहे; असे सांगून काम हा एकच जीवनमंत्र दिला.

मला आश्चर्य वाटले, कारण माझा व त्यांचा परिचय नव्हता. पूर्ण विश्वस्त मंडळ मला अपरिचीत होते. नोकरीला घेताना अनेक बाबींचा विचार होतो. जवळच्या माणसाला घेतले जाते असा माझा गैरसमज होता. त्यामुळे माझी निवड होईल याची मला अजिबात खात्री नव्हती. परतुं साहेबांनी माझी निवड करून गुणवत्तेनुसार सामान्यातील सामान्य, तळागाळातील व्यक्तिला या ठिकाणी कामाची संधी दिली जाते. हे मला व परिसराला कृतीने आदर्श घालून सिद्ध केले. काम करा या दोन शब्दांनीच मला अमोल जीवनमंत्र दिला व परिसरातील शेतमजुरांच्या कुटुंबातील व्यक्तीस काम करण्याची संधी देऊन सातत्याने प्रेम, माया, आपुलकी, मार्गदर्शन व आत्मविश्वास देऊन माझे

जीवनाचे सोने केले. मातीचे सोने करण्याची किमया या महापुरूषाला होती याची मला प्रचिती आली.

कर्मचाऱ्यांवर सातत्याने मायेचे हात फिरविणारे, पूर्ण विश्वास टाकून कौशल्याने काम करून घेणारे, केलेल्या कामाचे कौतुक करणारे, शाबासकीची थाप टाकणारे चांगल्य कामाची नोंद घेऊन प्रशंसा करणारे व सामान्य माणसांचे भले करणे हा एकच ध्यास असणारे ऋषीतूल्य असे आमचे मालक होते.

विद्यालयातील कार्यक्रमास सतत उपस्थितीत राहून प्रोत्साहन, प्रेरणा व नेहमी जीवनगीता सांगणारे आमचे साहेब नुकत्याच विद्यालयात झालेल्या शेवटच्या जाहीर कार्यक्रमात ते असे म्हणाले, आज सांगणारे फार आहेत. ऐकणारे फार आहेत. पण करणारे फार कमी आहेत ही खंत बाळगून सर्वांनी दिलेले काम प्रामाणिक करा हा मोलाचा संदेश दिला. मालक कर्मयोगाचे सच्चे उपासक होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातच कमी खर्चात शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली पाहिजे. रोजगार उपलब्ध होऊन धंदे शिक्षण मिळाले पाहिजे त्या दृष्टीने धंदेशिक्षणाची सुविधा व्हावी ही दूरदृष्टी ठेवून या ठिकाणी तांत्रिक शिक्षण, फुलझाडे बागकामशास्त्र, व्यावसायिक शिक्षण, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कृषी अभ्यासक्रम, माध्यमिक विद्यालय, उच्चशिक्षणासाठी महाविद्यालय सुरू करून ग्रामीण भागातील सामान्य माणसाला विविध शिक्षणाची दारे खुली केली.

शिक्षण, सहकार, समाज व राजकारणात मालकांचे महान कार्य आहे. साहेबांनी तळागाळातील माणूस शोधून त्यास आधार, माया, प्रेम, ममता, आत्मविश्वास, मार्गदर्शन करून माणूस म्हणून उभा करण्याचे अमोल कार्य केले आहे. ती सृष्टी एकप्रकारे अद्वैत शिकवीत असते. मेघ सारे पाणी देऊन टाकतात. फुले सुगंध देऊन टाकतात. सूर्य, चंद्र प्रकाशात देतात, साहेब तुम्ही तर तुमचं सर्व जीवनच दिलत. माझ्यासारख्या परिसरातील अनेकांना

जीवनात उभे करण्याचे प्रपंच फुलविण्याचे कार्य मालकांनी केले आहे. माझा जो अनुभव तोच इतरांचा निश्चित असेल.

माझ्या मालकांच्या अचानक जाण्याने आपणा सर्वांनाच दुःख झाले आहे. घुले कुटुंबियांवर मोठा आघात झाला आहे. या दुःखातून त्यांना सावरण्याची परमेश्वर शक्ती देवो ही परमेश्वरास विनम्र प्रार्थना.

मालकांच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी त्यांनी दिलेले काम करा. या कर्मयोगाचे आपण सर्व उपासक होऊन भविष्यात एक दिलाने, संघटीतपणे आमदार नरेंद्र पाटील घुले व चेअरमन शेखरभाऊ पाटील घुले यांच्या ध्येयधोरणांशी एकनिष्ठ राहून त्यांच्या कार्याचा आदर्श पुढे नेण्यासाठी परमेश्वर त्यांना शक्ती देवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

श्री. मारुतराव घुलेपाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शिक्षण केंद्राची १७ जुलै १९८० रोजी स्थापना झाली व १७ जुलै २००२ रोजी साहेबांचा दशक्रियाविधी होत आहे. हा नियतीचा विलक्षण योगायोग होय. या निमित्ताने आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

**स्मिते जयांची चैतन्यफुले**
**शब्द ज्यांचे नवदीप कळे**
**कृतीत ज्यांच्या भविष्य उजळे**
**चंदनपरी जे झिजती**
**तेथे कर माझी जुळती ॥**

(दै. गावकरी १७.७.२००२)

❀❀❀

# कै. मारुतरावजी घुलेपाटील : एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व

आर. एम. जगधने

कै. साहेबांना नियतीने आपल्यातून हिरावून नेले हे अजूनही मनाला पटत नाही. त्यांचा इहलोकीचा प्रवास संपला असला, तरी इथल्या मातीत, झाडात, शैक्षणिक, औद्योगिक प्रकल्पात, धरणग्रस्तांच्या मनामनात, परिसरातल्या विकासकामांत त्यांचा कीर्तिसुगंध दरवळतो आहे. ज्ञानेश्वर कारखान्याच्या परिसरातील अणु-रेणूला त्यांच्या कर्तृत्वाचा स्पर्श झाला आहे.

ज्ञानेश्वर कारखान्याचे कार्यकारी संचालक म्हणून तब्बल एक तप (कै.) साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळाली. रात्रंदिवस चिकाटीने, प्रामाणिकपणे काम करून या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न मी केला. (कै.) साहेबांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाची प्रचिती वेळोवेळी आली. अत्यंत अभ्यासू व्यक्तिमत्व, कुशल प्रशासन, सर्वांची मते समजावून घेऊन निर्णय करण्याची व निर्णयांशी ठाम राहण्याची त्यांची भूमिका प्रशंसनीय होती. काटकसरीने कारभार करण्याची त्यांची शैली, दूरदृष्टीने निर्णय घेण्याची त्यांची क्षमता, सर्वांशी समजूतदारपणाने वागण्याची त्यांची लकब यामुळे ज्ञानेश्वर कारखान्याला राज्य व राष्ट्रीय स्तरावरची अनेक मानचिन्हे मिळाली. परिसरात शिक्षण संस्था उभारून गोरगरिबांच्या मुलांमुलींसाठी त्यांनी शिक्षणाची कवाडे खुली केली. गोदावरीच्या फुगवट्याच्या पाण्यावर उपसा जलसिंचन योजना राबवून त्यांनी धरणग्रस्तांचे संसार सुखी केले. परिसरातील सुशिक्षित

बेरोजगोरांना, हातावर पोट असणाऱ्यांना कारखान्यामुळे रोजगाराच्या संधी मिळाल्या. हजारो कुटुंबे सुखी झाली.

(कै.) मारुतरावजी घुले पाटलांचे व्यक्तिमत्व सात्त्विक होते. त्यांच्या अंत:करणात गोरगरिबांबद्दल कळवळा होता.

अभ्यासू वृत्तीने निर्णय घेण्याच्या त्यांच्या कार्यपद्धतीमुळे ज्ञानेश्वर कारखान्याची प्रगती झाली. सदैव हसतमुख असणारे त्यांचे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. लाखाचा पोशिंदा आपल्यातून निघून गेला आहे. त्यांच्या निधनामुळे परिसराची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या कार्याचा कीर्तिसुगंध पिढ्यानूपिढ्या दरवळत राहणार आहे. आमच्या या मार्गदर्शकाला आमचे विनम्र अभिवादन.

❀ ❀ ❀

# सामाजिक परिवर्तनाचे भान असणारा नेता

व्ही. टी. कसार

ज्ञानेश्वर साखर कारखान्यामध्ये ४ वर्षे चीफ केमिस्ट व ६ वर्षे कार्यकारी संचालक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. या कालावधीत मा.मारुतराव घुलेपाटील यांच्याशी अत्यंत जवळचे संबंध आले. कारखान्याबद्दल तसेच सभासद व सर्वसामान्य जनतेबद्दल त्यांच्या मनात असलेली तळमळ ही जवळून पाहिलेली आहे. त्यांच्याबरोबरच अनुभवलेल्या अनेक आठवणींनी माझे मन भरून आले आहे.

१९८४-८५ मध्ये ज्ञानेश्वर कारखान्यास नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑप.शुगर फॅक्टरीज लि., नवी दिल्ली यांचे मिळालेले राष्ट्रीय पातळीवरील पारितोषिक स्वीकारणेसाठी घुलेपाटील यांचेबरोबर दिल्ली येथे गेलो होतो. त्यावेळी फेडरेशनच्या गेस्ट हाऊसमध्ये राहण्यासाठी जागा मिळू शकली नाही, तेव्हा तेथील अधिकाऱ्यांनी बाहेरील हॉटेलमध्ये राहावे लागेल, असे सांगितले. पारितोषिक वितरण समारंभ ज्या पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित केला होता त्या पंचतारांकित हॉटेलमध्ये राहण्यास जाण्याबद्दल त्या अधिकाऱ्यांनी सांगितले. परंतु महागड्या पंचतारांकित हॉटेलमध्ये राहण्याऐवजी साध्या हॉटेलमध्ये राहणे मा. घुलेपाटील यांनी पसंत केले. यातून त्यांची अनाठायी उधळपट्टी न करण्याची वृत्ती दिसून येते. त्यांनी पैशांचा अत्यंत काटकसरीने वापर केला. त्यांची राहणी अत्यंत साधी होती. ते प्रसिद्धी माध्यमांपासून दूर

होते. कोणत्याही प्रकारची अवास्तव प्रसिद्धी त्यांना आवडत नसे. कारखान्याला राष्ट्रीय पातळीवरील अनेक प्रकारची पारितोषिके मिळाली असली तरी त्यास फार मोठा खर्च करून कधीही प्रसिद्धी दिली नाही.

मा. घुलेपाटील यांचा अधिकाऱ्यांवर दृढ विश्वास होता. कारखान्याच्या अनेक केसेस अगदी हायकोर्टापर्यंत चालू होत्या. या केसेसचा दूरगामी परिणाम कारखान्याच्या नियंत्रणावर देखील होणार होता, परंतु ते केव्हाही कोर्टाचे कागद किंवा निकाल याची कागदपत्रे स्वतः चाळत बसले नाहीत. केसबद्दल आम्ही जी माहिती देत असू त्यावर पूर्ण विश्वास ठेवून पुढील कार्यवाहीबद्दल मार्गदर्शन व सूचना करीत होते. इतका मोठा विश्वास त्यांचा अधिकाऱ्यांवर होता. घुलेपाटील कारखान्यावर आल्यानंतर व काही चर्चा करावयाची असल्यास ते फोन करून, ''माझे ऑफिसमध्ये येता का?'', असे विचारीत असत. त्यांच्या स्वरात कधीही अधिकारवाणी जाणवली नाही.

एकदा आमचे कारखान्याकडील अतिरिक्त ऊस कोपरगाव तालुक्यातील एका चांगल्या कारखान्यास गळीतासाठी देण्याचे ठरले होते. त्यावेळी कोणत्या भागातील ऊस किती प्रमाणात द्यावयाचा हे ठरवून त्याप्रमाणे वाहनांची व्यवस्था करणेसाठी सांगितले होते. त्याप्रमाणे त्या कारखान्याने वाहने पाठवून दिलेली होती. परंतु आमच्या नंतरच्या माहितीप्रमाणे तेथे ऊस उपलब्ध होऊ शकणार नव्हता. म्हणून आलेली वाहने परत पाठविली. ही गोष्ट त्या कारखान्याच्या अध्यक्षांना आवडली नाही व त्यांनी लगेच मला फोन करून नाराजी व्यक्त केली. ही गोष्ट मा. घुलेपाटील यांना समजली. तेव्हा त्यांनी लगेच त्या कारखान्यातील लोकांना सांगितले की, ''आमचे कारखान्याचे कार्यकारी संचालकांनी घेतलेला निर्णय अत्यंत योग्य आहे व आमच्या कार्यकारी संचालकांना अशी भाषा ऐकण्याची सवय नाही.'' यावरून मा. घुले पाटलांचा माझ्या कामावर असलेला संपूर्ण विश्वास व त्यांनी मला दिलेली आदरपूर्ण वागणूक मी कधीही विसरू शकणार नाही

विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला. तो प्रसंग किंवा साखर कारखान्याची अटीतटीची झालेली निवडणूक, कारखान्याच्या वार्षिक साधारण सभा किंवा कारखान्यावर काढण्यात आलेले मोर्चे-प्रतिमोर्चे यांसारख्या अनेक कठीण प्रसंगांचे कोणतेही दडपण न घेता अत्यंत कुशलपणे व धीरोदात्तपणे त्यांनी त्या त्या प्रसंगाला समर्थपणे सामोरे जाण्याचे धाडस दाखविले होते.

घुलेपाटील हे अजातशत्रू होते, सर्वांशी त्यांचे जवळीकतेचे संबंध होते. जिल्हा मध्यवर्ती बँक म्हणजे घुलेपाटील असे समीकरण झाले होत. त्यांनी कोणासही व्यक्तिगत राजकारणासाठी त्रास दिला नाही.

ज्ञानेश्वर कारखान्याकडे सतत जादा ऊस असावयाचा, ज्यावेळी अतिरिक्त ऊस देण्याचा प्रसंग आला, त्यावेळी घुलेपाटील यांनी अनेक कारखान्यांना ऊस दिला, मग ते कारखाने त्यांच्या राजकीय विरोधकांचे असो किंवा आर्थिक अडचणीतले कारखाने असोत. त्यांनी कोणताही पूर्वग्रह दूषित न ठेवता अतिरिक्त ऊस गळितासाठी दिलेला आहे. यामध्ये गणेश, अशोक, प्रवरा, कोपरगाव, संजीवनी, अगस्ती, नासिक, वृद्धेश्वर, गंगापूर या कारखान्यांचा समावेश आहे. मी गणेश कारखान्याचा सभासद होतो, तसेच अशोक कारखान्यामध्ये कार्यकारी संचालक होतो. पद्मश्री विखे पाटील कारखान्याचे अध्यक्षांशी माझे स्नेहाचे संबंध होते, त्यामुळे या कारखान्यांनाही ऊस देणेबाबतची विनंती मी त्यांना करताच त्यांनी या कारखान्याकडील ऊसाच्या पेमेंटची खात्री तुम्हाला असेल व ती जबाबदारी तुम्ही घेत असाल तर ऊस देणेस हरकत नाही, असे सांगितले. त्यामुळे सहकारी साखर कारखानदारीकडे रचनात्मक दृष्टीने पाहणारे व वैयक्तिक राजकारणाच्या पलीकडे जाऊन निरनिराळ्या कारखान्यांना मदत करण्याची त्यांची वृत्ती दिसून येते.

एकदा गणेश कारखान्याचे चेअरमन मा. भागवतराव गोंर्डे पाटील माझ्याकडे आले. ते माझे नातेवाईक आहेत. त्यांनी सांगितले की,

कारखान्याचा ऊस घेण्यासाठी मा. घुलेपाटील यांना भेटावयाचे आहे. घुलेपाटील त्यांच्या ऑफिसमध्ये होते, मी त्यांची ओळख करून दिली. भागवतराव गोंडे यांनी सांगितले की, कोल्हेसाहेबांनी मला पाठविलेले असून आमचे कारखान्यास तुमचा अतिरिक्त ऊस मिळावा. तेव्हा घुलेपाटील म्हणाले, ''कारखान्याचे चेअरमन तुम्ही आहात, तुम्ही आमच्या कारखान्याच्या उसाचे वेळेवर पेमेंट करण्याची जबाबदारी घेणार असाल तरच तुम्हास ऊस देतो. नुसते कोल्हेसाहेबांचे नाव सांगितल्याने तुम्हाला ऊस देणार नाही.'' यातून त्यांनी यामध्ये कोणतेही वैयक्तिक राजकारण आणले नाही तर कारखान्याच्या ऊसाचे पेमेंट वेळेवर मिळणार की नाही याची खात्री करून घेऊन व तसे आश्वासन घेऊन मगच ऊस दिलेला होता. सभासदांच्या ऊसाचे पेमेंट वेळेवर करण्याकडे त्यांचा मोठा कटाक्ष होता.

ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी मजूर, कारखाना कर्मचारी यांच्याबरोबर त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे नाते होते. सर्व घटकांना सामान्य न्याय देऊन त्यांचे प्रश्न सोडवीत होते. त्यामुळे संपूर्ण कारखान्याच्या इतिहासात कधीही पैशासाठी कोणत्याही घटकास संघर्ष करावा लागलेला नाही. सर्व घटकांमध्ये सामंजस्य, शांतता व बंधुभाव सतत कारखान्यावर राहिलेले आहे.

ऊस तोडणी मजूर व वाहन ड्रायव्हर, क्लीनर यांची जेवणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी कारखान्याच्या केनयार्डमध्ये 'झुणका भाकर योजना' २० वर्षांपूर्वीपासून राबविलेली असून ती आजही यशस्वीपणे चालू आहे.

कारखाना कार्यक्षेत्रात ऊसाचे उत्पादन वाढविण्यासाठी त्यांनी अतिशय कष्ट घेतलेले आहे. सहा बुलडोझर्स घेऊन ओढे, नाले अडवून, बंधारे बांधून काढले आहेत. तसेच जायकवाडी धरणातून शेतीला पाणी घेण्यासाठी परवानगीही त्यांनीच मिळवून दिली आहे. शेतकऱ्यांच्या वैयक्तिक उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित होण्यासाठी त्यांनी १० टक्के बीज भांडवल

कारखान्यामार्फत देऊन मदत केलेली आहे. कारखान्यामार्फत जलसिंचन योजनांचे सर्व्हे व प्लॅन एस्टिमेट मोफत काढून दिलेला आहे. कार्यक्षेत्रात सामुदायिक १५ जलसिंचन योजना व ५०० ते ७०० व्यक्तिगत लिफ्ट उभ्या केलेल्या आहेत. याचा परिपाक म्हणूनच कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उसाचे उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे.

त्यांनी कार्यस्थळावर मारुतराव घुलेपाटील शिक्षण संस्थेची स्थापना करून त्याद्वारे शाळा, कॉलेजेस व आय.टी.आय.साठी डोनेशन घेऊन प्रवेश दिले जात होते, त्यावेळी त्यांनी कारखान्याच्या सभासदांच्या मुलांना विना डोनेशन आय.टी.आय.ला प्रवेश दिलेला आहे, यातच त्यांचे वेगळेपण दिसून येत आहे.

कारखान्याचा व पर्यायाने कार्यक्षेत्राचा विकास व्हावा, या भागाचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास व्हावा, अशी नेहमी त्यांची तळमळ असावयाची. कारखान्यामध्ये अनेक आधुनिक सुधारणा करून २-३ वेळा एक्स्पान्शन करून उत्पादन वाढविले. तसेच डिस्टिलरी, बायोगॅस, कंपोस्ट खत, फळबागसारखे प्रकल्पदेखील उभे केले. शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळावा, त्यांचा माल चांगल्या स्थितीत राहावा यासाठी कोल्ड स्टोरेजची उभारणी केली. कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मालकीचे घर असावे, यासाठी कारखान्याकडील ५ एकर जागा अल्पदराने कामगारांच्या गृहनिर्माण संस्थेस देऊन सुमारे १०० घरे बांधून दिलेली आहेत. दरवर्षी कोणता ना कोणता तरी नवीन प्रकल्प हाती घ्यावयाचा व तो पूर्ण करावयाचा, असा त्यांचा संकल्प होता. हे प्रकल्प उभे करण्यामध्ये त्यांचे मोलाचे मार्गदर्शन व संपूर्ण विश्वास पाठिंबा असल्यामुळेच हे सर्व प्रकल्प उभारणे शक्य झालेले आहे.

राजारामबापू पाटील कारखान्यासारख्या पश्चिम महाराष्ट्रातील प्रगतीशील कारखानदारीची माहिती तसेच तेथील शेती, शिक्षण, उद्योग इ. बाबतीतही माहिती ज्ञानेश्वर कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी यांना व्हावी. याकरिता

त्यांनी या सर्वांकरिता एका ट्रीपची आखणी करावी, असे सुचविले होते व त्याकरीता त्यांचे निधनापूर्वी केवळ १५ दिवस अगोदरच त्या संबंधात माझ्याशी चर्चा केली होती.

घुलेपाटील यांना राष्ट्रीय पुरुषांबद्दल फार आदर होता. त्याचप्रमाणे सामाजिक परिवर्तन व सामाजिक प्रश्नांसाठी ज्या ज्या वर्तमानपत्रांच्या संपादकांनी आवाज उठविला, त्याचेबाबतीतही त्यांना आदर होता. मुळा धरण व्हावे व शेतकऱ्यांच्या जमिनीला पाणी मिळावे यासाठी प्रयत्न करणारे व सामाजिक जाणीव असणाऱ्या पत्रकारांची तसेच सहकारी चळवळीत योगदान देणाऱ्या नेत्यांची तैलचित्रे त्यांनी आवर्जून तयार करून अतिथीगृहात लावली आहेत. त्यांच्या कार्याचे स्मरण व त्या व्यक्तींबद्दलचा आदरच त्यातून दिसून येतो.

कारखान्याच्या ३० वर्षांच्या कालावधीत ४ वेळा बिनविरोध निवडणुका पार पाडलेल्या असून केवळ दोन वेळा निवडणूक झालेली आहे. त्यांच्या संचालक मंडळामध्ये सर्व पक्षीय व्यक्तींचा समावेश असावयाचा, सर्व विषय एकमताने सतत मंजूर होत असावयाचे. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे कृषी, औद्योगिक प्रगतीचे स्वप्न तसेच त्यांचे स्वप्नातील सहकार या ठिकाणी खऱ्या अर्थाने घुलेपाटील यांनी साकारलेला आहे, हे दिसून येते.

सामाजिक परिवर्तनाचे भान असणारे, लोकांच्या सुखदु:खात सहभागी होणारे, सर्वांशी सहिष्णुतेचे नाते जपणारे व निकोप दृष्टिकोन ठेवून सामान्यांच्या उत्कर्षासाठी सतत झटणारे एक द्रष्टे सेवाभावी नेतृत्व आज लोप पावले आहे, याची आठवण व्यथित करीत आहे.

त्यांचे पवित्र स्मृतीस माझे प्रणाम !!

❀ ❀ ❀

# विकासाची दृष्टी आणि कृतीची जोड

## एस्. एन्. थिटे

---

साहेब (मारुतराव घुलेपाटील) द्रष्टे दूरदर्शी नेते होते. विकासाची दृष्टी त्यांना होती. त्याला कृतीची जोड होती. कारखान्यात नेहमीच आधुनिक विकसित केलेली यंत्रसामुग्री बसवून कारखाना आदर्श राहावा यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे विस्तारीकरण, आधुनिकीकरण करण्यात आले. कारखाना पूर्ण कार्यक्षमतेने चालवावा, त्यासाठी ते मार्गदर्शन करीत. त्यामुळेच कारखान्यास उत्कृष्ट कार्यक्षमतेची पारितोषिके मिळाली. गुणवत्ता, कार्यक्षमता व कुशल व्यवस्थापनाबद्दल 'आय एस ओ ९००२' हे प्रमाणपत्र प्राप्त झाले.

कामगार, अधिकारी यांना त्यांनी समाधानी ठेवले. कामाचा मोबदला दिला तर कार्यक्षमता वाढू शकते, यावर त्यांचा विश्वास होता. सर्वांशी त्यांचे जवळचे संबंध होते. हे कुटूंब एकत्रित ठेवण्यासाठी आधुनिक ज्ञान व परिवर्तन करणे, प्रवाहाबरोबर राहणे हा त्यांचा स्वभाव होता. कारखान्यात आधुनिक यंत्रसामुग्री बसवून एक आदर्श कारखाना त्यांनी नावलौकिकास आणला.

कारखान्यात ते नेहमी येत. कामगारांचे प्रश्न, कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करीत. यंत्रसामुग्रीची अचूक माहिती त्यांना होती. चांगल्या कामासाठी ते नेहमीच आमच्या पाठीवर शाबासकीची थाप मारीत.

(दै. केसरी, १७.७.२००२)

❀ ❀ ❀

# नवनिर्मितीचा शिल्पकार हरपला

## काकासाहेब शिंदे, अशोक सागडे, दत्ता वाकचौरे

दिनांक ८ जुलै म्हणजे शेवगाव नेवासे भागातील जनतेच्या दृष्टीने एक काळा दिवस ठरला आणि या भागातील नवनिर्मितीचा शिल्पकार या जगाचा अखेरचा निरोप घेऊन अनंतात विलीन झाला. परिसरातील माणसे उसासत होती, डोळ्यांतून थेंब निखळत होते. कुणाजवळच सांत्वनाचे शब्द नव्हते. 'साहेब! यापुढे आपण बोलणार नाहीत, मनाशी भिडणार नाहीत, प्रवास संपला कायमचा सुगंध पेरून इतिहासाच्या पानावर.'

आदरणीय मारुतरावजी घुलेपाटील यांच्या रूपाने एक दिव्य परीस शेवगाव-नेवासा तालुक्यालाच नव्हे, तर महाराष्ट्राला लाभला होता. घुलेपाटील यांच्या स्फूर्तिप्रद जीवनाने आणि स्वार्थ त्यागमय उद्यमाने एका प्रतिभाशाली प्रतिभेचे उज्ज्वल दर्शन होण्याचे भाग्य परिसराला मिळाले होते.

आपण मारुतरावजी घुलेपाटील यांच्या उत्तुंग नेतृत्वाकडे आदराने आणि आदर्शवत बघतो. त्यांची जनसामान्यातील लोकप्रियता, दूरदृष्टी, विविध विषयांचे ज्ञान, कामाची पद्धत, जनसामान्यांचे प्रश्न समजावून घेऊन त्यांची उत्तरे शोधण्यासाठी व ते सोडविण्यासाठीची धडपड, पक्षाच्या सर्व स्तरांतील कार्यकर्ते आणि नेते यांच्याबरोबरच सुसंवाद, अशा कितीतरी विविधांगी पैलूंनी त्यांचे व्यक्तिमत्त्व बनले होते. त्यासाठी कित्येक वर्षं त्यांना साधना करावी लागली, कष्ट करावे लागले. आपल्या प्रतिमेचा जिव्हाळा जिवंत आणि जोरदार

करण्यासाठी डोळ्यांसमोर काही आदर्श असावे लागतात आणि असाच आदर्शरूपी आविष्कार घुलेपाटील यांना यशवंतरावजी चव्हाण यांच्या रूपाने मिळाला होता. स्वच्छ, सुंदर, निस्वार्थी समाजकारण आणि राजकारण अनुभवण्याचे आणि बघण्याचे भाग्य (स्व.) घुलेपाटील यांच्या रूपाने जनतेला मिळाले. आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत घुलेपाटील मोठ्या नि:स्वार्थी वृत्तीने जनसामान्यांकरिता झगडत होते. सत्य, नि:स्पृही, एकवचनी, सुसंस्कृत, सात्विक यांचे अधिष्ठान असणाऱ्या नंदनवनाची उपासना करणारे संप्रदायाचे ते आजचे सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी होते.

आदरणीय साहेबांनी शेवगाव-नेवासे तालुक्यांचा सर्वांगीण विकास केला. त्यांनी समाजसुधारणेच्या चळवळीची सुरुवात आपल्या गावापासून केली. सन १९५४ मध्ये दहिगावने येथे सहकारी सोसायटीची स्थापना केली. त्यानंतर शेवगाव तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाचे संचालक, तसेच मार्केट कमिटीचे संचालक, म्हणून त्यांनी काम पाहिली. गोरगरीबांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून १९५९ मध्ये दहिगावने येथे जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना व नवजीवन विद्यालय व वसतिगृह सुरू केले. आज त्यांच्या विविध ठिकाणी शाखा आहेत. ते नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संस्थापक संचालक होते. तसेच अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कारभार सांभाळला आणि आतापर्यंत ते या बँकेचे संचालक होते. १९६२ मध्ये शेवगाव-नेवासे मतदार संघातून ते विधानसभेवर प्रचंड मतांनी निवडून आले. जायकवाडी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी साहेबांनी भरीव कार्य केले. दोन वेळेस विधानसभेवर आणि एक वेळेस विधान परिषदेवर काम करून जनतेचे अनेक प्रश्न सरकार दरबारी मांडून ते त्यांनी सोडवले. सन १९७०-७५ या कालामध्ये ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना करून औद्योगिक विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली. विविध प्रकारची पारितोषिके कारखान्याला मिळाली. तसेच आय.एस.ओ.९००२ प्रमाणपत्रही

कारखान्यास मिळून देशपातळीवर कारखान्याचे नाव झाले. कारखान्याच्या माध्यमातून शिक्षण संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कृषी विद्यालय, महाविद्यालय, संगणक अभ्यासक्रम यांसारख्या अनेक संस्था उभ्या राहिल्या. आदरणीय साहेबांना इंदिरा गांधी प्रियदर्शिनी, उद्योगरत्न, सहकार भूषण हे उच्च सन्मान मिळाले. लोकांच्या प्रश्नांसाठी व ते सोडविण्यासाठी वयोमानाची व प्रकृतीची पर्वा न करता ते ७१ वर्षे कार्यरत राहिले. त्यांनी कधीही कुठल्याही पदाची अपेक्षा केली नाही. म्हणूनच नगर जिल्ह्याला एक निःस्वार्थी, सार्वजनिक विकास करणारा महापुरुष बघायला मिळाला. घुलेपाटील हे शेवगाव-नेवासे तालुक्याला, तसेच नगर जिल्ह्याला पडलेले एक नवनिर्मितीचे स्वप्न होते. त्यांच्या जाण्याने एक फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. असा सत्पुरुष पुन्हा बघायला मिळणार नाही, हे निर्विवाद सत्य आहे. या लेखातील चार शब्दांमध्ये साहेबांच्या कार्याचा आलेख मांडणे अशक्यप्राय आहे. शेवटी एवढेच म्हणू-

साहेब! जगात नाही सापडायचा तुमच्यासारखा लाख मोलाचा हिरा,
आम्ही इतक्या मनोभावे आरती अजून नसेल एखाद्या देवतेची गायिली,
साहेब तुम्ही अनेकांची आधार, सावली, आधार सावली...
स्वतःचे संसार टाकून अनेकांचे संसार सुखाचे करणारा ज्ञानेश्वर आम्ही तुमच्यात बघितला, संत एकनाथ आम्हाला तुमच्यात दिसला...
जगातील सर्वच महान ग्रंथ शेवटी कागदावरच राहतात.

पण साहेब! तुमचा हा ग्रंथ तुम्ही चक्क मातीतच कोरला, काळ्या आईला तुम्ही वाहिला. असा ग्रंथ आम्ही नाही पाहिला. कर्तृत्ववंतांनी, ज्ञानवंतांनी, विचारवंतांनी, निरक्षरांनी, देवदेवतांनी, आंधळ्यांनीही वाचावा, असा हा तुमचा ग्रंथ.

दगडात हजारो शिल्पं कोरली, लाखोंनी पाहिली.
कुणाचं पोट भरलं, कुणाची भूक भागली.

पण साहेब, मातीत कोरलेल्या तुमच्या या कर्तृत्वलेण्यानं सर्वांना सधन केलं.

जगात निर्माण झालेली महान शिल्पे आम्ही पाहिली. उद्या ती ढासळू लागतील, कोसळू लागतील, उन्मळूनही पडतील; पण स्वकर्तृत्वाच्या पायावर उभे तुमचे हे शिल्प अजरामर राहील, चिरंतन राहील, चिरंजीव राहील.

(कै.) मारुतरावजी घुलेपाटील यांच्या पुण्यस्मृतीस अभिवादन.

(दै. सकाळ, १७ जुलै २००२)

❀ ❀ ❀

---

**"माणुसकीचे पुजारी"**

वाटे लावली दिंडी पंढरीची ।
आपणच गेला पांडुरंगा घरी ।।
माझा देव गेला देवा घरी ।

आता येणार नाही माघारी ।।
आठवणी येत राहतील घरोघरी ।
आपण होतात गरीबांचे कैवारी ।।
देह झिजविला चंदनापरी ।
आहेत तीन मुले रत्नापरी ।।

तीच आहे आमची शिदोरी ।
त्यांना देऊ नवी उभारी ।।
ते नक्कीच घेतील गरुड भरारी ।
माणुसकीचे तुम्ही पुजारी ।।

**- दिलीपराव लांडेपाटील**

---

# कृषी संस्कृतीचे शिल्पकार : स्व. मारुतरावजी घुले

भास्कर कडूपाटील

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर स्व. यशवंतराव चव्हाण यांनी सदैव महाराष्ट्राचीच चिंता केली. या राज्याचा डोलारा संपूर्णपणे शेतीवर अवलंबून असल्याने त्यांनी शेतकरीहिताचे निर्णय घेतले व राज्याला कृषी, औद्योगिक व सांस्कृतिक क्षेत्रात आघाडीवर आणले. या कामासाठी त्यांनी राज्यात अनेक हिरे तयार केले. त्यांच्यापैकी स्व. मारुतरावजी घुलेपाटील हे कोहिनूर होते. त्यांच्या परिस स्पर्शाने येथील सहकार चळवळीचे व कृषी संस्कृतीचे सोने झाले. याची प्रचिती या भागाचे नंदनवन पाहिल्यावर येते.

घुले पाटलांनी सदैव शेतकऱ्यांची काळजी केली. शेतीत नवनवीन प्रयोग केले. त्यांच्या पाऊखुणा येथील विकासकार्यात सर्वांचा सर्वांगिण विकास व्हावा म्हणून कारखाना कार्यस्थळावर ज्ञानेश्वर फळे, भाजीपाला, सहकारी खरेदी-विक्री व कृषीपूरक संस्थेची स्थापना केली. शेतकऱ्यांना मार्गदर्शन व्हावे, म्हणून कृषीविज्ञान फर्मची स्थापना केली. पाण्याचा थेंब वाचवा, देश वाचवा! असे ते सतत म्हणत असत. शेतीत आधुनिक तंत्रज्ञान अवलंबिण्याकडे त्यांचा कल होता.

फळविक्रीसाठी बाजारपेठेची अडचण लक्षात घेऊन त्यांची सोसायटीमार्फत हरियाणा, पंजाब व राजस्थानात फळे पाठवून संस्थेला दिशा दिली. शेतकऱ्यांना विविध प्रकारचे मार्गदर्शन व्हावे, यासाठी सोसायटीमार्फत

व्यवस्था केली. शेतकऱ्यांनी फक्त शेतीवर अवलंबून न राहता म्हणून त्यांनी शेतीपूरक अशा दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन दिले. कारखाना कार्यस्थळावर शीतकरण प्रकल्पाची स्थापना केली. आज तेथे प्रतिदिनी दहा हजार लिटर दूध संकलित होत आहे. काळ्या मातीवर साहेबांचे अतोनात प्रेम होते. म्हणून अलीकडे रासायनिक खतांचा व पाण्याचा बेसुमार वापर केल्याने नापीक होत चाललेल्या जमिनीविषयी ते चिंता व्यक्त करीत. याचीच परिणती कार्यस्थळावर गांडुळ खत प्रकल्प उभा राहिला. शेतकऱ्यांनी फळबाग लागवड करावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

औरंगाबाद जसे केशर आंब्यासाठी प्रसिद्ध झाले तसाच हा भागही प्रसिद्ध व्हावा, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. तालुक्यातील सार्वजनिक संस्थांकडे जमिनी घेऊन त्या विकसीत करण्यासारख्या अनेक कल्पना त्यांनी मांडल्या. त्यांचा आढावा घेऊन हे काम करणे हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल. जास्तीतजास्त पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांविषयी त्यांना आपुलकी वाटायची. एकरी १०० टन ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या अनुभवाचा इतरांना लाभ व्हावा म्हणून त्यांचा प्रगत शेतकरी संघ स्थापन करण्याचा मानस होता. परंतु, नियतीच्या आघाताने ते स्वप्न अधुरे राहिले. कोणत्याही मार्गाने शेतकऱ्यांच्या खिशात पैसे जावेत म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले. रेशीमउद्योग शेतकऱ्यांना फायद्याचा ठरेल म्हणूनही त्यांनी लक्ष घातले. शंकरराव कोल्हे मंत्री असताना या प्रकल्पाची माहिती त्यांना देण्यात आली होती. शेवगाव-नेवासाच नव्हे तर नगर जिल्ह्यानेसुद्धा त्यांचा आदर्श घेतला. सहकाराच्या माध्यमातून राज्यभर त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. साहेब आज आपल्यात नाहीत ही उणीव क्षणोक्षणी भासते. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

संकलन- रावसाहेब करकड

(दै. गावकरी १७.७.२००२)

# सहकार पंढरीचा वारकरी

## भवान महाजन

माझे परमस्नेही श्री. मारुतराव घुलेपाटील राहणार दहिगावने, ता. शेवगाव, जि. अहमदनगर, हे थोर व्यक्तिमत्व ८ जुलै २००२ रोजी कालवश झाले, यावर अजून विश्वास बसत नाही. निकटच्या वर्तुळात ते 'भाऊसाहेब' या नावाने परिचित होते. प्रेमापोटी नगर जिल्ह्यातील कित्येकांनी त्यांना 'साहेब' म्हणून हाक मारायची तर कित्येकांनी त्यांना मनोमनी 'मालक' म्हणून मान्य केलेले होते. १५ सप्टेंबर १९३० या दिवशी श्रीरामपूर तालुक्यात पढेगावी बनकरांचे घरात जन्मलेला एक मुलगा दहिगावच्या घुलेपाटील घराण्यात दत्तक म्हणून आला. बाहेरून आलेल्या त्या मुलाला गावात, घरात या काळाला अनुसरून काही त्रास झाला असेलच. कुणी त्रास दिला नाही असे मानले तरी स्वत:च्या जागेतून मुळासकट आपल्याला उपटून आणल्याची जाण त्या मुलाला नसेल असे म्हणवत नाही. पण ह्या मुलाने लवकरच दहिगावी मूळ धरले अन् बघता बघता केवळ परंपरागत पाटीलकी न चालवता माणसं प्रेमानं आपलीशी करायला सुरुवात केली.

शाळेतल्या गुरुजनांची शिकवण अन् स्वत:वर सुसंस्कार करण्याची एक प्रबळ इच्छा यातून एक समंजस, सर्वांना बरोबर घेऊन चालायची असलेली व्यक्ती हळूहळू आकाराला आली. लोकांवर जरब बसविण्यासाठी घरात असलेली बंदूक अन् हत्यार घरात टांगली गेली अन् लोकांना आपलेसे करण्याची

क्रिया सुरू झाली. पुढे राष्ट्र सेवा दलाचे संस्कार झाले. भाऊसाहेबांवर शाळेत असताना चांगले संस्कार झाले. स्वातंत्र्योत्तर काळात भाऊसाहेबांच्या मनावर ठसा उमटवण्यात यशवंतराव चव्हाण हे व्यक्तिमत्व फार मोठे ठरले. नगर जिल्हयात त्यावेळी म्हणजे १९६० चे सुमारास कम्युनिस्टांचे राजकीय बळ फार मोठे होते. तिथे भाऊसाहेबांनी काँग्रेसची मुळे रुजवायला सुरुवात केली. या समंजस नेतृत्वाची दखल चव्हाणांसारख्या गुणग्राही व्यक्तीच्या नजरेतून सुटली नाही. मग नगर जिल्हा परिषद, आमदारकी या सर्व ठिकाणी भाऊसाहेबांनी प्रचंड काम करून स्वतःचे स्थान निर्माण केले. यशवंतराव चव्हाणांनंतर त्यांच्या बरोबर मैत्रीचे संबंध असलेले आबासाहेब निंबाळकर, भाऊसाहेब थोरात, पुढल्या काळात जवळ आलेले अण्णासाहेब शिंदे ह्या व्यक्तींना त्यांनी आयुष्यभर मानले. १५ वर्षे आमदार पदावर राहिलेल्या भाऊसाहेबांनी मंत्री होण्याचे टाळले. कारण सर्वसाधारण माणसात राहणे हे सर्वांत मोठे पद आहे, ही त्यांची धारणा होती. घरचे खाऊन लष्कराच्या भाकरी भाजणे ह्यात सर्वोच्च आनंद मानणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळे राजकारणाच्या माध्यमातून नगर जिल्ह्याच्या अग्रभागी ते वावरत असताना देखील, सहकारी बँकेसारख्या संस्थेकडे त्यांचा ओढा अधिक होता. राजकारणापेक्षा समाजकारण किंवा सहमतीचे राजकारण करणे हा भाऊसाहेबांचा छंद होता. त्यांच्या राजकीय गुरूबद्दल काहींनी अशी टीका केली होती की, यशवंतरावांना गट करता येतो पण कट करता येत नाही. ते खरे असेलही पण मुळात माणुसकीला आवाहन करणाऱ्या गोष्टींकडे जसा चव्हाणांचा कल होता तसाच त्यांना श्रद्धास्थान मानणाऱ्या भाऊसाहेबांचाही स्वभाव होता. सहकार या शब्दाचा अर्थ स्वातंत्र्योत्तर काळात विस्तृत होत गेला, शासनाने त्या नावाने एक खातेही सुरू केले. महाराष्ट्रात या सहकारी चळवळीने मोठी क्रांती केली. पण भाऊसाहेबांइतका 'सहकार' चव्हाणांनंतरच्या काळात कुणाला उमगला असे वाटत नाही. सहकाराची तत्त्वे

सांगताना धनंजयराव गाडगीळांना या सहकारातून काय अपेक्षित आहे ह्याची संपूर्ण जाण भाऊसाहेबांना होती. नुसती पांडित्यपूर्ण चर्चा करण्यापेक्षा अर्थपूर्ण कृती करण्याचा त्यांचा स्वभाव होता. नगर जिल्ह्यातील सर्व पक्षीय नेत्यांची व्यक्ती म्हणून भाऊसाहेबांशी फार जवळीक होती. कारण पक्षीय राजकारणाच्या मर्यादा सोडून माणूस म्हणून माणसाशी जवळीक साधणे हे त्यांचे मुख्य धोरण होते. जायकवाडी धरणाला विरोध करणारे भाऊसाहेब धरण झाल्यानंतर विस्थापितांना पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी खरोखर झिजले. या बाबतीत त्यांनी राजकारण आणले नाही. शेवगाव-नेवासा ह्या पाणीटंचाईच्या भागात आज ऊसाची सळसळ दिसत्येय. त्यामागे भाऊसाहेबांची तळमळ आहे. एका मर्यादेपलीकडे तालुका पातळीचे खाली पक्षीय राजकारण आणू नये हे त्यांचे मत असायचे. ज्यात अधिक लोकांचे भले होईल ते धोरण राबवावे यासाठी ते आयुष्यभर धडपडले. एखाद्या निवडणुकीमध्ये एखाद्या विरोधकाबद्दल पक्षाच्या व्यासपीठावरून ते काही बोलले तरी हे व्यक्तिगत नाही, ह्याची खात्री विरोधकांना पूर्ण असायची. जहाल कम्युनिष्टांचे नेते कॉ. वकीलराव लंघे त्यांचे मित्र झाले अन् साखर कारखाना उभारते वेळी व नंतर या दोन नेत्यांच्या मैत्रीची साखर संपूर्ण जिल्ह्याने लुटली. अण्णासाहेब शिंदे यांचा सखोल अभ्यास, बाळासाहेब भारदे यांचे वक्तृव याबद्दल भाऊसाहेब भरभरून बोलत. त्यांचा खरा पिंड होता तो संघटकांचा अन् त्यांचा खरा परमेश्वर होता सहकार !

बँकांसारख्या संस्था चालतात त्या आर्थिक ठेवी आणि व्यवस्थेवर! जिल्हा सहकारी बँकेच्या स्थापनेपासून आजच्या तिच्या अवस्थेपर्यंत या बँकेला लाभली ती खरे भाऊसाहेबांसारखी सुवर्णमुद्रेची ठेव! बँकांच्या निवडणुका, नेमणुकी या कामात सर्व नियमांचे पालन करायला लावणे ह्यासाठी ते प्रयत्नशील असायचे. स्वतः अध्यक्ष असो वा नसो, नव्या अध्यक्षांच्या कामात त्यांनी कधी अडचणी आणल्या नाहीत. ओळखीपाळखीच्या लोकांना अनियमितपणे मदत केली नाही. जेवढी व्यक्ति जवळची तेवढी नियमांची

अमलबजावणीत [illegible] ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना उभारण्यापूर्वी त्या परिसरातून जाणारा कुणीही तिथे अशा प्रकारची वास्तु उभारणे शक्य होईल असे कधी म्हणाला नसता. शेवगाव-नेवासा ह्या रस्त्याचीच दुर्दशा अशी होती की, कारखाना तर सोडा पण आधी हा खड्डेमय रस्ता तर कुणी सुधारून दाखवा, असे मनात म्हणाला असता. पण त्या माळरानावर आज शेवगाव-नेवासा भागातील सर्वांच्या अभिमानाचे हे प्रतीक उभे केले ते भाऊसाहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी! कारखाना नुसता उभा केला नाही तर टिकवला, वाढवला अन् भरभराटीस आणला. अगदी सुरुवातीला कारखान्याचे कार्यालय पत्र्यांच्या सावलीखाली होते. तिथे उकाड्याने बसणे शक्य नसायचे. पण कारखान्याची सर्व कार्यकारिणी तिथेच बसून बैठका घ्यायची. आपण आज पाहतो की, कित्येक कारखाने सुरु होताना त्यावर निवडून आलेले पदाधिकारी आधी त्यांच्या सोई, भत्ते यांकडे लक्ष ठेवून असतात. ज्ञानेश्वर कारखाना व्यवस्थित कार्यरत झाल्यावर काही दिवसांनी नवीन 'गेस्ट हाऊस' बांधण्यात आले. पदाधिकाऱ्यांना त्यांची पदे उपभोगण्याआधी कारखान्याचे काम नीट झालेले आहे की नाही ? हे तपासून पाहण्याची सवय भाऊसाहेबांची होती आणि कोणत्याही कामात भपकेबाज खर्च, अनाठायी चमकधमक त्यांना मान्य नव्हती. सर्व काही प्रमाणशीर ठेवण्यावर त्यांचा स्वतःचा कटाक्ष होता. कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक यांचे कामाच्या व्यवस्थेबद्दलचे सल्ले ते आवर्जून मानीत. स्वतःची मनमानी ते स्वतः करायचे नाही. त्यामुळे व्यवस्थापनात सर्वांनी सोईची अशी रचना आपणहून अंगिकारली जायची. त्यांच्या बरोबर काम करणाऱ्या व्यक्तींना त्यांनी कधी कमी लेखले नाही. त्यामुळे एकदिलाने काम करणाऱ्यांची एक मोठी फळीच त्यांनी शेवगाव-नेवासा भागात उभी केली. लोकांच्या प्रेमामुळे अधिक काळ राज्य करता येते याबद्दलची त्यांची समज अतिशय व्यवहारी व सत्य होती. कुठे प्रवासाला गेले तरी किंवा कारखान्याच्या कामासाठी मुंबईत गेले

तरी अकारण महागड्या हॉटेलात उतरून मौजमजा करणं ते टाळीत. काम होताच परतून निघत . कारखान्याचे विस्तारीकरण करणे असो किंवा इमारत वाढविणे असो, सर्व काही अगदी हिशोबीपणाने करण्याकडे त्यांचा कल असायचा! प्रवासात असले तरी आजचे क्रशिंग किती आहे? ही विचारणा कारखान्याकडे नियमितपणे संध्याकाळी ते करीत. पालकाने आपल्या पाल्याबद्दल चौकशी ज्या प्रेमाने करावी तेच प्रेम त्यांच्या वागण्यात दिसायचे! या सर्व बाबतीत दिखाऊपणाचा अभाव होता. त्यांच्या अशा प्रकारच्या वृत्तीने आणि बरोबरच्या लोकांना खऱ्या अर्थाने बरोबर घेऊन चालल्यामुळे 'ज्ञानेश्वरांची' कीर्ती खरोखरीच सर्वदूर पसरली. भाऊसाहेबांच्या एकावन्नाव्या वाढदिवसाचे निमित्ताने स्व.यशवंतराव चव्हाण अगत्याने कारखान्यावर आले. त्यांनी सर्व पाहणी केली. दुपारच्या कडक उन्हात मंडपात बहुसंख्येने गर्दी झालेली होती. लोकांच्या या लाडक्या नेतृत्वावर यशवंतरावांनी त्यांच्या मार्दवपूर्ण भाषेत ममत्वाने मायेचा हात फिरविला. 'मारुतरावांसारखी दहा माणसे जरी मला महाराष्ट्रात मिळाली तरी मी मोठा कायापालट करून दाखवीन' असे यशवंतराव बोलले! त्यांच्या या वक्तव्याने उकाड्याच्या वातावरणात देखील थंड शिडकावा पसरला. गुरुशिष्याच्या परंपरेचे एक अनोखे दर्शन या कार्यक्रमांतून लोकांसमोर आले. यशवंतरावांवरची भाऊसाहेबांची श्रद्धा अतूट होती. पुढच्या काळात राजकीय रणधुमाळीत यशवंतरावांसारखी सुसंस्कृत व्यक्ती दिल्लीच्या वातावरणात त्रस्त झालेली पाहून भाऊसाहेब व्यथित होत. यशवंतरावांनंतर महाराष्ट्राचे नेतृत्व श्री. शरद पवार यांच्याकडे आले तेव्हा त्याच श्रद्धेने भाऊसाहेब त्यांच्याकडे पाहत. पण सर्व राजकीय चळवळीतून हळूहळू माघार घेत त्यांनी सहकार एके सहकार या न्यायाने कारखान्यावर लक्ष केंद्रित केले. जायकवाडीचे पाणी शेवगाव तालुक्यात उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी कोणतेही परिश्रम करायचे ठेवले नाही. ''अहो! आमच्या मराठवाड्याला तुम्ही काही ठेवणार की नाही,'' असे कधी आम्ही विचारले तर ते म्हणत की,

मराठवाड्याचे लोक माझे शत्रू नाहीत पण त्यांचे भले करण्यासाठी त्यांच्या नेत्यांनी लढावे, त्यांचा हक्क त्यांनी नेतृत्वाला पटवून द्यावा, मोगलाईची सवय झालेली तुमची प्रजा अन् त्यातूनच वर आलेले तुमचे नेते खूप आळशी आहेत'' हे फार मोठे सत्य आहे.

शेवगाव नेवासा भागातल्या लहानातल्या लहान भूधारकाला पाणी कसे मिळवून देता येईल याकडे ते पहात. त्यांच्याकडून आलेला ऊस कारखान्यात येऊन पोहोचल्यावर त्याला खेट्या मारायला न लावता योग्य भावात पैसा पोचता करताना ते अतिव समाधान व्हायचे! त्यांच्या या प्रामाणिक धडपडीमुळे लोकांच्या मनावर त्यांनी खरोखरीच 'मालकी' प्रस्थापित केली. या भागातले माळरान घालवून या भागाला ऊसाचे नंदनवन करण्याचे महान कार्य भाऊसाहेबांनी केले. कारखाना व्यवस्थित चालू झाल्यावर त्याच्या अनुषंगाने तिथेच शाळा, दवाखाना, तसेच नगरच्या डॉक्टरांच्या भेटी, कामगारांसाठी-तंत्रज्ञांसाठी घरे या सोई त्यांनी आवर्जून भराभर उपलब्ध करून दिल्या. शाळेमधून चांगले शिक्षक आणणे, शाळेतल्या मुलांसाठी विविध उपक्रम राबविणे ही कामे तिथल्या लोकांच्या अंगवळणी पाडण्यात भाऊसाहेबांनी मोलाचे काम केले.

कारखाना परिसरात त्यांनी ज्युनियर कॉलेजही सुरू केले अन् चांगल्याप्रकारे चालविले. नंतरच्या काळात त्यांनी राबविलेला फळकेंद्राचा प्रकल्प हा त्यांच्या शिरपेचातला मोठा मानाचा तुरा ठरला. विविध फळांची शिस्तशीर, वैज्ञानिक पद्धतीने लागवड करून योग्य अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने हा प्रकल्प त्यांनी असा काही उभा केला की, महाराष्ट्रातून अन् बाहेरून येऊन या बागेतल्या सहकाराची रसाळ गोमटी फळे सर्वांनी पाहिली अन् चाखली. क्वचित कुणा बड्या नेत्याचे आगमन कारखान्यावर झाले तेव्हा साध्या कमानी लावून उभ्या केलेल्या मंडपात अत्यंत साधे, चवदार भोजनाचे कार्यक्रम त्यांनी घडवून आणले, येणाऱ्या नेत्याने नंतर त्याची आठवण ठेवो अथवा न ठेवो

भाऊसाहेबांना कोणाबद्दल कडवटपणा मनात आला नाही. अगदी बोटाला धरून पुढे आणलेली माणसे, ज्यांना बोलायला शिकवले अशी काही माणसं पुढच्या आयुष्यात त्यांचे हे चांगुलपण विसरल्याचे अनुभव भाऊसाहेबांना आले. त्यामुळे कधी कधी ते विषण्णही झाले. आपल्या मुलांनी देखील या क्षेत्रात यायचे तर मनापासून काम करण्याची तयारी ठेवावी हे त्यांचे म्हणणे होते. गॅरेजचा मालक व्हायचे असेल तर साध्या क्लीनरसारखे गाडीच्या खाली आडवे व्हायची लाज वाटायला नको, अंग खराब झाले तरी त्याचे वाईट वाटायला नको, अशी त्यांची धारणा होती. कारण कामाचे स्वरूप मुळातून समजून घेणे हे महत्त्वाचे आहे हा त्यांचा दृष्टिकोन होता. आज त्यांची दोन मुले सार्वजनिक क्षेत्रात यशस्वीपणे वावरत आहेत. थोरले चिरंजीव आता आमदार असले तरी गेली ८-१० वर्षे नगर जिल्ह्याच्या राजकारणात वावरत होते. आमदार झाल्यानंतर भाऊसाहेबांच्या शिरस्त्याप्रमाणे सतत लोकसंपर्क वाढविण्याचे काम ते करीत आहेत. सार्वजनिक कामातून स्वतःच्या प्रपंचासाठी काही करणे हे निषिद्ध मानायचे, भाऊसाहेबांची शिकवण मुलांनी आधीच शिकून घेतली आहे. नंतरचे चिरंजीव राजेंद्र हे अमेरिकेत स्थित असून इंजिनियर आहेत. धाकटे चंद्रशेखर हे आता कारखान्याची धुरा वाहत आहेत. दोन मुलांना कामाचे वाटप केलेले आहे, पण भाऊसाहेब स्वतः ही दोन्ही का कामे करून जिल्हाबँकेत कृतीपूर्ण सहभागी असत ही गोष्टच त्यांच्या कामाचा आवाका कसा होता हे दर्शविते. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी विविध पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्याबद्दल काढलेले गौरवोद्गार अत्यंत महत्त्वाचे मानायला हवेत. चांगल्या कामासाठी कुणालाही मदत. एवढे साधे तत्व भाऊसाहेबांनी जोपासले.

कारखान्यातील तंत्रज्ञ, कामगार यांच्या कार्याची खरी जाण भाऊसाहेबांना होती. साहेब आपल्याला पूर्ण जाणतात ही गोष्ट परिसरातल्या सर्व संबंधित व्यक्तींना होती यातच त्यांच्या स्वभावाचे व्यापकत्व दिसते.

आमदारांचे अनुभव सांगताना ते आवर्जून ग.प्र.प्रधानांचा उल्लेख करीत, रामभाऊ म्हाळगींनी केलेल्या अभ्यासपूर्ण चर्चेचा उल्लेख करीत. वि.स.पागे यांच्या विद्वत्तेबद्दल आदराने बोलत. बाळासाहेब भारदे तर आपल्याच जिल्ह्याचे. त्यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त करण्याची कोणतीही संधी ते कधी सोडीत नसत. बाळासाहेबांसारखी भाषा आणि सर्वस्पर्शी बुद्धी अलीकडच्या काळात कुणापाशी नाही, असे ते म्हणत. नगर जिल्ह्याचे हे एक भूषण आहे असे सांगत. आवर्जून पुण्यात त्यांना भेटायला जात. दोघेही अफाट प्रवास करणारे एकमेकांना आता जास्त दगदग करू नये असे सांगत तेव्हा गंमत वाटायची. पुण्यात त्यांचे आणखी एक श्रद्धास्थान म्हणजे नरुभाऊ लिमये हे होते. त्यांना भेटले म्हणजे ते अगदी मनापासून खूष व्हायचे. पक्ष म्हणून काँग्रेस पक्षाची वैचारिक घसरण फार होत आहे असे मत जवळच्या माणसाजवळ ते बोलून दाखवित अन् या साठीच पक्षापेक्षाही सहकाराकडे त्यांचा कल अधिक होता.

धनंजयराव गाडगीळ यांना अपेक्षित असलेली सहकाराची सर्व मूलतत्त्वे प्रत्यक्ष आचरणात आणली तर खेड्यापाड्यात आमूलाग्र बदल घडवून आणता येतील, यावर त्यांची श्रद्धा होती. ''वेदामध्ये सर्व काही आहे'' अशा गर्विष्ठ वाटणाऱ्या मानसिकतेच्या जवळ जाणारी त्यांची भूमिका सहकार क्षेत्राबद्दल असायची, मोजके अन् परिणामकारक बोलणे हे त्यांचे सूत्र असायचे. पण निवडणुकांचेवेळी एकेका दिवसात २-३ सभा ते गाजवीत. कमरेखाली वार न करता त्यांच्या खास शैलीत विरोधकांतील दोष ते सामान्य माणसासाठी सोपे करून सांगत. आवर्जून तालुक्यातील जमेल तेवढ्या लग्नप्रसंगी ते उपस्थित राहत. एकेका दिवशी अगदी दोन दोन लग्ने लावायला उन्हातून ते जायचे.

वास्तविक ३५-४० वर्षांपूर्वी शस्त्रक्रियेत त्यांचे एक फुफ्फुस काढून टाकले होते. पुढे त्यांना रक्तदाबाचा विकारही जडलेला होता. अगदी

अलीकडच्या काळात पित्ताशयाची व प्रोस्टेस्ट ग्रंथी काढण्याच्या दोन मोठ्या शस्त्रक्रिया झाल्या होत्या. त्यावेळी काही काळापुरते ते अगदी अत्यवस्थ होते. पण या सर्वांवर मात करून ते पुन्हा कामात व्यग्र झाले.

माणसावर प्रेम करणे हाच त्यांचा स्वभावधर्म होता. देवगडचे महाराज असोत की सोनईचे महाराज असोत किंवा बाबामहाराज सातारकर असोत, सर्वांपुढे ते नम्रपणाने जायचे. लोक त्यांना मानतात ना मग मी सर्व लोकांपैकी एक नाही का? अशा भावनेने ते सर्वसामान्य माणसांच्या श्रद्धास्थान आणि सामान्यांची गर्दी असलेले स्थळ हेच त्यांच्या लेखी पवित्रस्थळ.

त्यांच्या जाण्याने शेवगाव नेवासा परिसरातील एक मितभाषी सुजाण सुसंस्कृत मनमिळावू अन सर्वसमावेशक व्यक्तिमत्व गेले आहे. सार्वजनिक क्षेत्रातल्या त्यांच्या दोन्हीही मुलांवर त्यांच्या व्यक्तिमत्वाचे 'शिवधनुष्य' पेलण्याची फार मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे. अन् त्यांना ती पार पाडायची आहे. भाऊसाहेब कुठेही प्रवासाला गेले तरी शेवगाव- नेवासा भागात जाण्यासाठी कायम उत्सुक असत. माहेरवाशीणीला माहेराची ओढ असते, तसेच याबाबतीत त्यांचे होते. नगरला किंवा अगदी कारखान्यावर राहण्याचेही ते शक्यतो टाळीत. दहिगावने त्यांना सर्वांत प्रिय होते. सकाळचे विधी आटोपून घराजवळच्या शेतात सकाळचे ऊन अंगावर घेणे तिथे फेरफटका मारणे त्यांना आवडायचे आणि आता लिफ्ट केली आहेत त्या स्थळावर सूर्यास्ताचे वेळी ते ओढले जात. सूर्यास्ताचा तांबूस रंग गोदावरीच्या पाण्यात उतरला आहे अशावेळी त्या वातावरणाचाच एक भाग बनून जावे हे त्यांना आवडे. कवी ग्रेस यांच्या कवितेंत म्हटल्याप्रमाणे 'बघता बघता सांज प्रवाही अलगद बुडून जावे' ही त्यांची वृत्ती होती.

आठ जुलैच्या सकाळी असेच ते नेहमीप्रमाणे सकाळची कामे उरकून दहिगावहून शेवगावी गेले. पंढरपूरला जाणाऱ्या दिंडीला त्यांनी निरोप दिला आणि काही कामासाठी पुढच्या गावांकडे रवाना झाले. तिथे लोकांची कामे

समजावून घेत असताना अस्वस्थ वाटते आहे असे म्हटल्याने गाडी शेवगावकडे पुन्हा वळविण्यात आली सुद्धा, थोडेसे पाणी त्यांनी घेतले. छातीत बारीक दुखले म्हणून कुणीतरी छाती चोळण्याचा प्रयत्न केला पण अगदी पंढरीच्या या वारकऱ्यासाठी खास विमान आले आणि एका फुप्फुसावर जगणाऱ्या या माणसाने शेवटचा श्वास घेतला. शेवगाव नेवासा परिसराने मात्र जणू प्राणवायूच गमावला !

❀ ❀ ❀

# संस्था हित सांभाळणारे घुलेपाटील

## शाम भलके

ज्ञानेश्वरांचे नाव असलेल्या ज्ञानेश्वर साखर कारखान्यात दारू निर्मिती केली जाणार नाही असा ठाम निर्धार करणारे संतांच्या विचाराने उद्योगातही सतप्रवृत्ती बाळगून आचरण करणारे आमचे साहेब कै. मारुतराव घुलेपाटील मला दिसले.

मी ज्ञानेश्वर साखर कारखान्याच्या सेवेत आलो प्रथम दर्शनी मला जशी साहेबांमधली माणुसकी, आपुलकी दिसली तितकीच त्यांच्यामधील अडीअडचणी व त्यावर उपाय योजना आणि घ्यावयाचे निर्णय याचीही तांत्रिक दृष्टी मला पहावयास मिळाली.

आसवानी मधील काम करताना निर्माण होणाऱ्या स्पिरीटची गुणवत्ता प्रथम दर्जाची असावी याची जाणीव ते आम्हा तांत्रिक मंडळींना करून देत. यासाठी आवश्यक ती तांत्रिक सुविधा यंत्रसामुग्री या उद्योग क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे तज्ज्ञ यांची पूर्तता करून देण्याच्या कामी ते पुढे मागे पाहत नव्हते. ऊस उत्पादकाला जादा भाव देण्यात जितकी सक्षम प्रथम आसवानी असेल तितका अधिक फायदा असा व्यवहार्य दृष्टिकोन त्यांचा सतत असायचा.

बगॅस, मळी, आणि त्यासाठी लागणारी स्टीम, बॉयलरचे आधुनिकीकरण; स्पिरीटची गुणवत्ता यासर्व बाबींवर त्याचे सूक्ष्म निरिक्षण

होते व अभ्यासही होता. डिस्टलरीचे ज्ञान असणारे मारुतरावांचे तांत्रिक ज्ञान आम्हा अधिकाऱ्यांना त्यांनी विचारलेल्या प्रश्नांतून ते आमच्या ज्ञानाची तपासणी करीत असत. म्हणून सदैव तत्पर राहण्याचे आम्हांस वळण पडले होते.

साखर कारखानदारी ही शेतकऱ्यांच्या मालकीची व शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडवून आणणारा कृषी पूरक उद्योग असून त्याचे आपण विश्वस्त आहेत या भावनेने त्यांच्या कामाची पद्धत असायची. प्रत्येक निर्णयात व्यवहाराची सांगड घालून संस्था हित सांभाळणे हे कसब त्यांचे मला पहावयास मिळाले.

कै. घुलेपाटील हे नेते होते, कृषी उद्योगाचे धनी होते, कामगारांचे मालक होते. म्हणून भाग्य विधाता तिलक त्यांना मिळाला. त्यांच्या विचारांची जपणूक हीच त्यांना आदरांजली.

❀ ❀ ❀

# धरणग्रस्तांचे अश्रू पुसणारे नेतृत्व हरपले

**कल्याणराव म्हस्के**

---

जायकवाडी धरणाला आमचा विरोध नाही. मात्र जायकवाडी धरणामुळे विस्थापित होणाऱ्या धरणग्रस्तांचे योग्य पुनर्वसन झाले पाहिजे. गोरगरीब शेतकऱ्यांच्या लाखमोलाच्या काळ्याभोर जमिनी, मिळाल्या पाहिजेत. घरे मिळाली पाहिजेत, त्यांच्या मुलांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळाले पाहिजे. फुगवट्यावरून पाणी उचलण्यासाठी त्यांना परवाने मिळाले पाहिजेत. नवीन गावठाणात रस्ते, वीज, पिण्याचे पाणी, शाळा झाल्या पाहिजेत. धरणग्रस्तांना आम्ही वाऱ्यावर सोडू देणार नाही. अशी खंबीर भूमिका (कै.) मारुतराव पाटलांनी घेतली व शासनाशी संघर्ष करून धरणग्रस्तांचे पुनर्वसन केले. तब्येतीची पर्वा न करता गावोगावी फिरून धरणग्रस्तांचे अश्रू पुसले. कारखाना जिल्हा बँकेच्या मदतीने जायकवाडीच्या पाण्यावर उपसाजलसिंचन योजना राबवून गोदाकाठी हरितक्रांती घडविली (कै.) साहेबांच्या कर्तृत्वाचा आलेख कागदावर मांडणे अवघड आहे. शब्दापलीकडचे ते काम आहे. त्यांच्या अकाली जाण्यामुळे धरणग्रस्तांचे छत्र हरवले आहे.

दै. सकाळ १७.७.२००२

❀ ❀ ❀

# मालक गेले !

## एस. आर. जोशी

---

८ जुलै. दुपारचे १२ वाजले. शाळेतील फोन खणाणला. एका जिवलग मित्राचा फोन. एस. आर. बॅड न्यूज ! मालक गेले !! बातमीवर विश्वास ठेवणं अशक्यच ! पुन्हा पुन्हा विचारणा ! पण नियतीने बातमीत बदल तो केला नाही. जिल्ह्याचे सहकार भूषण देहाने पंचत्वात विलीन झाले. दहिगावची जनता पोरकी झाली. लाखाचा पोशिंदा काळाच्या पडद्याआड गेला.

दक्षिणेची काशी समजल्या जाणाऱ्या पैठणच्या पंचक्रोशीत दधीची ऋषींच्या तपश्चर्येने पावन झालेले दहिगाव. या गावाचा गावगाडा ज्या पाटील वाड्यातून चालविला जात होता, त्या पाटीलवाड्याचे मालक मारुतराव ! चार दशकांहून अधिक काळ जिल्ह्याच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात आपल्या कर्तृत्वाचं योगदान देणारा हा खानदानी मराठा पूर्वाश्रमीच्या बनकर कुटुंबातला कर्ता पुरुष दहिगावाचा पाटील झाला आणि रयतेच्या कुंडलीत नवपंचम योग आला. ग्रामीण जीवनाचा अभ्यास करून गावाचा चेहरा मोहरा बदलण्याचा निर्धार केला. सर्व जात, धर्म, पंथ यांच्या भिंती ओलांडून शिक्षणाविषयी तळमळ असणाऱ्या मालकाने गावात बोर्डिंग सुरू केलं. बहुजन हिताय ! बहुजन सुखाय !! साठी १९६० साली माध्यमिक विद्यालय सुरू केलं.

**जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।।**

या माउलीच्या इच्छेप्रमाणे दुष्टांचा दुष्टपणा आणि सुष्टांचा सुस्तपणा

घालविला. साम-दाम-दंड - भेदाचा वापर करून गावचा पाटील मालक केव्हा झाला हे कळलंच नाही. सहकार, शिक्षण, राजकारण आणि सांस्कृतिक विकासाला चालना देऊन संपूर्ण नगर जिल्ह्याचा सहकाराच्या माध्यमातून विकास साधण्याची धडपड सुरू झाली. १९६० पासून कै. यशवंतरावांच्या सामाजिक, राजकीय विचारांचे आपल्या विकासकार्यात अधिष्ठान देणारा एक मुत्सद्दी आणि संयमी राजकारणी म्हणूनच जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदाची धुरा त्यांच्यावर सोपविण्यात आली. राजकारणाला अध्यात्माची बैठक लाभली तर राजकीय शुचिता कशी निर्माण होते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे मारुतराव. विचारातील सुज्ञपणा, नियोजनातील सुसूत्रता आणि कृतीतील प्रामाणिकपणा मारुतरावांच्या समाज आणि राजकारणाची त्रिसूत्री होती.

या त्रिसूत्रीच्याच आधारावर राजकीय पटलावर आलेल्या या नेत्याने जिल्हा काँग्रेस अध्यक्ष, जिल्हा सहकारी बँक अध्यक्ष, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना अध्यक्ष, विधानसभा, विधान परिषद सदस्यापर्यंत सर्व पदांवर आपल्या कामाचा ठसा उमटवला. जो जे वांछील तो ते लाभो, असं सामान्य शेतकऱ्यांसाठी पसायदान मागणाऱ्या या नेत्यानं माळरानावर ज्ञानेश्वर कारखान्याचे इवलंसं रोप लावून त्याचा वेलू गगनावर नेला. याच कारखान्याने त्यांना उत्तम राष्ट्रीय उत्पादकता, इंदिरा प्रियदर्शनी, सहकार भूषण आदि सन्मानांनी पुरस्कृत केलं.

परमेश्वराने दिलेलं लोभस व्यक्तिमत्त्व, कर्तव्यबुद्धीने प्रेरित झालेली प्रज्ञा, दीनदलितांविषयीची कणव आणि व्यवहारचातुर्य ही गुणसंपदा लाभलेल्या मारुतरावांनी जिल्ह्यात सहकाराचं नंदनवन फुलवलं. सहकार पंढरीच्या या वारकऱ्यानं सहकार, शेती, अर्थशास्त्र आणि उद्योगाचा सखोल अभ्यास तर केलाच, परंतु लोकसमुहातून लोकसंस्कृती निर्माण करण्याचा एक नवा आदर्श राजकारण्यांपुढे ठेवला. कोणताही राजकीय नेता जेव्हा सकारात्मक भूमिकेतून कार्य करतो, तेव्हाच तो जनादरास पात्र ठरतो, याचं उत्तम उदाहरण म्हणजेच मारुतराव. शक्ती योग्य मार्गाला लावली म्हणजे त्या शक्तीकडून प्रचंड काम होऊ शकते, याची प्रचिती जायकवाडी धरणग्रस्तांचे पुनर्वसन करताना

मारुतरावांनी तत्कालीन राजकीय नेत्यांना करून दिली. सामर्थ्य हे आंधळे आणि चैतन्यहीन असते; पण मारुतरावांसारखी बुद्धिमान माणसंचं त्याचा योग्य उपयोग करून घेऊ शकली.

ऐन तारुण्यात पत्नीच्या निधनाने मोठ्या कौटुंबिक आपत्तीला त्यांना सामोरे जावे लागले. लहान मुलांचं संगोपन करण्याची, मातृत्वाची व पितृत्वाची अशी दुहेरी जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली, अशावेळी स्थितप्रज्ञ मारुतरावांनी घरचा संसार उभारतानाच हजारोंच्या संसाराला हातभार लावणाऱ्या संस्था निर्माण केल्या.

ज्ञानमंत्र जेव्हा कार्यप्रवृत्त होतो, तेव्हाच तो लोकजीवनाला प्रकाश देऊ शकतो. अंधारात ठेच लागलेल्या जनतेचा दीपस्तंभ ठरू शकतो. सकल मंगलाचा वर्षाव करून समाजकल्याणाची चिंता करणाऱ्या मालकाने समाज परिवर्तनासाठी ईश्वरनिष्ठेची गरज असते हे आपल्या आचरणातून दाखवून दिले. नामसप्ताहाचे आयोजन, गावातल्या देवदेवळांचं नूतनीकरण, प्रार्थनास्थळाची उभारणी अशा सर्वधर्मसमभावाचे त्यांनी जीवनभर आचरण केले. घरातील कुलधर्म, कुलचाराला प्राधान्य देणाऱ्या या नेत्याने सामाजिक कुलाचार मात्र अगदी कटाक्षानं पाळला.

हजारोंच्या साश्रूनयनांनी या आपल्या लाडक्या नेत्याला, शेतकऱ्याच्या आणि सामान्यांच्या माउलीला निरोप दिला. लोकमान्यांची देशभक्ती, गांधीजींची साधनशुचिता, पंडितजींची आधुनिकता आणि यशवंतरावांची चातुर्यता यांचा उत्तम मिलाफ म्हणजे मारुतराव, अशा या स्वकर्तृत्वानं चिरंजीव ठरलेल्या मारुतीला माउलीच्याच शब्दात आदरांजली !

**जे जे सुख जैसे सोज्वळ**
**परि तेही असावे किजळ**
**चंद्र संपूर्ण एखादे वेळ.**
**हे सदा पुरते.**

(दै. सार्वमत)

# ‘आईची माया’ असलेले व्यक्तिमत्त्व

## भीमराव पाटील

(कै.) साहेबांकडे क्षितिजापार पाहण्याची दिव्यदृष्टी होती. माणसातील गुणांचा उपयोग करून घेण्याचे कौशल्य त्यांच्याजवळ होते. त्यांच्या आग्रहामुळे भू-विकास बँकेतील नोकरी सोडून ज्ञानेश्वर कारखान्याची जबाबदारी मी आनंदाने स्वीकारली. अगदी सेवानिवृत्त होईपर्यंत मी प्रामाणिपणे काम केले. त्यांच्या सत्यवादी वर्तनाचे, सात्त्विक वृत्तीचे दर्शन मला प्रतिदिनी झाले. त्यांच्या प्रवाही वक्तृत्वात मला त्यांच्यातील साहित्यिकाचे दर्शन झाले. त्यांच्या साहित्यप्रेमामुळेच बाळासाहेब भारदे, नरुभाऊ लिमये, अनंतराव पाटील यांच्यासारखी मित्रमंडळी त्यांना मिळाली. त्यांच्या आचार, विचार, उच्चारांवर (स्व.) यशवंतराव चव्हाण यांचा प्रभाव होता.

कामाच्या व्यापातून फुरसत मिळाली, की साहेब आमच्याशी दिलखुलास गप्पाही मारायचे, घरातील मुलाबाळांची चौकशी करायचे, त्यांच्या शिक्षणाची विचारपूस करायचे. त्यावेळी आपलीही मायेच्या ममतेने विचारपूस करणारे कोणीतरी आहे, या विलक्षण भावनेने आम्ही मोहरून जायचो. अशी आईची माया देणारा मायेचा हात आता आमच्या पाठीवर कोण फिरविल? (कै.) साहेबांच्या जाण्याने आईचा मायेचा हात आम्ही गमावला आहे. त्यांच्या निधनामुळे मनात दाटलेल्या भावनाच व्यक्त करता येत नाहीत. अश्रूंबरोबरच शब्दही थिजले आहेत. (दै. सकाळ १७.७.२००२) ❀ ❀ ❀

# अखेरचा निरोप

## मंत्री-नेत्यांच्या, अफाट जनसमुदायाच्या उपस्थितीत घुले यांच्यावर अंत्यसंस्कार

सहकारातील अग्रणी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक मारुतराव घुले यांच्या निधनाने शेवगाव-नेवासे परिसरावर शोककळा पसरली. घरातलाच माणूस गेल्याची भावना सर्वत्र दिसत होती.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व राज्यसरकारच्यावतीने त्यांना श्रद्धांजली वाहण्यास पाच मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष, जिल्ह्यातील नेते, अफाट जनसमुदाय लोटला होता.

घुले यांचा पार्थिव देह खास मालमोटारीतून ज्ञानेश्वर कारखान्याच्या कार्यस्थळावर सायंकाळी ५ वाजता आणण्यात आला. तेथे काही वेळ अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आला. नंतर परिसरात अंत्ययात्रा काढण्यात आली. सरकारच्या वतीने त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र वाहण्यात आले. सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास कारखान्याच्या पुढील मैदानात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**'राज्याने दखल घ्यावी असे कार्य'**

याप्रसंगी झालेल्या श्रद्धांजली सभेत अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आदिवासी कल्याणमंत्री मधुकर पिचड म्हणाले, ''घुले आयुष्यभर झगडले. जायकवाडी धरणाने उद्ध्वस्त झालेल्या शेवगाव तालुक्याचा आपल्या

विकासकामांतून बदल केला. त्यांच्या कार्याची जिल्ह्यात नव्हे, तर राज्यात दखल घेतली जाईल.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही 'असा नेता होणे नाही.' अशा भावना आपल्याजवळ व्यक्त केल्या. राज्यसरकारच्या वतीने त्यांना श्रद्धांजली वाहतो.''

**'यशवंतरावांचे अनुयायी'**

अर्थमंत्री जयंत पाटील म्हणाले, ''यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या उभारणीचे काम केले. त्यांच्या विचाराने चालणारे ते ज्येष्ठ नेते होते. भविष्याचा अचूक वेध, प्रश्नांची उत्तम उकल, क्रमीत कमी बोलून प्रश्नांची निर्धारपूर्वक सोडवणूक करण्याची कला त्यांच्याकडे होती. त्यांचे राजकारण आजही आचरणात आणण्याची गरज आहे. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे सोपे नाही.''

**'आदर्श घ्यावा असा नेता'**

संपर्कमंत्री दिलीप वळसे म्हणाले, ''राजकारणात, समाजकारणात आदर्श घ्यावा, अशा व्यक्ती कमी झाल्या आहेत. मारुतरावांनी एक वेगळा आदर्श निर्माण करण्याचे काम केले.

राजकारणावर जबर पकड होती. कुठलाही डाग त्यांनी लागू दिला नाही. विचाराशी बांधिलकी व दिलेला शब्द पाळणे ही त्यांची वैशिष्ट्ये होती.''

**'पारदर्शक व्यक्तिमत्व'**

पाटबंधारे राज्यमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले, ''सहकारातून जनतेची सेवा त्यांनी केली. व्यक्तिमत्वही पारदर्शक ठेवले. यापुढेही त्यांचे व्यक्तिमत्व दीपस्तंभासारखे आपल्याला मार्गदर्शक राहील.''

जिल्हा बँकेचे अध्यक्ष यशवंतराव गडाख म्हणाले, ''आम्ही ३५ वर्षे

एकत्र होतो. अनेक आघात एकत्र घेतले. घरातलाच माणूस गेल्याची भावना आज शेवगाव-नेवाशात आहे. ग्रामीण शहाणपण जपणारा नेता आज आपल्यातून गेला.''

**'जिल्ह्याच्या विकासात सिंहाचा वाटा'**

संजीवनी साखर कारखानयाचे अध्यक्ष व आमदार शंकरराव कोल्हे म्हणाले, ''जिल्ह्यातील कोहिनूरच त्यांच्या निधनाने हरपला. सर्वांना एकत्र आणण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. जिल्ह्याच्या विकासात त्यांचा सिंहाचा वाटा होता. एके काळी काँग्रेसला विनायकराव पाटील, आबासाहेब निंबाळकर, मारुतराव घुले यांचे नेतृत्व लाभले होते.''

बंदर व मत्स्योद्योग खात्याचे राज्यमंत्री शिवाजी कर्डिले यांनीही त्यांच्या निधनाने पोकळी निर्माण झाल्याचे सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष बबनराव पाचपुते म्हणाले की, आदरणीय, मितभाषी असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. समाजबांधणीचे काम त्यांनी सातत्याने केले. छोट्या माणसाला सन्मानाने वागवणारे ते नेते होते. खासदार दिलीप गांधी यांनी दक्षिण मतदारसंघ, प्रदेश भारतीय जनता पक्षाच्या वतीने श्रद्धांजली वाहिली.

गेवराईच्या (बीड) जयभवानी साखर कारखान्याचे संस्थापक व माजी मंत्री शिवाजीराव पंडित, आमदार राधाकृष्ण विखे, आमदार शिवाजीराव नागवडे, माजी आमदार भानुदास मुरकुटे, तुकाराम गडाख, घुले यांचे व्याही व माजी खासदार भाऊसाहेब देशमुख आदींनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

माजी मंत्री बबनराव ढाकणे, श्री. दादा पाटील शेळके, आमदार प्रसाद तनपुरे व वसंतराव झावरे, सर्वश्री अप्पासाहेब राजळे, बाबासाहेब भोस, रामदास धुमाळ, संभाजी फाटके, पी. बी. कड्, जनार्दन टेकावडे, रामनाथ वाघ, सुरेश गवळी, चंद्रकांत म्हस्के, लहानुभाऊ नागरे, विजय बनकर, सुधीर मेहता, बापूसाहेब देशमुख, डॉ. नाथ पाऊलबुद्धे, दादा कळमकर, भानुदास दंडवते,

शांतिलाल बोरा, रमेश खेडकर, नामदेव गाडेकर, (औरंगाबाद) आदींनी या वेळी श्रद्धांजली वाहिली.

**'तळमळीचा लोकनेता हरपला'**

'मारुतराव घुले यांच्या निधनाने तळमळीचा लोकनेता हरपला,' अशा शब्दांत विधानपरिषदेचे सभापती प्रा. ना.स. फरांदे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. मुंबईहून पाठविलेल्या शोकसंदेशात त्यांनी म्हटले आहे की, घुले यांनी विधानपरिषदेत प्रतिनिधित्व केले होते. जिल्हा परिषद, तसेच नगरपालिकांचे प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित करून न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आत्मीयतेने प्रयत्न केले.

त्यांच्याच प्रयत्नाने ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना उभा राहिला. नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत देखील त्यांनी मोलाचे कार्य करून बँकेला ऊर्जितावस्थेत नेले.

**देवगड संस्थानाची श्रद्धांजली**

श्रीक्षेत्र देवगड संस्थानतर्फे श्री.भास्करगिरीमहाराज यांनी श्री. घुले यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले. विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरीला जात असताना त्यांना निधनाचे वृत्त समजले. सर्व वारकऱ्यांच्या वतीने श्री. घुले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

(दै. लोकसत्ता, ९.७.२००२)

❀❀❀

# वृत्तदर्शन

## दीपस्तंभ

### बाळासाहेब तनपुरे

मारुतरावजी घुलेपाटील यांच्यासारखी स्वयंप्रकाशित माणसे 'लाखात एक' असतात. मारुतरावजी समाजासाठी जन्मले, ज्या समाजात आपण जन्माला आलो त्या समाजाचे सामाजिक ऋण फेडण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्नांची पराकष्टा केली. सामाजिक बांधीलकीचे भान ठेऊन आतापर्यंतची वाटचाल केली. दुसऱ्याच्या उपयोगी पडणाऱ्या 'चंदनाप्रमाणे' दुसऱ्याला सावली देणाऱ्या 'कल्पतरू' प्रमाणे जीवन जगणाऱ्या मारुतरावजींचे कार्य पिढ्यान पिढ्यांना 'दीपस्तंभा' प्रमाणे मार्गदर्शक ठरेल.

दहीगावने-चे पाटील म्हणून त्यांचा असणारा आदरयुक्त लौकिक, गावातले वादविवाद गावातच मिटविण्यासाठी त्यांनी सुरू केलेली चावडीवरील न्यायदानाची पद्धती, गोरगरीब मुलांना शिकून शहाणे होता यावे यासाठी गावातच बोर्डींग काढून शाळकरी मुलांसाठी त्यांनी केलेली निवास भोजनाची व्यवस्था, जायकवाडी धरणाखाली नेवासे, शेवगांव तालुक्यातील लाखमोलाच्या जमीनी व घरेदारे जातील, लोक बेघर होतील म्हणून व्यथीत होणा मारुतराव, लोककल्याणाच्या व्यापक भावनेतून धरणाच्या निर्मितीला सहकार्य करण्याची भूमिका घेऊन धरणग्रस्तांच्या, विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी रात्रंदिवस कष्ट करणारे मारुतराव या त्यांच्या वाटचालीच्या ठळक 'पाऊलखुणा' आहेत.

लोकांच्या अंत:करणात त्यांचे स्थान सर्वोच्च व 'अढळ' आहे, म्हणूनच लोक त्यांना अत्यंत आदराने 'मालक' म्हणून संबोधतात जनसामान्यांनी नकळत दिलेली ही उपाधी जगातील सर्व पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ आहे; असेच म्हणावे लागेल.

लोककल्याणाचा ध्यास घेतलेल्या मारुतरावांना लोकांनी आपला 'समर्थ' लोकप्रतिनिधी म्हणून दहावर्षे विधानसभेत पाठविले, पक्षानेही त्यांना पुन:पाच वर्षे विधानपरिषदेत काम करण्याची संधी दिली. विधानभवनातही त्यांनी आपल्या कामाचा हळूवार आगळावेगळा ठसा उमटविला, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी नेत्रदिपक काम केले, नगर जिल्हा हा काँग्रेसचा 'बालेकिल्ला' मानला जातो. मात्र या किल्ल्याचे बुरुज बलशाली बनविण्यात मारुतरावजींचे योगदान मोलाचे आहे. हे विसरून चालणार नाही.

'जायकवाडी व मुळा धरणाच्या निर्मितीनंतर परिसरात उसाचे क्षेत्रात लक्षणीय वाढ होईल याची जाणीव ठेवून त्यांनी नेवासे-शेवगाव तालुक्यासाठी स्वतंत्र साखर कारखाना उभारणीचा संकल्प केला. अविरत व अविश्रांत परिश्रम घेऊन भेंड्यासारख्या उजाड माळरानावर ज्ञानेश्वर कारखाना उभा केला. अचूक व काटकसरीचे निर्णय घेऊन कारखाना चालविला, सभासद व बिगरसभासदांना सारखा भाव देण्याचे तंत्र जपले, जोपासले कारखान्याच्या माध्यमातून शैक्षणिक, औद्योगिक, कृषिविषयक, संस्था उभ्या राहिल्या, हजारो कुटुंबियांच्या घरात सुखाचा सूर्य उगवला, हजारो मुलामुलींच्या शिक्षणाची सोय झाली. मद्यार्क निर्मिती सारखे प्रकल्प त्यांनी सुरू केले मात्र ज्ञानेश्वर माउलीचे नाव असणाऱ्या संस्थेत मदिरा निर्मिती करायची नाही हा अट्टाहासाठी त्यांनी धरला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे पैलू उलगडण्यापलिकडचे आहेत.

महाराष्ट्राचे भाग्यविधाते स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या समृद्ध विचारांचा वारसा लाभल्यामुळेच मारुतरावजींच्या व्यक्तिमत्त्वाला

सात्विकतेची, सुसंस्कृतपणाची जरतारी किनार लाभली आहे. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीप्रमाणे त्यांच्या पुढच्या पिढीनेही सुसंस्कृतपणाचा व सात्विकतेचा वारसा जपला आहे. बालपणी मायेचे छत्र हरपलेल्या मुलामुलींना पदराखाली घेऊन त्यांनी मायेची ममता दिली. त्यांच्यावर सुसंस्कराचे बीजारोपण केले. म्हणूनच आज त्यांचे जेष्ठ चिरंजीव नरेंद्र घुलेपाटील विधानसभेत या मतदार संघाचे समर्थ प्रतिनिधीत्व करतात. दुसरे चिरंजीव राजेंद्र यांनी स्वस्कृर्तृत्वाने परदेशातही नावलौकिक मिळविला आहे. तिसरा चिरंजीव चंद्रशेखर यांनी ज्ञानेश्वरच्या अध्यक्षपदाची धुरा समर्थपणे सांभाळून लोकांच्या व विशेषत: युवकांच्या अंत:करणात स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या कन्याही सुस्थळी सुखाने आहेत. वयाची सत्तर वर्षे पूर्ण केली तरी मारुतरावजी स्वस्थ बसत नाहीत. अजूनही त्यांचा 'जनता दरबार' सूर्योदयाला सुरू होतो. सूर्यास्तापर्यंत नव्हे रात्री उशिरापर्यंत लोक त्यांच्याकडे येतात, त्यांना आपली 'गाऱ्हाणी' सांगतात. त्यांच्याकडून ती हक्काने सोडवून घेतात. डायरी नाही, पेन नाही तरीही कुणाच्या कामाचे विस्मरण होत नाही. लोकांची कामे लक्षात ठेवणारे, ती लक्षपूर्वक मार्गी लावणारे मारूतराव हे एक 'महासंगणक' आहेत. अशा समृद्ध व्यक्तिमत्त्वाच्या जीवनाचे त्यांच्या जीवनातील पाऊलखुणांचे दर्शन लोकांना घडावे, ही वाटचाल शब्दबद्ध व्हावी, पुढील पिढ्यांना 'दीपस्तंभा'प्रमाणे मार्गदर्शक ठरावी म्हणून हा ''दीपस्तंभ विशेषांक'' काढण्याची संकल्पना आमच्या काही मित्रांनी मांडली. अत्यंत कमी कालावधीत ती साकार झाली.

बाळासाहेब तनपुरे

(संपादक : साप्ताहिक नेवासा टाईम्सचा दीपस्तंभ गौरव अंक १५.९.२०००)

# द्रष्टा नेता हरपला

ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि खऱ्या अर्थाने सहकार महर्षी असलेले मारुतराव घुलेपाटील यांचे सोमवारी झालेले निधन हे अनेकांना धक्का देणारे होते. गेली ४० वर्षे ते नगर जिल्ह्यात प्रामुख्याने सहकाराच्या क्षेत्रात कार्यरत होते. समाजकारण व राजकारण यातही त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला होता. श्रीरामपूर तालुक्यातील पढेगावच्या बनकर कुटुंबात जन्मलेले मारुतराव दहिगावने येथील घुले कुटुंबात दत्तक गेले खरे, परंतु नंतर त्यांनी शेवगाव तालुकाच स्वत: दत्तक घेतला असे म्हणता येईल. कारण त्यांच्या राजकारणात, समाजकारणात शेवगाव तालुक्याच्या हिताला प्रथम प्राधान्य होते. १९६२ ते १९७२ या काळात ते शेवगाव-नेवासे मतदार संघाचे आमदार होते. त्याचकाळात मराठवाड्याच्या फायद्यासाठी जायकवाडी धरण बांधण्यासाठी आदर्श नव्हती. सपाट जमिनीवरच धरण बांधल्यामुळे धरणाच्या जलाशयाचा फुगवटा मोठ्या क्षेत्रात विस्तारणारा होता. परिणामी शेवगाव तालुक्यातील गोदावरी काठची काळी कसदार जमीन पाण्याखाली बुडाली. ही जमीन पूर्वी ज्वारीचे कोठार म्हणून ओळखली जायची. त्यामुळे जायकवाडी धरणास नगर जिल्ह्यातूनच जोरदार विरोध झाला. त्यात मारुतराव हे आघाडीवर होते. पुढे हा विरोध निरर्थक ठरणार हे लक्षात आल्यावर त्यांनी निदान धरणग्रस्तांचे पुनर्वसन व्यवस्थित व्हावे यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि त्यात यशही मिळवले. शिवाय शेवगावचा काही भाग सिंचनाखाली यावा यासाठी जायकवाडीचा उजवा कालवा काढण्यासाठी शासनास भाग पाडले.

मारुतराव घुले पाटलांनी साखर कारखाना सुरू करण्यासाठीचे प्रयत्न तसे थोडे उशिराच सुरू केले. १९७० मध्ये त्यांनी ज्ञानेश्वर साखर कारखान्याच्या उभारणीस प्रारंभ केला. तोपर्यंत मुळा धारणाचे पाणी शेवगाव-नेवासे तालुक्यात खेळू लागले होते. ज्ञानेश्वर साखर कारखाना सुरू करताना त्यांनी काही तत्वे उराशी बाळगली होती. संत ज्ञानेश्वरांच्या नावाने काढलेल्या या कारखान्यात दारू अथवा अनुकूल परिस्थिती असूनही ज्ञानेश्वर कारखान्याने आसवनी सुरू केली नाही. साखर कारखाना हा सभासदांच्या मालकीचा आहे. आपण तो विश्वस्ताच्या भावनेने चालवायचा आहे, म्हणूनच कारखान्याचा कारभार हा सभासदांचे हित डोळ्यांपुढे ठेवूनच करण्यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यामुळेच एक आदर्श कारखाना म्हणून जिल्ह्यात 'ज्ञानेश्वर' कडे पाहिले जाते. मारुतराव घुलेपाटील हे खरे कै. यशवंतराव चव्हाण यांचे कट्टर अनुयायी कै. चव्हाण यांच्या निधनानंतर त्यांनी शरद पवार यांना पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली तेव्हा मारुतरावांचे जिवाभावाचे काही सहकारी राष्ट्रवादीत आले नाहीत. उलट मारुतरावांनीही काँग्रेसमध्येच रहावे यासाठी दडपणे आणली गेली. परंतु मारुतराव आपल्या निर्णयावर ठाम राहिले. सहकाऱ्यांशी कटुता निर्माण न करता त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. जिल्हा पातळीवर शक्यतो सामोपचाराने पण तत्वधिष्ठित राजकारण करण्यावर त्यांचा भर असे. १९६४ ते १९७४ या काळात जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदाची धुरा त्यामुळे ते यशस्वीपणे सांभाळू शकले.

नुकत्याच झालेल्या जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत मात्र त्यांनी प्रथमच ठाम भूमिका घेतली. राष्ट्रवादीतील त्यांचे सहकारी (आ. कोल्हे, नां.पिचड इ.) काँग्रेस (इ) व शिवसेना भाजपाबरोबर युती करत असतानाच मारुतराव घुलेपाटील यांनी राष्ट्रवादीच्या तरुण नेतृत्वाला साथ देण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर स्थानिक राजकारणातील आपले कट्टर विरोधक तुकाराम गडाख यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आणण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या या राजकीय डावपेचांमुळे आ. यशवंतराव गडाख



Jijamata Science & Art's College
Library
24397
D.Nagar

यांच्यासारखे त्यांचे एकेकाळचे सहकारी केंडीत सापडले, दुरावले गेले हे नाकारता येणार नाही. मारुतराव घुले पाटलांना शेवगाव तालुक्यात 'मालक' म्हटले जाते. त्यामुळे घुले पाटलांचे विरोधक हे त्यांच्यावर सरंजामशाहीचा आरोप करीत. तिन्हाईताला हा आरोप खरा वाटतही असेल, परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिती तशी होती का? नव्हती! कारण सरंजामशाहीत रयतेचे शोषण, पिळवणूक, दहशत अभिप्रेत असते. मारुतरावांनी शेवगाव तालुक्यात आर्थिक शोषण केले, असे त्यांचे विरोधकही म्हणू शकणार नाहीत. बहुतेक राजकीय नेत्यांवर भ्रष्टाचाराचे शिंतोडे उडत असताना मारुतराव घुले यांच्यावर हे शिंतोडे उडाले नाहीत. त्यामुळे त्यांना जनतेने दिलेली मालक ही पदवी सरंजामशाहीची द्योतक नव्हती तर त्यामागे आपुलकी, जिव्हाळा आणि मारुतरावांवर असलेला असीम विश्वास होता, असे म्हणावे लागेल. 'भारतीय उद्योगरत्न', 'सहकार भूषण' आदि किताब त्यांना मिळाले असले तरी 'मालक' या जनतेने दिलेल्या किताबाचे मोल कितीतरी पटीने अधिक आहे.

मारुतराव घुलेपाटील यांचे जुन्या पिढीतील पत्रकारांशी जिव्हाळ्याचे व प्रेमाचे संबंध होते. जिल्ह्याच्या समस्यांवर ते जुन्या व जाणत्या पत्रकारांशी आवर्जून चर्चा करीत. ज्येष्ठ पत्रकार कै.वा.द. कस्तुरे व समाचारचे कै. जनुभाऊ काणे यांच्याशी ते सतत संपर्क ठेवीत असत. पत्रकारांशी जिव्हाळ्याचे संबंध असले तरी त्यांनी प्रसिद्धीसाठी पत्रकारांची अवास्तव बडदास्तही ठेवली नाही. कै. मारुतराव घुलेपाटील यांच्या आकस्मिक निधनामुळे नगर जिल्ह्यातील जुन्या पिढीतील एक द्रष्टा व कर्तबगार नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांची अनुपस्थिती बराचकाळ जाणवत राहील यात शंका नाही. दै. समाचारची मारुतराव घुलेपाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

(दै. समाचार, १०.७.२००२)

❀ ❀ ❀

Science & Arts College Library

# कर्तबगार सहकार महर्षी

मारुतराव घुले यांच्या निधनाने दक्षिण नगर जिल्ह्यात विकासाची गंगा सुरू करणाऱ्या एका कर्तबगार सहकार सम्राटास संपूर्ण नगर जिल्हा मुकला आहे. मारुतरावांनी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची उभारणी केली आणि त्यानंतर दक्षिण नगर, वृद्धेश्वर, मुळा, श्रीगोंदा, अगदी अलीकडील केदारेश्वर या सहकारी साखर कारखान्यांपुढे मारुतरावांची प्रेरणा होती आणि या कारखान्यांच्या उभारणीतही त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. शेवगाव तालुक्यातील दहिगावने या खेड्यात त्यांचा जन्म झाला. त्याच गावात त्यांनी १९५४ मध्ये सहकारी सोसायटीची स्थापना करून आपल्या सहकार क्षेत्रातील कर्तबगारीचा पाया उभारला आणि १९७५ मध्ये ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचा पहिला चाचणी हंगाम सुरू करून त्यावर कळस रचला. पण त्याआधीच १९५९ मध्ये आशिया खंडातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या आणि त्याकाळी सर्वात मोठी असलेल्या जिल्हा सहकारी बँकेच्या स्थापनेत संचालक म्हणून काम पाहण्यास प्रारंभ करून त्यांनी स्वतःच्या सहकार क्षेत्रातील जीवनाचे मंदिर उभारले होते.

गावच्या सहकारी सोसायटीची स्थापना ते जिल्हा सहकारी बँक आणि ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याची स्थापना असा मारुतरावांच्या जीवनाचा प्रवास आहे. हे लिहायला किंवा वाचायला सरळ-सोपे वाटते, पण त्या जीवनप्रवासातील त्यांचे कष्ट, जिद्द, चिकाटी लक्षात यायला थोडा वेळच

लागेल. केवळ इंटरआर्टपर्यंत शिक्षण झालेल्या मारुतरावांनी ज्ञानेश्वर कॉलेजसह अनेक शैक्षणिक संस्था सुरू केल्या आणि त्या यशस्वीरीत्या चालवल्या.

मारुतरावांचा लोकसंग्रह चांगला होता. त्याचप्रमाणे त्यांचे नेतृत्वगुणही चांगले होते. १९६४ ते १९७४ अशी सलग दहा वर्षे त्यांनी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. पण त्याआधी दोनच वर्षे म्हणजे १९६२ मध्ये त्यांची विधानसभेवर प्रचंड मतांनी निवड झाली होती. १९६६ मध्ये ते पुन्हा विधानसभेवर निवडून आले तर ७२ मध्ये त्यांची विधानपरिषदेवर निवड झाली. मारुतराव कै. यशवंतराव चव्हाण यांचे कट्टर समर्थक आणि निकटचे सहकारी होते. त्यामुळेच तेव्हा आणीबाणीच्या काळात त्यांनी कै. यशवंतरावांची राजकीय भाष्य करण्यासाठी ज्ञानेश्वर कारखान्याची निवड केली. यशवंतरावांचे मंगळसूत्र एकेका मण्यांनी गुंफले जाणे तसेच पक्षही एकेका कार्यकर्त्यांच्या मण्यांनी गुंफला जातो हे भाषण ३० वर्षानंतरही राजकीय क्षेत्रातील मंडळी विसरली नाहीत. मारुतरावांचे नेतृत्वही असेच होते. त्यांनी कार्यकर्त्यांची गुंफण करून आपले स्वतःचे विश्व निर्माण केले आणि सहकार क्षेत्राचे नेतृत्व केले. ते सहकार महर्षी झाले, पण सहकार सम्राट म्हणून मात्र मिरवायचे त्यांनी कटाक्षाने टाळले. मारुतरावांच्या निधनाने नगर जिल्हा एका लोकसंग्राहक, कर्तबगार सहकार महर्षीला मुकला आहे.

(दै. नवामराठा १०.७.२००२)

❀ ❀ ❀

# खंदा सहकार कार्यकर्ता

महाराष्ट्रातील सहकार चळवळीत नगर जिल्ह्याचे योगदान मोठे आहे. सहकारी कारखानदारी, पाणीसंस्था, सहकारी सोसायट्या असे मोठे सहकारी सोसायट्या असे मोठे सहकार जाळेच या जिल्ह्यात विणले गेले आहे. या सहकाराची पाळेमुळे रुजविण्यासाठी ज्यांनी अपार कष्ट घेतले आशांमध्ये मारुतराव घुले यांचे स्थान मोठे होते. सामान्य कुळात जन्मलेल्या आणि खेडेगावात जीवन व्यतीत झालेल्या मारुतराव घुले यांनी शालेय जीवनापासूनच सामाजिक कार्यात भाग घेण्यास प्रारंभ केला होता आणि १९५४ साली त्यांनी आपल्या गावात सहकारी संस्थेची स्थापना करून एका निश्चित दिशेने पावले टाकण्यास प्रारंभ केला. सहकार म्हटले म्हणजे जनसंपर्क मोठा हवा आणि त्यासाठी संस्थात्मक बांधणीही हवी. हे ओळखून ते कार्य करीत असतानाच नगरच्या जिल्हा सहकारी बँकेवर ते संचालक म्हणून निवडून गेले. त्यानंतर बँकेचे अध्यक्षपदही त्यांच्याकडे चालत आले. सहकारातील कर्तृत्वामुळे राजकारणी त्यांच्याकडे आकृष्ट झाले नसते तरच नवल. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आणि दोनवेळा ते विधानसभेवर निवडून गेले. नेवासा, शेवगाव भागात त्यांचे कार्य प्रामुख्याने होतेच; पण त्याचबरोबर या भागाच्या विकासासाठी त्यांनी भरपूर कष्ट घेतले. संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण या गावी जायकवाडी धरणाची उभारणी सुरू झाली आणि शेवगाव नेवासा भागातील शेतकऱ्यांना आपली

जमीन, गावे पाण्याखाली जाणार असल्याच्या भीतीने घेरले; परंतु मारुतराव घुले यांनी या परिस्थितीवर मात करण्याचा निर्धार केला व ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचा पाया रचला. सहकारावर राजकारणाची पकड ज्यावेळी घट्ट व्हावयाची होती त्या काळात सहकारातून त्यांनी आपल्या भागाचा विकास घडवून आणला आणि हे करीत असताना नगर जिल्ह्यातील इतर साखरसम्राटांप्रमाणे आपला तोराही मिरवला नाही. त्यांचा इंदिरा गांधी प्रियदर्शनी पुरस्कार, भारतीय उद्योगरत्न पुरस्कार तसेच नगर जिल्हा बँकेतर्फे सहकारभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. सहकार चळवळीबद्दल आज कोणीही चांगले बोलत नसले तरी मारुतरावांसारख्या व्यक्तीबद्दल चांगले बोलले जाते हे देखील कमी महत्त्वाचे नाही.

(दै. सामना, १०.७.२००२)

# लोकनेत्याला श्रद्धांजली

लोकनेते मारुतरावजी घुलेपाटील यांचे काल सकाळी आकस्मिकरीत्या हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले व संपूर्ण नगर जिल्ह्यावर शोककळा पसरली. वयाच्या २५ व्या वर्षापासून सहकारी चळवळीत असणाऱ्या या नेत्याने महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांना आपले गुरू मानले. अत्यंत सौम्य, शीतल, मृदुभाषी, प्रज्ञावंत, स्थितप्रज्ञ, स्वभावाच्या या नेत्याने गेल्या ६० वर्षांत सहकार क्षेत्रात अत्यंत मौलिक काम केले. पद्मश्री विखे पाटील व धनंजयराव गाडगीळ यांनी सहकाराच्या माध्यमातून साखर कारखाना उभारून देशापुढे एक वेगळा आदर्श निर्माण केला. त्यानंतर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी सहकारी तत्त्वावर साखर कारखाने उभारण्याचा प्रयत्न केला. त्यात श्री. घुलेपाटील आघाडीवर होते. ज्ञानेश्वर कारखाना उभारून शेवगाव तालुक्यातील जनतेला त्यांनी विकासाचा मार्ग खुला करून दिला. जिल्हा सहकारी बँकेच्या स्थापनेतही त्यांचा अत्यंत मोलाचा वाटा होता. आपल्या भागातील लोक शिक्षणापासून वंचित राहता कामा नयेत यासाठी त्यांनी शैक्षणिक संस्था स्थापन केली. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात हरहुन्नरी कार्यकर्त्यांची माळ गुंफली. या माळेतील एक हिरा काल निखळला. ६२ मध्ये त्यांना काँग्रेस पक्षाने विधानसभेची उमेदवारी दिली होती. ७२ मध्ये विधानपरिषदेवर ते निवडून गेले होते. सुमारे १६ वर्षे त्यांनी विधीमंडळात शेवगाव तालुक्याचे प्रतिनिधीत्व केले. अहमदनगर ग्राहक भांडाराचे ते अनेक

वर्ष संचालक होते. यशवंतराव चव्हाणांबरोबरच सहकारातील महामेरू बाळासाहेब भारदे व नगर जिल्ह्याच्या पाटबंधारे क्षेत्रातील विकास कामात महत्त्वाचा वाटा असणारे पत्रकार वा. द. कस्तुरे यांचे त्यांना मोठे मार्गदर्शन होते. त्यामुळेच या दोन पत्रकारांचे संचालक मंडळाच्या सभागृहात तैलचित्र लावणारा ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना हा देशातील पहिलाच कारखाना असावा. पत्रकार वा.द. कस्तुरे यांनी त्यावेळी पाटबंधारे प्रश्नावर सखोल अभ्यास केला होता व आपले स्पष्ट विचार मांडले होते. अनेक पुढारी त्यावेळी त्यांच्याकडे येत व त्यांचे मार्गदर्शन घेत. वांबोरी चारी असो की, भंडारदरा धरण की जायकवाडी धरण यावर कस्तुरेंनी परखड विचार मांडले होते. मारुतरावजींनी कस्तुरे यांचे मार्गदर्शन घेतले व शेवगाव तालुक्याच्या विकासात भर टाकली. वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, अण्णासाहेब शिंदे, बाबुराव दादा तनपुरे, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, बाळासाहेब विखे यांनी त्यांना मोलाची मदत केली. जिल्हा बँकेचे प्रवर्तक असलेले घुले कालपर्यंत या बँकेचे संचालक होते. जायकवाडी धरणग्रस्तांना त्यांनी मोलाची मदत केली. ज्ञानेश्वर कारखाना नावारुपास आणला. हजारो लोकांना त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला. या कारखान्याच्या रुपाने त्यांनी देशास नावलौकिक प्राप्त केला. सहकार व राजकीय चळवळीत अग्रभागी असलेल्या घुले यांनी विरोधकांनाही आपलेसे केले. शांत सोज्वळ स्वभाव असलेल्या घुले यांना सत्तेच्या अहंकाराचा कधीही स्पर्श झाला नाही. त्यांचे कट्टर विरोधक कॉ. वकीलराव लंघे यांनाही त्यांनी आपल्या समवेत सहकार चळवळीत समाविष्ट करून घेतले. कोणताही व्यक्तिगत द्वेष न जुमानता किंबहुना व्यक्तिगत वैमनस्य न ठेवता सर्वांना बरोबर घेऊन चालण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे ते लोकप्रिय होते. श्री. घुले यांना दहिगावने भागातील लोक त्यांच्या कर्तृत्त्वामुळे व आदरापोटी 'मालक' असे संबोधित असत. त्यांचा स्वभाव अत्यंत मृदू असला तरी ते वेळप्रसंगी इतके कठोर होत की, त्याच्याठायी ही शक्ती कोठून आली असा अनेकांना प्रश्न

पडे. काही वर्षांपूर्वी दहिगावने गावात बाहेरगावहून आलेला एक पहिलवान दांडगाई करून ग्रामस्थांची पिळवणूक करीत असे. हत्तीचे बळ त्याच्या अंगी असल्याने त्याला विरोध करण्याची कोणाची छाती नव्हती. मारुतरावांनी त्याला वेशीमध्येच धोबीपछाड करून त्याची नांगी ठेचली. यानंतर या पहिलवानाने गावात पायही ठेवला नाही. गोरगरीब, अडाणी ग्रामस्थांची त्यांनी कधीही पिळवणूक होऊ दिली नाही. अज्ञानामुळे आमचा शेतकरी मागे आहे हे ओळखून त्यांनी शैक्षणिक संस्थेबरोबरच ज्ञानेश्वर कृषी फार्मची स्थापना केली. कृषी विषयक नवीन धोरणे, तंत्रज्ञान त्यांनी शेतकऱ्यांच्या अंगी बाणवले. मारुतराव घुले यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कारखान्यासह इतर संस्थांना आपल्या आई-वडिलांचे किंवा आप्ताचे नाव दिले नाही. उलट या भागातील दैवत ज्ञानेश्वरांचे नाव दिले. त्यांच्या यशात त्यांच्या पत्नीचा मोठा वाटा होता, परंतु तिचे नावही त्यांनी पुढे केले नाही. संत ज्ञानेश्वरांवर त्यांची गाढ श्रद्धा होती. हातात शक्यतो कधीही घड्याळ न घालणारे घुलेपाटील आपला नियोजित कार्यक्रम अत्यंत काटोकोरपणे व वेळेत पार पाडीत. स्मरणशक्तिच्या जिवावर स्वीय सहाय्यक किंवा डायरीची मदत न घेता स्वतःचे कौटुंबिक अगर संस्थांचे व्यवहार अत्यंत काटेकोर ठेवीत. ज्ञानेश्वर कारखान्यावर कोणालाही पेमेंट साठी कधीही खेट्या घालण्याची गरज पडत नाही. ज्ञानेश्वरचे पेमेंट कोणतीही तक्रार न करता ठरवून दिलेल्या शिस्तीनुसार हातात येते. १५ सप्टेंबर २००१ रोजी त्यांचा ७१ वा वाढदिवस ज्ञानेश्वर कारखाना कार्यस्थळावर कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे साजरा केला. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यावेळी आवर्जुन उपस्थित होते. स्वतःच्या गौरव समारंभात किंवा सत्कारास उपस्थित न राहणारे घुलेपाटील बाबासाहेबांच्या प्रेमापोटी यावेळी उपस्थित होते. दहीगावने परिसरातील लोक त्यांना आदराने 'मालक' का म्हणतात. हे या सत्कार समारंभातील त्यांच्यावरील प्रेमामुळे बघावयास मिळाले. दै. 'नगर टाइम्स' ने त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने एक विशेषांक

प्रकाशित केला. मारुतरावजी घुलेपाटील खऱ्या अर्थाने लोकनेते होते. लोकांच्या हितासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. कधीही कोणाचाही मत्सर किंवा द्वेष केला नाही. साने गुरुजींच्या म्हणण्यानुसार त्यांनी सतत जगाला प्रेम दिले. अशा या थोर नेत्यास दै. 'नगर टाइम्स' परिवारातर्फे श्रद्धांजली...

(दै. नगर टाईम्स १०.७.२००२)

❀ ❀ ❀

# मारुतरावांचा आदर्शवाद प्रत्येकाने जोपासला पाहिजे

**शरद पवार**

''ज्येष्ठ नेते मारुतराव घुले यांनी समाजाचे विश्वस्त या भावनेतून आयुष्यभर काम केले. हा आदर्शवाद जोपासणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज दहिगावने (तालुका शेवगाव) येथे केले.

श्री. पवार यांनी आज दहिगावने येथे (कै.) मारुतराव घुले यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. (कै.) घुले यांचे चिरंजीव आमदार नरेंद्र घुले, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले व श्री. राजेंद्र घुले यांची श्री. पवार यांनी भेट घेतली. हेलिकॉप्टरने ते येथे आले होते. जिल्ह्याचे संपर्कमंत्री दिलीप वळसे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष बबनराव पाचपुते, आमदार सुरेश जैन त्यांच्या समवेत होते. शोकसभा झाली. यावेळी श्री.पवार बोलत होते. 'मालका' च्या निधनाने लाखोंचा पोशिंदा हरपला, असे सांगून श्री. पवार म्हणाले, ''मारुतराव घुले यांच्या निधनाने मला धक्का बसला. मागच्याच आठवड्यात त्यांची भेट झाली. जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर त्यांनी चर्चा केली. एवढ्यात ते आपल्याला सोडून जातील, अशी शंकाही त्यावेळी आली नाही. दुःख, संकटे सांगून येत नाहीत. मात्र,

तरीही त्यातून मार्ग काढावाच लागतो. याचे भान ठेवूनच मारुतराव घुले यांनी दाखविलेल्या मार्गानेच वाटचाल करण्याचा निर्धार आता सर्वांनी केला पाहिजे. त्यातूनच या संकटाचा सामना करता येईल.''

(कै.) घुले यांच्या नेतृत्वामुळेच नेवासे, शेवगावसारख्या दुष्काळी भागाचे सोने झाले, असे सांगून श्री. पवार म्हणाले, ''जायकवाडी धरणात या परिसरातील मोठी जमीन गेली. येथील शेतकऱ्यांवर हा आणखी मोठा आघात होता. मात्र त्यातून मार्ग काढून या पिचलेल्या लोकांना समर्थपणे उभे करण्याचे व्रतच 'मालकां'नी घेतले होते. लोकांनीच दिलेल्या ताकदीच्या जोरावर त्यांनी अखेरपर्यंत हे व्रत सोडले नाही. सततच्या संकटातून त्यांनी या लोकांना बाहेर काढले. त्यांची पुढची पिढी सशक्त केली. समाजाचे विश्वस्त आहोत या भावनेतूनच ते आयुष्यभर कार्यरत होते.''

नरेंद्र घुले व चंद्रशेखर घुले हेच आता यापुढे या परिसरातील लोकांना आधार देतील, असा विश्वास श्री. पवार यांनी व्यक्त केला. ते 'मालकां'चाच वारसा चालवतील, असे सांगून श्री. नरेंद्र व श्री. चंद्रशेखर यांच्या पाठीशी उभे राहावे लागेल. जुने मतभेद मिटवून सर्वांनी एकत्र यावे, अशीच 'मालकां'ची इच्छा होती. त्यासाठीच ते पुन्हा सक्रिय झाले होते. ही एकत्रित शक्ती लोकांच्या भल्यासाठी वापरावी लागेल, हेच त्यांनी मागच्याच आठवड्यात सांगितले. हीच ताकद आता या युवकांच्या पाठीशी उभी केली पाहिजे. राज्यातील जाणकार मंडळीही या कामात शेवगावकरांच्या बरोबर राहतील.''

श्री. पाचपुते यांनीही यावेळी (कै.) घुले यांना श्रद्धांजली वाहिली. ते म्हणाले, ''त्यांच्या निधनाने नेवासे-शेवगावकरांचे किंवा जिल्ह्याचेच नव्हे तर राष्ट्रवादी काँग्रेसचेही मोठे नुकसान झाले आहे. त्यांची अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.'' श्री. जैन यांनी ''(कै.)घुले यांच्या निधनाने राज्याच्या सहकार चळवळीतील निस्वार्थी, अग्रणी नेता हरपला,'' अशी भावना व्यक्त केली. मत्स्य व्यवसाय व विकास राज्यमंत्री शिवाजी कर्डिले, स्वातंत्र्यसैनिक उच्चाधिकार समितीचे सचिव बन्सीलाल

कोठारी, माजी आमदार तुकाराम गडाख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दादा कळमकर, नगरचे शहराध्यक्ष नंदकुमार पवार, माजी आमदार पांडुरंग अभंग आदी या वेळी उपस्थित होते.

(दै. लोकसत्ता १३.७.२००२)

❀ ❀ ❀

# मार्गदर्शन करणारा नेता हरपला

**छगन भुजबळ**

महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वांना मार्गदर्शन करणारा व बरोबर घेऊन जाणारा जाणता नेता हरपला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी दिवंगत ज्येष्ठ नेते (कै.) मारुतराव घुले-पाटील यांना दहिगावने येथील शोकसभेत आदरांजली वाहिली.

श्री. भुजबळ यांची दहिगावनेची नियोजित भेट उद्या (ता.१८) होती. तथापि, त्यात अचानक बदल होऊन ते आज सायंकाळी ४.३० वाजता पुण्याहून हेलिकॉप्टरने दहिगावनेला आले. आमदार नरेंद्र तसेच राजेंद्र व चंद्रशेखर घुले या मारुतरावांच्या चिरंजीवांचे त्यांनी सांत्वन केले.

त्यानंतर घुले यांच्या निवासस्थानासमोर झालेल्या शोकसभेत ते बोलत होते. माजी आमदार पांडुरंग अभंग, उपसभापती अरुण लांडे, 'ज्ञानेश्वर' चे उपाध्यक्ष ॲड. देसाई देशमुख,कार्यकारी संचालक साथीदार थिटे, संचालक काकासाहेब नरवडे, शिवाजीराव भुसारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ॲड.अण्णासाहेब धस, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष संजय फडके, नेवाशाचे उपसभापती काशिनाथ नवले आदी प्रमुख मंडळी व ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री. भुजबळ म्हणाले, की घुले पाटलांनी पन्नासवर्षे अव्याहतपणे प्रचंड काम केले. जात, धर्म न पाहता माणसे जोडली. त्यांना प्रोत्साहन दिले.

अनेकांना पुढे आणले. शरद पवार यांनी नगर जिल्ह्याच्या राजकारणात घुले पाटलांना विचारले नाही, असे कधी घडले नाही. असे सर्वांना मार्गदर्शन करणारे ते धोरणी नेतृत्व होते. त्यांना पाहिल्यानंतर कोणीही नतमस्तक व्हावे. त्यांच्या पायाला हात लावावा, अशी ती विभूती होती. त्यांनी आम्हाला मुलाप्रमाणे प्रेम दिले. वेळप्रसंगी दोन गोष्टी सांगितल्या.

श्री. भुजबळ म्हणाले, की त्यांचा अभ्यासाचा आवाका मोठा होता. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची त्यांची धडपड होती. श्री. पवार यांचे खंदे समर्थक व राष्ट्रवादी काँग्रेसचे आधारस्तंभ आपल्यातून गेल्याचे मोठे दुःख आहे. भावी काळात ज्या ज्या वेळी मी काही करावे, अशी वेळ असेल, त्या वेळी नरेंद्र घुले यांच्या मागे मी उभा राहीन. आपणही सर्वांनी त्यांना असेच प्रेम द्यावे. आज सकाळी (कै.) घुले पाटलांचा दशक्रिया विधी होता. त्यासाठी दहिगावनेला सुमारे चाळीस हजारांचा जनसमुदाय उसळला. ते त्यांच्या प्रचंड लोकप्रियतेचे प्रत्यंतर होते. या वेळी ३० एकर पार्किंगच्या जागेत साडेसतराशे वाहनांची नोंद झाली.

(दै. सकाळ १८.७.२००२)

❀ ❀ ❀

# मारुतरावांच्या निधनामुळे सहकार चळवळीची मोठी हानी

## बाळासाहेब विखेपाटील

मारुतराव घुले यांच्या निधनामुळे सहकार चळवळीची मोठी हानी झाली आहे, असे भावपूर्ण उद्‌गार अवजड उद्योग केंद्रीय मंत्री ना. बाळासाहेब विखे पाटील यांनी काढले.

२० जुलै रोजी सकाळी १०.१५ वाजता ना. विखेपाटील यांनी दहिगावने येथे भेट देऊन कै. मारुतराव घुलेपाटील यांना श्रद्धांजली अर्पण केली व घुले कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी झालेल्या शोकसभेत बोलताना ते पुढे म्हणाले की, कै. मारुतराव घुलेपाटील यांना सर्वजण मालक म्हणून ओळखत होते. सहज भेटून लोक त्यांना आपले दुःख सांगत असत. त्यांच्याशी माझा व्यक्तीगत संबंध ४० वर्षांपूर्वीपासून होता. या संबंधामध्ये राजकीय मतभेद कधी आडवे आले नाहीत किंवा अडचणीचे वा गैरसोयीचे झाले नाहीत. उमद्या मनाचा दिलदार माणूस असे कै. घुलेंचे व्यक्तीमत्त्व होते. जिल्ह्याच्या राजकारणात कै. मारुतराव घुलेपाटील वावरत असताना जिल्हा बँकेत एकदा पद्मश्री विखे पाटलांना चेअरमन करण्याचा प्रसंग आला होता. त्यावेळेस आपला गटतट बाजूला ठेऊन त्यांनी सहकार्य केले होते.

जिल्ह्याच्या राजकारणामध्ये त्यांचा दबदबा होता. राज्याच्या राज्यकारभारामध्ये त्यांचे आगळेवेगळे स्थान होते. त्यांनी पक्षविरहीत राजकारण केले असे सांगून ना. विखे म्हणाले की, बाळासाहेब भारदे यांच्याशी त्यांचे

घरोब्याचे व जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या निधनाने समाजाची, शेतकरी चळवळीची फार मोठी हानी झाली आहे. पद्मश्री विखेपाटील नंतर खऱ्या अर्थाने समाजाच्या जवळ असणारा माणूस म्हणजे कै. घुले असे भावपूर्ण उद्‌गार काढून मारुतराव घुले म्हणजे 'मालक' हे हायसे वाटणारे व्यक्तीमत्त्व होते. सर्वसामान्यांच्या घरगुती कार्यक्रमास ते आवर्जुन उपस्थित रहात. शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी त्यांची सतत धडपड होती. व्यावसायिक शिक्षण देऊन मुलांना स्वतःच्या पायावर उभे रहाता कसे येईल याकडे त्यांचे लक्ष होते. सहकार चळवळीला मदत करा, तिची ताकद वाढली तरच शेतकरी व समाजाची ताकद वाढेल ही त्यांची भावना होती.

खरा सम्राट हा शेतकरी व ग्रामीण भागातील बहुजन समाज आहे. त्याची परिस्थिती सुधारली पाहिजे. हा विचार कै. मारुतराव घुलेपाटील यांनी राबवून आपल्यासमोर आदर्श निर्माण केला आहे. कै. घुलेपाटील यांच्या निधनाने प्रत्येकाला आपल्या कुटुंबातील माणूस गेला आहे असे जाणवत आहे. असा जिव्हाळा निर्माण होणे ही सध्याच्या युगात अतिशय अवघड गोष्ट आहे. त्यांच्या निधनाने राजकीय, सामाजिक हानी तर झाली आहेच. परंतु सहकारातील एक हिरा हरपला आहे, असेही ना. बाळासाहेब विखे पाटील यांनी सांगितले.

यावेळी आ. नरेंद्र पा. घुले. चंद्रशेखर पा. घुले, राजेंद्र पा. घुले, माजी आ. पांडुरंग अभंग, जिल्हा परिषद कृषी समिती सभापती दिलीपराव लांडे, पंचायत समिती सभापती सौ. सुनिता नजन, पं. स. सदस्य संजय फडके, ॲड. देसाई देशमुख, भैय्यासाहेब देशमुख यांसह जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.

(दै. सार्वमत २१.७.२००२)

# दलितांवर प्रेम करणारा नेता हरपला

## रामदास आठवले

दिवंगत ज्येष्ठ नेते मारुतराव घुले दलितांच्या पाठीवर प्रेमाने हात फिरवणारे नेते होते. त्यांच्या निधनाने आमच्या संघटनेचा व दलितांचा आधार गेला, अशा शब्दांत रिपब्लिकन पक्षाचे खासदार रामदास आठवले यांनी (कै.) घुले यांना श्रद्धांजली वाहिली.

आज सायंकाळी श्री. आठवले यांनी दहिगावने येथे जाऊन घुले कुटुंबियांचे सांत्वन केले. या वेळी ते म्हणाले की, सर्वांना बरोबर घेऊन जाणारे व सर्व जातीधर्मांच्या कार्यकर्त्यांना योग्य जागी संधी देणारे नेतृत्व म्हणून (कै.) घुले परिचित होते. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण जागेवर रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यास निवडून आणण्याची किमया त्यांनी केली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे व जिल्ह्यात सर्वांच्या आदरस्थानी असलेले अभ्यासू नेतृत्व अचानक हरपले, असेही श्री. आठवले म्हणाले. घुले कुटुंबियांच्या पाठीशी दलित जनता उभी राहील, असेही म्हणाले. या वेळी रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश खाडे, जिल्हाध्यक्ष विजय वाकचौरे, जिल्हा परिषदेचे सदस्य पवनकुमार साळवे, दिलीप लांडे व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(दै. लोकसत्ता २०.७.२००२)

❀ ❀ ❀

# सच्चा मार्गदर्शक हरपला

## गोविंदराव आदिक

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस ही वेगवेगळी जरी असली तरी कै. मारुतराव घुलेपाटील हे आम्हाला प्रिय होते. त्यांच्या निधनाने मी एका सच्चा मार्गदर्शकाला मुकलो आहे, अशा शब्दात काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. गोविंदराव आदिक यांनी स्व. मारुतराव घुलेपाटील यांना दहिगावने येथे श्रद्धांजली वाहिली.

शेवगाव तालुक्यातील घुले पाटलांच्या मूळगावी दहिगावने येथे घुले कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी गोविंदराव आदि आपल्या कार्यकर्त्यांसमवेत तेथे आले होते. काल मंगळवारी सायंकाळी त्यांनी घुले पाटलांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सुमनांजली वाहिली. त्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या शोकसभेत ते बोलत होते. आ. नरेंद्र घुले व ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन चंद्रशेखर घुले व घुले परिवाराचे सांत्वन त्यांनी केले. आपल्या भाषणात ते म्हणाले की, घुले पाटलांचे निधन झाले तेव्हा मी परदेश दौऱ्यावर होतो. त्यामुळे मला त्यांच्या कोणत्याही विधीस उपस्थित राहता आले नाही. याचा मला खेद वाटतो. घुलेपाटील हे मूळचे श्रीरामपूरचे असल्याने त्यांचे व माझे रक्ताचे नाते होते. माझ्या उमेदीच्या काळात त्यांनी राजकीय व वैयक्तिक जीवनात मोलाचे मार्गदर्शन केले.

पाटबंधारे राज्यमंत्री बाळासाहेब थोरात यावेळी म्हणाले की, भाऊसाहेब थोरात व मारुतराव घुलेपाटील यांचे जवळकीचे संबंध होते भाऊसाहेबांचे

ते सहकारी असल्यामुळे घुले पाटलांशी माझा जवळचा संबंध आला. या श्रद्धांजली सभेस आ. जयंत ससाणे, काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बाबासाहेब भोस, युवक काँग्रेसचे अध्यक्ष ज्ञानदेव वाफारे, अविनाश आदिक, प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव संपतराव नेमाणे उपस्थित होते.

(दै. गावकरी २४.७.२००२)

❀ ❀ ❀

# विविध संस्थांची, व्यक्तींची श्रद्धांजली

**दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर.**

**हेड ऑफिस, स्टेशन रोड, अहमदनगर.**

**मे. लोन सब कमिटी सभा दिनांक ९.७.२००२ दु:खवट्याचा ठराव**

**कै. मारुतरावजी घुलेपाटील**

सोमवार दिनांक ८.७.२००२ रोजी बॅन्केचे संस्थापक संचालक लोकनेते मारुतरावजी घुलेपाटील यांचे दु:खद निधन झाले.

कै. मारुतरावजी घुलेपाटील यांचे सहकार, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील कार्य हे सतत सर्वांना प्रेरणा देत राहील.

खानदानी सभ्यता, स्वाभाविक ऋजुता आणि मार्दवता, राजबिंडे व्यक्तिमत्त्व निसर्गानेच त्यांना बहाल केले होते. सेवाभावी जनतेचा सेवक, विकासाचा शिल्पकार, शिक्षण सहकार महर्षि, कृषी औद्योगिकता व समाज व राष्ट्रासाठी जीवन वेचणारा, मृदुभाषी, सौम्य प्रवृत्ती, सालस, लोभस तरीही खंबीर नेतृत्त्व करणारा 'कणखर' लोकनेता आज आपल्यातून निघून गेला आहे.

कै. मारुतराव घुलेपाटील यांचा जन्म १५.९.१९३० साली पढेगाव, ता. श्रीरामपूर येथे शेतकरी कुटुंबात झाला. परंतु त्यांची कर्मभूमी दहिगावने, ता. शेवगाव ही होती. विद्यार्थी दशेतच सहकार क्षेत्रातील तसेच संत वाङ्मयाचे

गाढे अभ्यासक थोर विचारवंत मा. श्री. बाळासाहेब भारदे यांचे मार्गदर्शनाखाली त्यांनी सहकार क्षेत्रात कार्य चालू केले. सन १९५४ मध्ये त्यांनी दहिगावने वि. का. स. सोसायटीची स्थापना केली. तर सन १९५८ मध्ये शेवगाव सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना केली. सन् १९५९ मध्ये दहिगावने येथे ग्रामीण भागातील मुला-मुलींकरिता नवजीवन विद्यालय व वसतिगृहाची स्थापना केली.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते स्थापनेपासून संचालक होते. बँकेच्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा होता. तर आजतागायत बँकेचे संचालक म्हणून त्यांनी केलेल्या कामामुळे आज बँकेचे नाव सर्व देशांत पोहोचले आहे.

कै. घुलेपाटील हे 'मालक' या नावाने ओळखले जात. एक खानदानी, राजस, सुसंस्कृत असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. मृदुभाषी, सर्वांना आपुलकीने वागविणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

सन १९६१ मध्ये अखिल भारतीय कृषक समाज नवीदिल्लीचे ते सदस्य होते.

सन १९६२ मध्ये शेवगाव-नेवासा मतदार संघातून ते महाराष्ट्र राज्य विधानसभेवर निवडून गेले होते.

सन १९६६ साली जायकवाडी प्रकल्पग्रस्तांचे सुशिक्षित बेरोजगार मुलांसाठी रोजगार उपलब्ध व्हावेत म्हणून त्यांनी शेवगावसारख्या दुष्काळी भागात औद्योगिक संस्था स्थापन केली.

सन १९७० मध्ये त्यांनी ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे रजिस्ट्रेशन मिळविले व कारखाना उभारणी करून सन १९७४/७५ मध्ये यशस्वी चाचणी गळीत हंगाम सुरू केला. आज ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रात आदर्शवत समजला जातो. ह्या कारखान्याचे तसेच जिल्हा सहकारी बँकेचे जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या

मार्गदर्शनामुळे ह्या दोनही संस्था आज प्रगतीपथावर व प्रसिद्धीच्या झोतात आहेत. सन १९७४/७५ मध्ये यशस्वी चाचणी गळीत हंगाम सुरू केला. आज ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना हा महाराष्ट्रात आदर्शवत समजला जातो. ह्या कारखान्याचे तसेच जिल्हा सहकारी बँकेचे जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे ह्या दोनही संस्था आज प्रगतीपथावर व प्रसिद्धीच्या झोतात आहेत. सन १९७८ ते १९८० व १९८६ ते १९९१ ह्या काळात ते बँकेचे अध्यक्ष होते.

सन १९९४ मध्ये त्यांना ऑल इंडिया नॅशनल युनिटी कॉन्फरन्स नवी दिल्ली यांचा इंदिरा गांधी प्रियदर्शनी पुरस्कार मिळाला होता.

सन १९९७ मध्ये इंडियन इकॉनॉमिक डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड रिचर्स असोसिएशन नवीदिल्ली यांचा भारतीय उद्यौगरत्न पुरस्कार १९९६ मिळाला होता.

तर सन १९९७ मध्ये सहकार व सामाजिक क्षेत्रातील योगदानाबाबत जिल्हा सहकारी बँकेतर्फे सहकार भूषण पुरस्कार आपल्या बँकेने प्रदान केला होता.

कै. मारुतरावजी घुलेपाटील यांचे राजस, उमदे व्यक्तिमत्त्व मानस सरोवरातील राजहंसाप्रमाणे नीरक्षीर असा न्याय करणारे व सर्वच बाबतीत सुवर्णमध्य साधणारे कुशाग्र बुद्धिमत्तेचे मूर्तिमंत प्रतीक होते.

त्यांच्या आकस्मिक निधनाने सहकार क्षेत्राची, तसेच शैक्षणिक व शेती क्षेत्राची अपरिमीत हानी झाली आहे. त्यांच्या आकस्मिक निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात ही सभा सहभागी आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.

ही सभा त्यांना ह्या ठरावाद्वारे विनम्र श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

❀ ❀ ❀

# श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना लि.

## ज्ञानेश्वरनगर, नेवासा

आपले कारखान्याचे व्हा. चेअरमन साहेब यांनी स्वर्गवासी घुले साहेब यांचा दु:खवट्याचा ठराव मांडला. संचालक श्री. सुधारक नरवडे पाटील यांनी अनुमोदन दिले. कारखान्याचे सेक्रेटरी यांनी खालीलप्रमाणे दु:खवट्याचा ठराव वाचून दाखविला.

**दु:खवटा ठराव**

सहकार व सामाजिक क्षेत्रातील जेष्ठ नेते, नेवासा-शेवगाव परिसराचे भाग्यविधाते, माजी आमदार, ज्ञानेश्वर स.सा. कारखान्याचे संस्थापक, अ. नगर जिल्हा सहकारी बँकेचे संस्थापक संचालक व माजी चेअरमन, आदरणीय लोकनेते मारुतरावजी घुलेपाटील साहेब यांचे सोमवार दिनांक ८ जुलै २००२ रोजी आकस्मिक निधन झाल्याची बातमी कार्यक्षेत्रात, जिल्ह्यात व महाराष्ट्रात वाऱ्याचे वेगाने पसरली आणि संपूर्ण नेवासा-शेवगाव तालुक्यातील जनतेवर एक शोककळा पसरली.

आदरणीय साहेबांनी कारखाना व कारखान्याचे माध्यातून अनेकविविध संस्था उभ्या केल्या, त्यांचे जाळे पसरविले. नेवासा-शेवगाव परिसराची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून त्यांनी जीवनाच्या शेवटच्या श्वासापर्यंत अथक परिश्रम घेतले व या भागातील सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून दिला. कारखान्यामार्फत व अहमदनगर जि. म.

सहकारी बँकेच्या सहकार्याने कार्यक्षेत्रात उपसा जलसिंचन योजनांचे जाळे तयार केले. जायकवाडी धरणग्रस्तांच्या जमिनी बागायती करून त्यांचे जीवनामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला या बद्दल धरणग्रस्त कृती समिती व परिसरातील जनतेने त्यांचा सन १९८९ मध्ये सत्कारही केला होता. मा. साहेबांची भविष्याचा वेध घेणारी व अचूक निर्णय घेण्याची क्षमता यामुळेच ज्ञानेश्वर कारखान्याने अल्पावधीत १२५० मे.टन/दिनी ते ५००० मे.टन/दिनी ही यशस्वी मजल गाठली. कारखान्याची विस्तारावाढ करत असतानाच कार्यक्षेत्रातील जमिनी ओलीताखाली आणण्यासाठी लिफ्ट इरिगेशन, कोल्हापूर टाईप बंधारे यासाठी मा. साहेबांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करून आज जवळ जवळ १६००० हेक्टर क्षेत्र ऊसाखाली आणले आहे. त्यामुळे पाणी टंचाईचे सध्याचे काळातसुद्धा वाढीव क्षमतेला पुरेल एवढा ऊस कारखान्याचे कार्यक्षेत्रात उपलब्ध आहे, हे मा. साहेबांचे दूरदृष्टीचे द्योतक आहे.

कारखान्याचे माध्यमातून शिक्षण संस्थेची स्थापना करून बालवाडी ते शास्त्र व कला महाविद्यालय, आय.टी.आय., कृषी विद्यापीठाचे कोर्सेस, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कोर्सेस अशा विविध शैक्षणिक सुविधा कार्यस्थळावर त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. आज या शैक्षणिक संस्था उभारून संस्थांचा विस्तार करत असताना गुणात्मक दर्जाही कायम ठेवलेला आहे; त्यामुळेच एवढ्या अवाढव्य प्रमाणात शिक्षण संस्थांचा विस्तार होऊन त्या विकसित झालेल्या आहेत.

ऊस उत्पादक, कामगार, सभासद, बिगर सभासद हे कुटुंब मानून या घटकामध्ये नेहमी कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध जोपासण्याचा विचार देऊन त्या पद्धतीने कारखान्याचे कामकाजाचे नियोजन कायम ठेवले व त्याचाच परिपाक म्हणून कारखाना व्यवस्थापन, कामगार व परिसरातील ऊस उत्पादक सभासद शेतकरी यांचा साहेबांच्या नेत्तृत्वावर विश्वास राहिला. जवळ जवळ ५० वर्षे या मातीशी समरस होऊन छोट्यातल्या छोट्या घटकाला सामाजिक

व आर्थिक न्याय देण्यासाठी ते स्वत:च्या सुख दु:खाची तमा न बाळगता अहोरात्र झटले. अशा या महान नेतृत्वामुळेच जायकवाडी धरणामुळे विस्थापित झालेला शेवगाव-नेवासा परिसरातील शेतकरी आज स्वत:च्या पायावर भक्कमपणे उभा राहिलेला आहे. शेतकऱ्याचे छपरावरचे पाचरट जाऊन त्या ठिकाणी कमीत कमी कौलारीचे छत कधी येईल ही दृष्टी कायम ठेऊन मा. साहेबांनी त्यादृष्टीने मार्गक्रमण केले.

मा. साहेबांचा संघटना कौशल्य हा गुण अतिशय वाखाणण्यासारखा होता; म्हणूनच सन १९६४ साली काँग्रेसच्या जेष्ठ नेत्यांनी त्यांचेवर अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी सोपविली आणि मा. साहेबांनी जिल्ह्याध्यक्ष पदाची धुरा अत्यंत यशस्वीपणे सलग १० वर्षे सांभाळली. महाराष्ट्रातील कृषी औद्योगिक क्रांतीचे जनक कै. यशवंतरावजी चव्हाण यांचे स्वप्न मूर्त स्वरूपात आणण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. मा. साहेब मुत्सद्दी व संयमी राजकारणी होते. विचारातील सुज्ञपणा, नियोजनातील सुसूत्रता आणि कृतीतील प्रामाणिकता हीच मा. साहेबांची यशस्वी राजकीय, सामाजिक वाटचालीची त्रिसूत्री होती. मा. साहेबांच्या अजोड कामामुळेच त्यांना ''इंदिरा गांधी'' प्रियदर्शनी पुरस्कार, भारतीय उद्योग रत्न पुरस्कार, सहकार भूषण पुरस्कार'' अशा विविध सन्मानांनी समाजाने पुरस्कृत केले. परमेश्वराने त्यांना दिलेले लोभस व्यक्तिमत्त्व, कर्तव्याचे बुद्धीने प्रेरित झालेली प्रज्ञा, दीन-दलितांविषयी कणवता व व्यावहारिक चातुर्य ही गुणसंपदा लाभल्याने मा. साहेबांनी जिल्ह्यात सहकाराचे नंदनवन फुलविले. मा. साहेबांनी सहकार, शेती, अर्थशास्त्र व इतर उद्योगांचा सखोल अभ्यास तर केलाच परंतु लोक समुहातून लोक संस्कृती निर्माण करण्याचा एक नवा आदर्श राजकारण्यापुढे ठेवला कोणताही राजकीय नेता जेव्हा सकारात्मक भूमिकेतून कार्य करतो, तेव्हाच तो जनादरास पात्र होतो याचे उत्तम उदाहरण म्हणजेच, मा. मारुतराव घुलेपाटील साहेब होय.

अशा विविधांगी नेत्याचे अचानक जाण्याने जिल्ह्याची व शेवगाव-नेवासा परिसराची अतिशय मोठी हानी झालेली आहे. त्यांच्या निधनाने कारखाना व्यवस्थापन, अधिकारी, कामगार, ऊस उत्पादक सभासद , शेतकरी, ज्ञानेश्वर उद्योग समुहातील छोटे मोठे घटक यांना अतिशय दुःख झालेले असून आम्ही सर्वजण मा. साहेबांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. स्वर्गीय आदरणीय घुलेपाटील साहेब यांच्या विचाराचा वारसा मा. आमदार नरेंद्र घुलेपाटील व मा. चंद्रशेखर घुलेपाटील यांनी प्रभावीपणे चालवावा व त्यासाठी सर्व कार्यकर्ते, ऊस उत्पादक सभासद, शेतकरी, कामगार, सेवक यांनी स्वर्गीय साहेबांचे विचारावर कायम निष्ठा ठेऊन हा वारसा चालविणे कामी सहकार्य करावे हीच साहेबांना आदरांजली ठरेल.

स्वर्गीय मारुतरावजी घुलेपाटील साहेब यांचे भव्य, दिव्य व पवित्र स्मृतीस विनम्रपणे आम्ही अभिवादन करत असून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. मा. साहेबांच्या आत्म्यास सद्गती लाभो ही परमेश्वर चरणी प्रार्थना.

सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभ राहून आपली भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून सदरचा ठराव पास केला.

❀❀❀

# ज्ञानेश्वर कारखान्यातर्फे मारुतरावांना श्रद्धांजली

आठवणींचे धुमारे, दुःखाश्रू आणि हुंदके अशा वातावरणात ज्येष्ठ नेते मारुतराव घुले यांना आज त्यांची कर्मभूमी असलेल्या श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर स्थानिक नेते, कामगार व कार्यकर्त्यांनी शोकसभा घेऊन श्रद्धांजली वाहिली.

मारुतराव घुले यांच्या निधनामुळे निर्माण झालेली दुःखाची छटा आजही भेंडे गावात दिसून आली. गावातील सर्व व्यवहार आजही बंद होते. घुले यांच्यावर अंत्यसंस्कार झाले, त्या ठिकाणी आज सकाळी सुमारे दोन हजार लोक शोकमग्न अवस्थेत उपस्थित होते. मंत्रघोषामध्ये त्यांच्या अस्थी गोळा करण्यात आल्या व रक्षा प्रवरासंगम येथे संगमावर नेण्यात आली.

**तीन दिवस दुखवटा**

ज्ञानेश्वर कारखाना परिसरात तीन दिवस सर्व व्यवहार बंद ठेवून दुखवटा पाळला जात आहे. दि. १७ ला दहिगावने (तालुका शेवगाव) येथे दशक्रिया विधी होणार आहे. कारखाना कार्यस्थळावर कामगार व कार्यकर्ते यांची शोकसभा झाली. आमदार नरेंद्र घुले व कारखान्याचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले या वेळी उपस्थित होते. माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी श्रद्धांजली वाहताना सांगितले की, नेवासे व शेवगाव या दोन्ही तालुक्यातील प्रत्येकाला आपल्या घरातील ज्येष्ठ कुटूंब प्रमुख गेल्याचे दुःख होत आहे. अचूक विचार, परिपूर्ण अभ्यास व श्रेष्ठ विचारांचा ठेवा मालकांनी दिला आहे, तो आपण जपला पाहिजे. फाटक्या माणसाला समर्थ करण्याचे मालकांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कार्य केले पाहिजे.

राष्ट्रीय साखर कामगार संघाचे नेते बबनराव पवार, पंचायत समितीचे उपसभापती काशिनाथ नवले, रामनाथ राजपुरे, टी.एम.आदमाने, राष्ट्रवादी काँग्रेसचे शाखाध्यक्ष अनिल मते, प्रदीप देशमुख (चाळीसगाव), नानाभाऊ सुकाळकर, देवकरमहाराज (देहू) नामदेवमहाराज (बीड) यांनीही श्रद्धांजली वाहिली.

कारखाना उभारणी काळातील भेंडे येथील विविध सामाजिक कार्यक्रमांतील आठवणींना उजाळा देत होता. काही वक्त्यांना तर दुःखाने बोलताही येत नव्हते. श्रोत्यांमधील अनेकांच्या डोळ्यांतील अश्रू शोकसभेतील वातावरण अधिकच शांत करीत होते.

'अधिकाऱ्यांना सतत सहकार्य'

कुकाणे, (लो.वा.) सर्व सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना मारुतरावांनी सतत सहकार्यच केले, अशा शब्दांत कोल्हापूर विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक रामराव पवार यांनी मारुतराव घुले यांना श्रद्धांजली वाहिली.

कामगारांचे नेते बबनराव पवार म्हणाले, ''ग्रामीण भाग भयमुक्त व भ्रष्टाचारमुक्त झाला पाहिजे, तसेच शेतकरी समृद्ध झालाच पाहिजे, अशी मारुतरावांची इच्छा होती. त्यांच्या निधनाने नेवासे, शेवगाव भाग पोरका झाला आहे.'' कामगारांचे स्थानिक नेते जगन्नाथ काळे यांनी छत्र हरपल्याचे सांगितले.

जिल्हा सहकारी बँकेचे माजी कार्यकारी संचालक जी.के. पाटील, 'ज्ञानेश्वर' चे माजी कार्यकारी संचालक सुरेश चव्हाण, सचिव काकासाहेब शिंदे, कडूचंद दळवी, बाबा आरगडे आदींनीही श्रद्धांजली वाहिली. या वेळी दोन मिनिटे स्तब्धता पाळण्यात आली.

भेंडे येथे आज दुसऱ्या दिवशीही दुपारपर्यंत सर्व व्यवहार बंद होते.

(दै. लोकसत्ता, १०.७.२००२)

❀ ❀ ❀

# स्व. घुलेंच्या कार्याचा वसा पुढे चालवावा

भाऊसाहेब थोरात

सहकाराच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास घेतलेले स्व.मारुतराव घुले पा. यांच्या कार्याचा वसा सातत्याने पुढे चालविणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे प्रतिपादन स्व.मारुतराव घुलेपाटील यांचे ज्येष्ठ सहकारी अमृत उद्योग समुहाचे संस्थापक सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी केले.

संगमनेर भाग सहकारी साखर कारखाना व अमृत उद्योग समुहाच्यावतीने कारखाना कार्यस्थळावर सहकार भूषण स्व.मारुतराव घुलेपाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. लक्ष्मणराव कुटे यांनी स्व.घुलेपाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. लक्ष्मणराव कुटे यांनी स्व. घुलेपाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. श्रद्धांजली सभेचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक शाळीग्राम होडगर यांनी केले.

आपल्या भाषणात सहकारमहर्षी भाऊसाहेब, थोरात म्हणाले की, स्व.मारुतराव घुले यांच्याशी माझे निकटचे संबंध होते. जिल्हा सहकारी बँकेत आम्ही दोघेही एकमेकांचे जिवलग मित्र म्हणून संचालक मंडळात होतो. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच मला प्रचंड धक्का बसला असून एक सच्चा सहकारी व तळमळीचा कृषी क्रांतीचा मंत्र देणारा कार्यकर्ता हरपला अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. सहवासात असलेल्या विविध जुन्या स्मृतींना उजाळा

देताना ते पुढे म्हणाले की, मारुतराव घुले यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अतिरिक्त उत्पादित झालेला ऊस संगमनेर कारखान्याला पुरविला मात्र व्यवहारात कुठेही कटुता येऊ न देता व्यवहार सुरळीत ठेवण्यात घुले पाटलांचा हातखंडा होता. मग ऊस विक्री असो वा बगॅस विक्री असो. त्यांनी सहकारालाच प्राधान्य दिले. गोदावरीवरील पैठण प्रकल्प यामुळे नेवासा, शेवगाव व राहुरी भागात सुमारे ३२ लाख टन ऊस उत्पादित होतो. साखर कारखानदारी बरोबरच जोडधंदेही सहकाराचे माध्यमातून उभे करून घुलेपाटील यांनी जिल्ह्यात सहकार रुजविला. सहकाराचे धोरण, लिफ्ट योजना, शेतकऱ्यांना अर्थसहाय्य आदी कामात मारुतराव घुले यांच्या सारखा धडाडीचा कार्यकर्ता पुन्हा होणे नाही. त्यांच्या निधनाने जिल्ह्याच्या सहकारक्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अशा शब्दांत सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

प्रास्ताविकात संगमनेर साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक शाळीग्राम होडगर म्हणाले की, साखरकारखानदारीतील कामाच्यानिमित्ताने स्व.मारुतराव घुले व माझा संपर्क आला, ओळख वाढली व त्यातूनच त्यांच्या कार्याची व्याप्ती समजली. कोल्हापूरपासून नाशिकपर्यंत महाराष्ट्राचा हा पट्टा कृषीक्रांती म्हणून प्रगती साधू शकला तो केवळ सहकाराच्या प्रभावी कार्यप्रणाली मुळेच. मारुतराव घुले हे या चळवळीचे एक अग्रणी होंत. प्रगत शेती, साखर कारखानदारी, यशस्वी दूध धंदे, सुतगिरणी, बँका, पतसंस्था यासारखी समृद्धी निर्माण करणारी साधने केवळ सहकारामुळेच साध्य होऊ शकतात. खाजगी कारखानदारीत फक्त मालक व नोकर हाच संबंध येतो तर सहकारी विदर्भ, मराठवाड्यापेक्षा या पट्ट्यात सहकार जोपासल्यामुळे विकास होऊ शकला. मारुतराव घुले पा. यांच्या ज्ञानेश्वर साखर कारखान्याकडून आपण बगॅस, ऊस खरेदी करतो यां व्यवहारात त्यांचे नेहमीच सहकार्य लाभले आहे. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याला त्यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन लाभले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात, स्व. मारुतराव घुले, ना.बाळासाहेब विखे आदींच्या समवयस्क पिढीने सहकारात एक आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे हे आता नव्या पिढीला माहीत नाही. म्हणून या पिढीचा इतिहास सांगण्याची खरी गरज आहे. विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन सर्वस्वाचा त्याग करणारी प्रसंगी जिवाची बाजी लावणारी अशी ही पिढी होय. स्व.मारुतराव घुले यांचे योगदान सहकार क्षेत्राला लाभले हे विसरुन चालणार नाही.अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

याप्रसंगी संगमनेर साखर कारखान्याचे बरोबरच अमृत उद्योग समुहातील सर्व पदाधिकारी, कर्मचारी व सहकारातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(दै. गावकरी, १०.७.२००२)

❀ ❀ ❀

# राहुरी कारखान्याच्यावतीने मारुतरावांना श्रद्धांजली

सहकार, शिक्षण, कृषी व राजकीय क्षेत्रात काम करीत कै. मारुतराव घुलेपाटील यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला असून, त्यांच्या निधनामुळे सर्वसामान्य व ग्रामीण भागातील जनतेची मोठी हानी झाली आहे, अशा शब्दांत डॉ.बाबुराव बापूजी सहकारी साखर कारखान्चे उपाध्यक्ष श्री. सुरेश वाबळे यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

कारखान्याच्या कार्यस्थळावर कै. मारुतराव घुले यांच्या निधनाबद्दल आयोजित केलेल्या श्रद्धांजली कार्यक्रमात श्री. वाबळे बोलत होते.

कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. एम. जगधने यांनी आपल्या भाषणात कै. घुलेपाटील यांना श्रद्धांजली वाहिली. नेवासा, शेवगावसारख्या जिरायत भागात कारखाना काढून सर्वसामान्य जनता, शेतकऱ्यांचे प्रपंच उभे करणारे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांचे कार्य यापुढेही चालू राहील, असे ते म्हणाले.

सहकारातून हरितक्रांती घडवून आणणारा नेता हरपला असल्याची श्रद्धांजली कारखान्याचे संचालक ॲड. के.एम. पानसरे यांनी वाहिली. याप्रसंगी कारखान्याचे संचालक गोकुळदास आढाव, सोपानराव पाटील, तुकाराम पवार, द्वारकानाथ बडदे, नारायण जाधव, दत्तात्रय उंडे, आर.एम.राऊत, साखर कामगार संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब कदम, अधिक, कर्मचारी उपस्थित होते, जनसंपर्क अधिकारी सुभाष वाणी यांनी नियोजन केले.

### अशोक उद्योग समूहाच्या वतीने मारुतरावांना भावपूर्ण श्रद्धांजली

# सहकारातून समाजकारण करणारा शिक्षक हरपला

**भानुदास मुरकुटे**

---

ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक कै. मारुतराव घुलेपाटील यांच्या निधनाने सहकाराच्या आणि राजकारणाच्या माध्यमातून समाजकारण कसे करावे, हा धडा शिकविणारा शिक्षक काळाच्या पडद्याआड गेला आहे. अशा भावपूर्ण शब्दात मुळा प्रवरा वीज संस्थेचे अध्यक्ष माजी आ. भानुदास मुरकुटे यांनी अशोक उद्योग समूह तसेच मुळा-प्रवरा वीज सहकारी संस्थेच्या वतीने कै. घुलेपाटील यांना श्रद्धांजली अर्पण केली.

राजकीय क्षेत्रात राहूनही कै. घुले अजातशत्रू म्हणून जीवन जगले, यातच त्यांचा मोठेपणा दडलेला आहे. पंधरा दिवसांपूर्वी टाकळीभान येथे अशोक बँकेच्या शाखेच्या उद्घाटनास कै. घुले आवर्जून उपस्थित होते. अशोक सहकारी साखर कारखाना आणि अशोक सहकारी बँकेच्या वाटचालीतील मार्गदर्शक हरपल्याची खंत मुरकुटे यांनी व्यक्त केली.

अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत त्यांनी ठाम भूमिका घेऊन राजकारणात सत्तेपेक्षा मूल्ये महत्त्वाची असतात, हे प्रत्यक्ष दाखवून दिले. राजकारण व समाजकारण दिशाहीन होत असताना कै. मारुतराव घुले यांच्यासारखा मार्गदर्शक काळाच्या पडद्याआड गेल्याने जिल्ह्यातील समाजकारणाची हानी झाल्याची भावनाही मुरकुटे यांनी व्यक्त केली. (गांवकरी १४.७.२००२)

# आदरांजली

• स्वर्गीय मारुतराव घुलेपाटील यांना विधानसभा आणि विधान परिषदेत शोकप्रस्ताव मांडून श्रद्धांजली वाहण्यात आली.

• महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळातील मान्यवर मंत्र्यांनी, राजकीय, सामाजिक क्षेत्रांत काम करणाऱ्या समाजसेवकांनी आणि आमदार, खासदार आदी लोकप्रतिनिधींनी घुलेपाटील कुटुंबियांना शोकसंदेश पाठवून व समक्ष भेटून त्यांचे सांत्वन केले.

• महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, बाबुराव बापूजी तनपुरे साखर कारखाना, अशोक साखर कारखाना, पद्मश्री श्री. विखेपाटील साखर कारखाना, महाराष्ट्रातील व जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने, दूध संघ, विविध सहकारी संस्था आणि जिल्हा परिषद यांनी घुले पाटील यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच नेवासे-शेवगाव तालुक्यातील विविध पक्षांची व संघटनांची श्रद्धांजली सभा होऊन घुलेपाटील यांना आदरांजली वाहण्यात आली.